॥ श्रीगुरुदेव प्रसन्न ॥

॥ श्री बनशंकरी प्रसन्न ॥ श्री गजानन प्रसन्न ॥

॥ श्री सद्गुरु जयरामस्वामी महाराजकी जय ॥

॥ कै. शांतीशाहीर ग. द. दीक्षित चिंचणीकर (सांगली) ॥

॥ यांचा काव्य संग्रह ॥

॥ ओवी ॥

असती कितीक शाहीर हिंदीत कोणी तसे शाहीदीत ।

झाले, आणि होतील परी होणार नाही दीक्षित ॥

(यांनी परंपरा जिवंत ठेवण्याच्या दृष्टीने साध्यासाधनांचे कार्य व्हावे) कवी. शाहीर संजीवन. मु. शिगांव: ता. वाळवा.)

॥ [illegible] ॥ २९९

[illegible] ([illegible])


| अ. क्रमांक | पान | |
|---|---|---|
| १) | १) | अनुक्रमणिका |
| २) | २) | क्रमांक, चाल, पोवाड्यांच्या चरणांसहीत. माहीतीसाठीं. |
| ३) | ५) | [illegible] (पोवाडा) |
| ४) | १४) | [illegible] .. (पद) |
| ५) | १५) | श्री [illegible] महाराज गाईकवाड (आगमन) |
| ६) | १६) | महात्मा, [illegible] (पद) |
| ७) | १७) | अखंड हिंदुस्थान. (पोवाडा) |
| ८) | २३) | मुजरा घ्या महाराज, युवराज, (पद) |
| ९) | २४) | (पोवाडा) स्वातंत्र्य सिंहासन. (पोवाडा) |
| १०) | २७) | जयहो जय परमार. (पद) |
| ११) | २८) | विक्रमालंकार. (काव्य) |
| १२) | ३०) | चपलाहार. (लावणी) |
| १३) | ३४) | चलेजाव. (पोवाडा) |
| १४) | ३९) | भाऊबीज. (संवाद) |
| १५) | ४०) | कॉंग्रेसची आरती. |
| १६) | ४१) | आरती कॉंग्रेस देवतेची. |
| १७) | ४२) | जवळ्यावर रेशनींग. (संवाद) |
| १८) | ४६) | सीता शोध. (कीर्तन) आख्यान. |
| १९) | ४८) | पागडी. (संवाद) |
| २०) | ५२) | भोजन निमंत्रण. (संवाद) |
| २१) | ५५) | अमृतहार. (संवाद) |
| २२) | ५८) | हिन्दुस्थान कॉन्स्टिट्युशन (संवाद) |
| २३) | ६१) | काळाबाजार. (संवाद) |
| २४) | ६३) | नाडी परिक्षा वैद्य (संवाद) |
| २५) | ६५) | कॉंग्रेस इलेक्शन. (पोवाडा) |
| २६) | ६९) | राज्याभोग्याची जय अर्थात तिरंगी झेंडा. (संवाद) |
| | | |
| २७) | ७३) | भारतातील गुंडे (लावणी संवाद) |

॥ श्री गुरुदेव प्रसन्न ॥

अंक


| अनुक्रमांक | पान | |
|---|---|---|
| २८) | ७४ | गॅंड्रोलचे रहस्य (संवाद) |
| २९) | ७७ | अधुनिक नारद (संवाद) |
| 30) | ८१ | होळी (संवाद) |
| ३१) | ८५ | नेताजींचे सीमोल्लंघन (संवाद. आझादमेळा सांगली मारवाडपेठ जॅंकसाठी लिहिले) |
| ३२) | ९८ | श्रीकृष्ण अवतार (संवाद) |
| 33) | १०२ | गांधीबाबाची जागा (संवाद) |
| ३४) | १०५ | संताजी जाधव ( " ) |
| ३५) | १०९ | दारूबंदी (कथा) |
| ३६) | ११३ | नवरत्नांचा हार (संवाद) |
| ३७) | ११६) | पानाची राणी अर्थात नाईकीण (पोवाडा) |
| ३८) | १२६) | भयंकर दिव्य अर्थात सती पद्मिनी ( " ) |
| ३९) | १४१) | राजकुमार प्रतापसिंह पटवर्धन संस्थान सांगली (पोवाडा) |
| ४०) | १४८) | श्री शिवरहस्य (पोवाडा) रेकॉर्ड कॉपी ) |

॥ श्री ॥

| चाल क्र. | क्र. | ॥ उदाहरणादाखल चरणे ॥ |
|---|---|---|
| चाल क्र. (लिखणी) | १ | दीक्षित क्रांतीशाहीर, चिंचणीकर, बंधु मम प्यार, छोटा दीक्षित मी गातो कवनांस, दोघेही एकाच गुरुचे दास, त्यावरल विनोद पूज्य आम्हांस ॥ |
| चाल क्र. | १ अ | मग तुरुंगाधिकाऱ्यांना भेटून, लांच देऊन, घेतलें वश करून, ठेवली त्यांची योग्य बडदास्त, मर्जी म्हणें सबर जाईन, रोज शब्द त्यांसी बोलीन, शांतवीन चिंता डोक्यांवर पाहून ॥ |
| चाल क्र. | २ | गंगाधरराव शास्त्रीला, जसा धर्म इंद्रप्रस्थाला ॥ |
| चाल क्र. | ३ | शिव होईल शिवाजी आतां नविन अवतारीं ॥ |
| चाल क्र. (लगट) | ४ | जिजाऊनं झेंडा पाहिला, रंग हिरवा त्याचा वळखीला, काय बोलली आपल्या मनाला …… तर इथं यावं हात धुण्याला प्रतापगडाला ॥ |
| चाल क्र. | ५ | शाहिस्तेखानाची केली फार धुळधाण, जरी आला होता एक लक्ष फौज घेऊन, बोटें तोडून खानाला केला फार हैराण, हैराण फार होऊन, पुणें सोडून, गेला जळदीनं ॥ |
| चा. क्र. कराव क्र. | ६/१ | नारसिंहापरी झाले उग्र भगतसिंग, त्यानं फुंकलं रणशींग, कृपा करो एकलिंग, ठरविला मार्ग क्रांतीचा, क्रांतीचा हो, बाटला वीरवृत्तीचा ॥ |
| चाल क्र. कराव क्र. | ६/२ | रंगून शहरीं ज्युबिली हॉल प्रसिद्ध तो खास, तेथें जमवुनी सैन्यास, स्त्रियां आणि पुरुषांस, दणदणीत केलं भाषण, हां, ("तुम हमको खून दो, मैं तुम्हें आझादी दूंगा") जब देंगे देशको तुम खून, हां, तब होगा आझाद हिंदुस्थान, हां, हां, जीजी जी ॥ |
| चाल क्र. कराव क्र. | ६/३ | प्रतापगडच्या माच्याखालीं, जागा भेटीची त्यांनीं ठरविली, फक्त हुजरे दोन यावं घेऊनी, …… वेळ भेटीचा, मांजती दिवस त्याचा ॥ |
| चाल क्र. कराव क्र. | ६/४ | एकोणिसशें बत्तीस सालाला, गेला इंग्लंडाला, शिष्टाई करण्याला, गोलमेज परिषदेला ॥ (राऊंड टेबल परिषदेला) ॥ |
| चाल क्र. कराव क्र. | ६/५ | आम्हीच खरे मुसलमान, राखले ईमान, आम्ही इस्लाम, धर्माचे प्राण, अहो प्राण, करायांचे ताबूत थंड दावा इस्लाम ॥ |
| चा. क्र. ६/६ ) कराव - ६ | ६/६ | कुणीतरी कोणाकडे, जाणे उघड, जसा गरुड, झडपी सापाला, हो, पाल विंचवाला ॥ |
| चाल क्र. भेदीक क्र. | ७/१ | पश्चिमेस किल्याच्या ठेविले वीर मोरोपंत पिंगळ्याला । वीर कृष्णाजी पवार सुपेकर देऊन त्याच्या साथीला ॥ |
| चा. क्र. भेदीक क्र. | ७/२ | उपोषण करी अनुष्ठान श्री दत्तमंदिरात । अकरावे दिनीं श्रीसद्गुरुनीं दिधला दृष्टांत ॥ :- |

| चाल | क्र. | ॥ उदाहरणादाखल चरणे ॥ |
|---|---|---|
| चाल क्र. भेदीक क्र. | ७/३ | काळी कांबळी खांद्यावरती कपाळीं ते गंध, रायाच्या, कपाळीं ते गंध, डोई मुंडास फाडजेर, हो ॥ |
| चाल क्रमांक भेदीक क्र. | ७/४ | हां हां, म्हणता सर्वच स्त्रिया, जमल्या त्या ठायीं, प्रकार ? पहावया, साधूच्या भंवती, साधूच्या भंवती, हां हां जिरंजी ॥ |
| चाल क्र. भेदीक क्र. | ७/५ | विस्तवावरीं फुंकर घालता तो ज कधीं विझतो, पहिल्याहून अधिक प्रखर होतो, तोडला तरू जसा दुप्पट जोमानें वाढतो ॥ |
| चाल क्र. भेदीक क्र. | ७/६ | घेऊनसंग सय्यदबंडा, दावण्या शिवाजीला दंडा, आंधी हाता मधे गंडा अफजूलखान, जिवा महाला शिवाजीही, येऊ लागले लवलाही, जिव शिव जोडी पाही, गाईवरून ॥ |
| चाल क्र. भेदीक — | ७/७ | खंडोपाडी काळा बाजार, माजला बकासुर, कचेरीतही चोर, लाच लुचपत हाही बकासुर ॥ |
| चाल क्र. दांगटी | ८ | एके दिवशीं आंबे घेऊन, डोईवर जाण, चालला जलदीनं, आंब घ्या आंब आवाज दिधला, वेष कसा घेतला ऐका बावळा, कधीं तो होई तमाशेवाला, कधीं कधीं उमदीर गोंधळी बनला, ~~~~ परी नाहीं खाज त्याला दिसला, गः ऐका ॥ |
| चाल क्र. भेदीक | ९ | मग आबा पुरंदरे वीर, हो, त्याचे उत्तर, घा हुकुम आम्हीं तय्यार ॥ |
| चाल क्र. भेदीक | ९ | संताजी, धनाजी, वीर जिराजी, चतुर खंडोबल्लाळ, असे वीर चालले बरोबर ॥ |
| चाल क्र. | ११ | रायगडच्या किल्याला वेढा बसला जेव्हां, मी होतो किल्ल्यावर तेव्हां ॥ |
| चाल क्र. गिलच्याची | १२ | पेटाऱ्यांतून मेवामिठाई जाऊ लागली बाहीर ॥ |
| चाल क्र. | १३ | हे लग्न नव्हे विघ्न राया आले माझें मरण, येराया ये धांऊन ॥ |
| चाल क्र. पाळण्याची | १४ | श्री जिजाईच्या पाहूनी शिवाराया, लागला तिथेचे पाया ॥ |
| चाल क्र. पाळण्याची | १५ | हालवीते जिजाऊ माय, तुला शिवराय, धरूनिया दोरी, नीज रे नीज यवनारीं ॥ |
| चाल क्र. | १६ | नहीं रखना नहीं रखना, सरकार जालीम नहीं रखना ॥ |
| चाल क्र. | १७ | क्षण एक गडे थांबावं, मी पंचारती आणीन ॥ अंतरा ॥ बोलली अशी ती अबला, डोळ्यांतून अश्रू गळला, ~~~~ ओंवाळूनी मग नाथाला, जाहली धन्य त्या वेळा ॥ |
| चाल क्र. | १८ | अब तुमही बजे नादान, संध्या अरजान, करते बैठे, फिर कैसे तुम मरहट्टे ॥ |

| चाल | क्र. | ॥ ॐ श्रीहरिपादारविंद चरणीं ॥ |
|---|---|---|
| चाल क्र. पद | १९ | धांवत येई सख्या, यदुराया ॥ धृ० ॥ |
| चाल क्र. पद | २० | ही ब्युरा करी दिलदार, दयाळू फार, सावन माय ही माझी असे परी |
| | | मज जपते आनिवार ॥ |
| चाल क्र. पद | २१ | भाव धरारे, आपुलासा देव करारे ॥ धृ० ॥ |
| चाल क्र. पद | २२ | मुजरा घ्या महाराज, छत्रपती ॥ धृ० ॥ |
| चाल क्र. पद | २३ | दूर हटो! दूर हटो! ऐ दुनियावाले, हिंदुस्थान हमारा है ॥ धृ० ॥ |
| चाल क्र. पद | २४ | धांव प्रभो श्री लक्ष्मीपती या दैत्यांच्या हातून, करी मम अब्रू संरक्षण ॥ जी ॥ |
| चाल क्र. पद | २५ | तुम्हीं आम्ही सकल हिंदू, बंधू बंधू, तो महादेवजी पिता आपुला, चला तया वंदू ॥ धृ० ॥ |
| चा. क्र. पद | २६ | डरला न जगीं आजवरी हिंदू कुणाला। हे विसरूं नका लीगवाल्यांनो |
| | | सांगतो तुम्हांला, जरा आणा ध्यानाला ॥ धृ० ॥ |
| चाल क्र. | २७ | पहा पंढरपूर नगरीं, गोपाळपुरीं, दामूशेटी राहतुया वस्तीला, |
| | | पांडुरंगाची भक्ती त्याला ॥ हे रामा हरी ॥ |
| चाल क्र. | २८ | अन्न अन्न करूनिया तडफडले बंगाली बंधू । |
| | | स्वर्गासिंहासनीं आरूढ झाले त्या सकलां वंदू ॥ |
| चाल क्र. | २८ | सखा माझा मृग, मी त्याची हरिणी, कर्माची गकहाणी, भारी |
| | | विपरीत। गेला मृगजळाच्या पाठीला मृग धांवत, धांवत हां जीरजी ॥ |
| चाल क्र. साकी | ~~३०~~ ९ | भारत माते नमन करितसो बालक तुजप्रती आतां, साह्य करावें आम्हां |
| | | बालकां तुजविण कोणी न माता, प्रसन्न होऊनिया आतां, |
| | | ठेवी शिरीं वरद हस्तां ॥ |
| चा. क्र. ७ / भेदीक - १० | ७ / १० | नामदेव कीर्तन करी पुढें देव नाचे पांडुरंग, पुढें देव नाचे पांडुरंग, |
| | | जनी म्हणे बोला देवा नामदेवा अभंग ॥ |
| चा. क्र. ७ / भेदीक - क्र. | ७ / ८ | घावया स्वराज्य त्यांना, हो, सिमल्याला जाणा, बोलावले सर्व पुढाऱ्यांना ॥ |
| चा. क्र. - पद | ३१ | मार्तंड मल्हारी, देव माझा मार्तंड मल्हारी ॥ धृ० ॥ |
| चा. क्र. | ३२ | आरती आम्हीं प्रेमें करूंया दत्तात्रय प्रभूची । |
| | | अनन्य भावें शरणाची जातां मुक्ताची होताची ॥ धृ० ॥ |
| चा. क्र. | ३२ / अ. | आरती दत्तात्रय प्रभुची, सुमंगल धवल सद्रूपाची ॥ धृ० ॥ |
| चा. क्र. तमाशाची क्र. | ३३ / १ | बंगाल देशामधें एका खेडेगांवाला, सुखवस्तू गृहस्थ एक, |
| | | नांदतसे चोरव करून प्रपंचाला ॥ |
| चा. क्र. भेदीक - | ~~X~~ ७ / ६ | व्यवहार तो व्यवहार, बेपार तो बेपार, शाळांनाहीं सावकार भोळेपणानं । |
| | | घासलेटच्या व्यापारानं, आणि कापड दुकानानं, उठविले बंगाले दोन, ध्या बघून ॥ १ ॥ |

| चाल | क्रमांक | ॥ उदाहरणादाखल चरणें ॥ | ४. |
|---|---|---|---|
| चा.क्र. पद. | 34) | आली सुवेळ आली, ऊठ! हिंद वीर्यशाली ॥ रे ॥ | |
| | | अंतरा:- दुर्दैवी हिंद-माता, तुज नित्य हांक देतां, | |
| | | परदास्य बेडी पडतां, तुजवीण कोण वाली ॥ रे ॥ १ ॥ | |

॥ श्री गजानन प्रसन्न ॥

॥ श्री ज. स्वामी म. की जय ॥

## पोवाडा :- प्रतापगडावरील मोहीम

॥ कवी :- राष्ट्रशाहीर म. द. दीक्षित चिंचणीकर (सांगली) ॥

॥ मोहीम १ ली ॥

चा.क्र. १) त्यां दैत्य हिरण्यकश्यपुला, नारसिंहानं भेला, उराला फाडला, शिवाजीनं
तसाच अफझुल खानास, फाडला प्रतापगडीं आणा हो ध्यानास,
भवानी आई साह्य शिवबास ॥ ध्रु ॥

चाल क्र. ५) स्वातंत्र्य हिंदमातेचे केले ज्यानीं नष्ट, असे रावण कुंभकर्ण दैत्य फार
बलिष्ठ, आले पुन्हा जन्माला ऐका खरी ती गोष्ट, रावण औरंगजेब
खरा, कुंभकर्ण पुरा, अफझुल खान स्पष्ट ॥

चा.क्र. १) त्या विष्णुरूपी शहाजीला, कपटानं धरला, पकडुनी नेला,
विजापूरच्या आदिलशहानं, ठार मारण्याचा विचार करून,
भिंतीत चिणण्याची आज्ञा दिली जाण ॥

चा.क्र. २) परी सर्जा शिवाजी पुत्रानं, आदिलशहाला शह देऊन ॥
दिल्लीपती शहाजहान, यांच्याच थोर साह्यानं ॥
सोडविला पिता सुतानं, हे प्रसिद्ध जगतीं जाण ॥

चा.क्र. ३) महाराष्ट्रांत शिवाजीनं घातला धुमाकूळ साचा ॥
मुलुखांच विजापुरी प्रताप आपल्या दिमाखाचा ॥
दावला शहाला भोकाड म्हणून दाढीचा ॥
तोरणा घेऊन घातला पाया स्वराज्याचा ॥
त्यांत लुटला खजिना आणं सारा कल्याणचा ॥
मारं मारून पिटवला ओघ आदिलशहाचा ॥
म्हणे कोण करील हा ठार चुव्हा डोंगरचा ॥

चा.क्र. लगट ४) त्याचवेळीं भवानी मातेनं, तुळजापूरच्या अंबाबाईनं, लक्ष्मीला हांक
मारून, शिवाजीला साह्य करण्याची आज्ञा दिली जाण ॥
लक्ष्मीचं साह्य शिवबाला, मंग झालं ऐका सावकाश, त्या तोरणा
किल्ल्यावर मिळाला, द्रव्याचा साठा गवसला शिवाजी राजाला ॥
कल्याणचा खजिना आणिला, दिल्ली धडक, त्यानं बेधडक तव्हां
सुरतेला, खर्चून द्रव्य प्रतापगड किल्ला बांधला ॥
आणि मोठ्या भक्तीभावानं, भवानीला केलं स्थापन, :-

॥ मोहीम १ ली (चालू) ॥

अशी घोर वार्ता ऐकून । भेडकलं शहाचं मन । दरबार त्यानं भरवून ।
केला प्रश्न आदिल शहान । ठार करील पहाडका चुव्वा ऐसा वीर कौन ॥
इतक्यांत आली धांऊन । कल्याण सुभेदाराची सुंदर सून ॥
चा.क्र. नं. — ६/५ विनयानं काय बोलली । ऐका त्यावेळीं । माता मानीली । मला हो
ज्यानं । अहो ज्यानं । असा वीरश्रेष्ठ शिवप्रभू महाला धन्य ॥
मला केली चोळी बांगडी । नेसविली साडी । सरवा त्यासी गोडी ।
अशा पुरुषासी । नकाचं वैर नाही मिळणार यश आपणासी ॥
ऐका! ऐका! साध्वीचे बोल, खरे बिनमोल, हेवा हृदी खोल,
शत्रू वानीती, वाजीती, असा थोर राजा शिवराय गाजली कीर्ती ॥
चा.क्र. १ रुचले न परी हे बोल, झाला बेताल, खान अफझल, ठार म्हणे
करीन शिव्या सैतान, शिवाजी किस चिडियाका नाम, वीर मैं
बडा हूं अफझलखान ॥ १ ॥

---

॥ मोहीम २ री ॥

चा.क्र. १ हीं वार्ता कळतां शिवबाला, तयार झाला, विचार करण्याला ।
भरविला राजगडीं दरबार । जमविले सर्व वीर सरदार ।
जिजामाय त्यांत मुख्य आधार ॥
मोरोपंत पिंगळे नेताजी, जेधे कान्होजी, तसाच तानाजी ।
जिवा महाला तो खरा कल्याण, तोंच स्वामी समर्थ शिष्य कल्याण,
गर्जना करती शुभं कल्याण ॥

चा.क्र. 2 संदेश रामदासांचा । कथियला त्यांनी दरबारीं ॥
हे अरिष्ट बा खानाचे । नच जाण फक्त तुजवरीं ॥
हे अरिष्ट धर्मावरती । ये देव देवळांवरी ॥
होणार सकळ विध्वंस । जाणून असावे अंतरी ॥

ऐकून असा संदेश :-

चा.क्र. 3 बंदोबस्त करण्या देवळांचा शिवाजीनं खास ॥
कानोजीला धाडले पंढरपूरच्या आसपास ॥
तुळजापुरची भवानी ठेवली गुप्त जाग्यास ॥
पंढरपुरचा विठोबा चंद्रभागेच्या पाण्यांस ॥ :-

॥ मोहीम २ री (चालू) ॥

ठेऊनी दर्शनी दूतीं स्थापल्या स्थानावर ॥
आणि आपण केला मुक्काम प्रतापगडावर ॥

चा.प्र. १) खानही पूर्ण माहीतगार । होता सुभेदार । वाईच्यायीर । घेऊनी
फौज बारा हजार । चालला करण्या शिवाजीस ठार ।
ऐकावा पुढील सारा प्रकार ॥

चा.प्र. लगट ४) खान आला तुळजापुराला, फोडलं भवानीदेवीला, जात्यांत
भरडूनी पीठ केलं [illegible] ॥ मग आला पंढरपुराला, दर्शनी
विठोबा फोडला, गर्वानं बोलला त्यावेळां, किती मूर्ख हिंदू हे
भोळा, माजलेला देव दगडाला, आतां कुठं रे तुमचा देव गेला,
असं बोलला खान आपणाला, दाढीवरनं हात फिरवीला ।
पर तिकडं [illegible], शिवाजीच्या अंगी भवानीचा संचार आला ॥
देवीनं दृष्टांत दिला, शिवबा ! दे बोकड बळी हा मला, भिऊं नको
उभी मी पाठीला सदा साह्याला ॥

चा.प्र. १) शिवराया प्रतापगडीं, आहे या घडी, कळतां तातडी, खान सैन्यासह
तिकडं वळला । मुलूख उध्वस्त करीत सुटला, पोचला येऊन
जावळीला ॥

चा.प्र. ६/३ कराव.) कृष्णा कोयनेच्या खोऱ्यामाजीं । बहु दाट जंगल वनराजीं ।
झाडी वेलीरे ती गगनभेदी, आंत शिरेना सूर्यकिरण कधीं,
अशा जावळीच्या त्या राजीं, किल्ला प्रतापगड जेथे भवानी, मार्ग
बिकट खान गेला भारुनी, करता वेढावा किल्ला याठिणीं, कांहीं
कळेना येईना ध्यानीं, तोंच इकडे श्री शिवरायांनीं, इथेंच
लढण्याचे ठरवोनी, अफझलखानाची केली जुळणी, केली पहा
कशी सैन्य मांडणी, सांगतो सारी, ती सुपर्ण व्यूहापरी ॥

चा.प्र. १) प्रतापगडच्या पायथ्याला, खान त्यावेळां, सैन्यासह आला ।
पण, राजा शिवराय मात करणार, शेराला सव्वाशेर भेटणार ।
ठकाला महाठक भिडणार ॥ २ ॥

॥ मोहीम ३ री ॥

चा.क्र. ७ भेदीक न. १) पश्चिमेस किल्ल्याच्या ठेविले वीर मोरोपंत पिंगळ्याला ।
वीर कृष्णाजी पवार सूपेकर देऊन त्याच्या साथीला ॥
पायदळ सारे कोंकणातीं घोडदळ देऊन नेताजीला ।
सज्ज ठेविले त्याला तेव्हा सह करण्या वाईवर हल्ला ॥
कान्होजी जेधे वीर राहिला कोयनेच्या त्या तीराला ।
स्वतः संग तानाजी मालुसरे घेतला शिवाजी महाराजा ॥

चा.क्र. १) कृष्णाजी नामे ब्राह्मण, खास सांगीन, खानाचा जाण, वकिल ।
शिवाजीनं त्यास कथिलेस, सांगे तो जाऊन अफझूलखानास ।
शिवाजी भ्यालाय फौजी आपणांस ॥

चा.क्र. २) पंताजी गोपीनाथ वकील, खानाचा वकील हुशियार ॥
खानाचा कृष्णा वकील, दोघांचा झाला वीचार ॥
खानाची आणि शिवाजीची, व्हावी भेट प्रतापगडावर ॥
त्यांतील डाव खानाचा, सांगितले कृष्णाजीनें सारं ॥

चा.क्र. ६ करावक. ३) प्रतापगडच्या माऱ्याखालीं, जागा भेटीची त्यांनी ठरविली, फत्ते हुजरे दोन याव घेऊनी, सेजासारी दूर ठेऊनी, भ्यालाय शिवाजी मेल्यावाणी, अशा तऱ्हेचा फांसा टाकूनी, मारला गळाला ओढला शिवबानीं, स्वागत करण्याच्या निमित्तानीं, पचवीस हजार मावळे यांनी, ठेवले कामावर मजूर म्हणूनी, मैले दांडगे खंदक खणुनी, मोठमोठाले वृक्ष तोडूनी, वीर मावळे हत्यारे घेऊनी, हिम्मतबहाद्दर बसती लपोनी, आला नेताजी वाई कडूनी, म्हणून वाईचा रस्ता बनवुनी, मार्गे हे त्याला रत्नागड करूनी, चक्रव्यूह असा तेव्हां रचुनी, वेळ भेटीचा, मांजातो धैर्य सत्याचा ॥

चा.क्र. ८ दांगटी) मग विचार केला शिवबानं, याचा पाहून अफझूल खान, आधींच पाहिलेला असला चांगला, म्हणून वेष पालटून त्या वेळां, बहिर्जी नाईक रंग घेतला, कधीं तो होई तमाशेवाला, कधीं कधीं शाहीर गोंधळी बनला, कधीकधी भीकी भिकारीही झाला, वाचा जाई घेऊन भाजीपाला, असा रोज रोज क्रम चालला, परी नाहीं खान त्याला दिसला, ना ऐकला होता दावा ॥

॥ मोहीम ३ री (चालू) ॥

चा.ध्रु. १) एके दिवशी आंबे घेऊन, डोईवर जाण, चालला जलदीनं, आंब
घ्या आंब, आवाज दिधला । वेष कसा घेतला ऐका बावळा ।
शिवाजी शोभे खरा भावका ॥ ३ ॥

॥ मोहीम ४ थी ॥

चा.ध्रु. ७ अदीक ३) कंठी काळा दोरा पायामध्ये जाड जूत व्हाणा । घेतला शेतकरी बाणा ॥
काळी कांबळी आंगावरती लपाळी ते भोळे । डोई मुंडास पगडबंद ॥
कमरेभवती जाड कासोडा घालून लंगोटी । डोईवर आंब्याची पाटी ॥
गेला विकाया श्री शिवराया धर्माच्या साठीं । खरोखर राष्ट्रकार्यासाठीं ॥

चा.ध्रु. १) शंकराजी मिळाचा वेष, घेतला तो सोदिश, येई जलदी, शिवाजी
शंकराच्या [illegible], आहला कोयना नदीच्या पार,
तोंच काय घडला ऐका प्रकार ॥
घोड्यावरती स्वार होऊन, छाती काढून, अफझुलखान,
शिकारीस चालला होता राजास, पाहिले त्यानं आंबेवाल्यास,
मोठ्या गर्वानं बोलला त्यांस ॥

चा.ध्रु. २) मारीतो हांक जोराने । लंगोट्या थांब जाग्यास ॥
दे आंबे सगळे इकडे । सांग तूं कुठे चाललास ॥
भ्याल्याचे करून सोंग । शिवबानं आंबे दिले त्यास ॥

चा.ध्रु. ३) आंब्याच्या मिषानं खानाला ठेवला पाडून ॥
तो इकडे खानानं दिले वचन मोडून ॥
आणिले संगे दोन हजार सैन्य तयानं ॥
परी करून वश कृष्णाजी पंता शिवबानं ॥
म्हणे पाहून खानाला गेलो आम्ही घाबरून ॥
कृष्णाजी पंत खानाला सांगे जाऊन ॥
म्हणे भिवलाय शिवाजी तुमचं नांव ऐकून ॥
हो गया शिवाजी दीन बोलला हंसून ॥

चा.ध्रु. लगाव ४) मग फक्त दोन वीरांना, एक सय्यद बंडा जाणा, अफझुल्ला आला त्या
रानां । मंडपाची शोभा अपूर्व ठेवा तुम्ही ध्याना ॥

:-

॥ मोहीम ५ वी (चालू) ॥

(चा.क्र. ६ कराव ५) भव्य मंडपाची रचना झाली, तंबू राहुट्यानीं गर्दी केली, झाडे तोडून जागा केली, तक्के लोडाजें बैठक सजली, मऊ गालीचे रेशमी झाली, नानाप्रकारें रांगोळी काढिली, छोटी छोटी कारंजी बनविली, गुलाब पाणी अत्तरें शिंपीली, गडबड सडबड कुठेंही नुरली, स्वारी खानाची दुलतच आली, थाट पाहुनी मनीं हर्षली, शराब ऊंची ठायीं ठायीं ठेवली, मेवा मिठाई तर बहुत आवडली, अशी शिस्त न्हेवा कधीं न पाहिली, अशा थाटांत, पोचला येऊन मंडपात ॥

(चा.क्र. १) मंडपात अफझूलखान, पोंचलौ येऊन, त्याचदिणीं जाणं, गडावर झाला काय चमत्कार, शिवाजीस जाहला साक्षात्कार, भवानीचे दर्शन झाले साकार ॥ ४ ॥

---

॥ मोहीम ५ वी ॥

(चा.क्र. १) इकडे ऐका प्रतापगडावर, भरला दरबार, जमले सरदार थोर, बोलपरी वीर तानाजी सुभेदार, ऐक शिवराया माझा विचार, प्रसंग हा आणाजरी बेपार ॥
नाहीं ओळखत खान बाजुका, म्हणून यावेळां, जाऊद्यां भेटीला, देई मज तुझा पोशाख भरदार, संधी साधून करतो त्याला ठार, नाहीं तर आहे खुलं स्वर्गाचे दार ॥

(चा.क्र. २) ऐकून बोल तान्याचे । गहिवरें शिवाचें मन ॥
म्हणे धन्य धन्य बा वीरा । तव कीर्ती गातील सुजन ॥
परी ऐक एक सुभेदारा । हा शत्रू माझा बा! खान ॥
हा शत्रू देश धर्माचा । आणि एक आहे कारण ॥

(चा.क्र. ३) माझ्या थोरल भावाला यानेंच करून कपटास ॥
मारीले ठार, म्हणून शत्रू भोसल्यांचाच खास ॥
कर्तव्य माझेच हे, ठार करणें खानास ॥
त्यासाठीं मीच गेलें पाहिजे अशा कार्यास ॥

(चा.क्र. ६ कराव – ४) दुसऱ्यांनीं संकटी जाणं, आमच्यासाठीं देणं, योग्य नसे म्हणून, मीच जाणार, जाणार, मायभवानी आमुची पाठीराखी असणार ॥

॥ मोहीम ५ वी (चालू) ॥

तूं आणि शिवा महाला, माझ्या संगं चला, आज साह्याला, हीच एक आस, अरे आस, देऊंया बोकड हा बळी भवानी आईस ॥

शिवबाचे बोल ऐकून, जिजाईचं मन, गेलं गहिंवरून, बोलली बाळाला, बाळाला, शाब्बास बाळ आबासाहेब, वीर शोभला ॥

चा. क्र. १४) शोभतां तुम्हीं खरें शिसोदे वंशाला, राजपूत चितोड घराण्याला ॥
त्या पद्मीनीनें लावून्या बारा पुत्रांला, धाडिले चितोड रक्षणाला ॥
संगरीं तयें अर्पिले रक्षणाला, निजहूनी भाग्य मम बोला ॥

चाल बदलून — सांबारा पुत्रांपेक्षाही, एकुलता बाळ मम पाही, आहे श्रेष्ठ त्रिकालीं ग्वाही ॥
चा. क्र. १४) जा होईल तुला विजय प्राप्त शिवराया, मम बोल ध्यानीं घे सखया ॥१॥

चा. क्र. ३)
कदाचित आली देवाची अवकृपा जरी ॥
जाहले कांहीं कमी जास्ती भेटीमधीं तरी ॥
मागली चिंता करूं नको मुळीच अंतरीं ॥
मी वीरकन्या, वीरपत्नी, मातांही खरी ॥
पटवीन हे जगाला बाळा जाण परोपरी ॥

चा. क्र. १) असं म्हणून उठली जिजाबाई, राष्ट्राची आई, गर्जली पाही, तेज विलक्षण चमके अपार, जणूं जगदंबा करी संचार, मुखांतून झाला काय उच्चार ॥
होशील विजयी तूं बाळा, भिऊं नको काळा, खोडवी गळा, हिंद मातेचा नरखन खान ठार, विलंब नको निघून जाई सत्वर, भवानी माय तुला आधार ॥ ५ ॥

---

॥ मोहीम ६ वी ॥

चा. क्र. १) आशिर्वाद आईचा घेऊन, पोषाख घालून, तयार झाला जाण, शिवाजी जाण्या गडाखालीं, घेऊनी दोन वीर वीर्यशाली, जयविजय जणूं तशा कालीं ॥
चा. क्र. ७ भेदीक-५) अंगामाजीं चिलखत साध्या वस्त्र जाळीदार, रुमरी बंडी त्यावर हो, बंडी त्यावर, तंग अंगरखा चोळदार ॥ हो ॥
डोईवरती पोलादाचे जाड शिरस्त्राण, त्यावरीं साफा चढवून, हो, साफा चढवून जरीचा चढाव पायीं जाण ॥ हो ॥

॥ गीत ६ वी (चालू) ॥

मुसेजरी ती तुमान तंगदार जरी कलाबूत, रेशमी गोंडे झळकत, हो गोंडे झळकत गळ्यामध्ये ओमो रुळतीत ॥ हां ॥
गुप्त हत्यारें बांधलयेल तीं ज्याच्या हातांत, बिचवा ऊजव्या अस्तनीत, हो, ऊजव्या अस्तनीत, भवानी ज्याच्या कमरेवरतं ॥ हां ॥

चा.क्र. १) अंबेच घ्याया दर्शन, गेला जलदीनं, हात जोडून, प्रार्थना करी भवानीला, प्रसाद दे माते तूं या बाळा, भीत मी नाहीं काळीकाळा ॥

चा.क्र. ४ लगट) मला नाहीं भय मरणाचे, एक वेड हिंदमातेचे, राष्ट्राच्या स्वातंत्र्याचे, घेऊनी ध्यानीं स्वप्नं उराचे, गुरुआवरती मार सपेस्वी बोल सत्याचे ॥

चा.क्र. २) ऐकून वाणी शिवबाची, संचार भवानीचा होत ॥
शिवमुखें वदली जगदंबा, घेई लिहून बाळाजी पंत (चिटणीस) ॥

चा.क्र. ३) म्हणे देवी शिवबा तूं शंकर मी पार्वती ॥
परी आज माय तव पाही तारवी संप्रती ॥

चा.क्र. ४ लगट) भवानीचं करून दर्शन, प्रसाद तिचा घेऊन, जिजाईला करून वंदन, आशीर्वाद तिचा घेऊन, शिवराया चालला निघडीनं, तानाजी जिवाजी दोन, चालले संगतं जाण, सुरू झाला डंका नौबत धडाड धुडुम ॥

॥ नौबत ॥

दुडुम दुडुम नौबत, वाजली, दुडुम दुडुम नौबत ॥ धृ ॥

अंतरा) चालला छत्रपती राणा, अहो राणा, शिवभूप गडाखालीं जाणा, अहो जाणा, रणभेरी वाजे दणदणा, दणदणा, दुडुम दुडुम नौबत, वाजली, दुडुम ॥१॥
स्वातंत्र्य देवी जय बोला, अहो बोला, जय माय भवानी बोला, अहो बोला, जय शंकर तो शिवभोळा, अहो बोला, दुडुम दुडुम नौबत, वाजली, दुडुम ॥ २ ॥
स्वातंत्र्या देती आणा, अहो आणा, ते पुरुषखरे जगीं जाणा, अहो जाणा, रक्षितात क्षात्रियबाणा, अहो बाणा, दुडुम दुडुम नौबत, वाजली, दुडुम ॥ ३ ॥

चा.क्र. १ उतरली स्वारी गडावरती, गंभीर वृत्ती, समर्थ उक्ती, भालदार चोपदार करती जयजयकार।

॥ छत्रपती श्री शिवाजी महाराज की जय ॥ ॥६॥

॥ मोहीम ८ वी ॥

चा.क्र. ७ भेदीक - ६) येऊन संग सय्यदबंडा, दावण्या शिवाजीला दंडा, बांधी हातामधें गंडा
अफझूलखान। जीवा महाला शिवाजी ही, येऊं लागले लवलाही,
जीव-शिव जोडी पाही, गहिंवरून ॥
कोयनेपारून जावळीला, छानदार रस्ता केला, स्वागतकरी त्याचें
मावळां, कपटानें। कुणी घाली हार गळां, कुणी दावी नाना खेळां,
देती कुणी एकच प्याला, भरभरून ॥
खूष झाला अफझूलखान, बोलतसे गर्वानें, वाणिकासी तेव्हां जाण,
गेला भिऊन। पहाडका चूहा भेला, शिवाजी हा काफर झाला, धाडतो
आतां स्वर्गाला, मुंडी मारून ॥
बदलून) जय चाले माझीच वाट, काय माझ्यासाठीं हा थाट, तोंच आला शिवाजी नीट,
भेदीक ६) यावं यावं शिवराज, पराक्रम तुमचा साज, पाहून आलो खूष आज,
तुम्हांवर मी। चला आतां विजापुरीं, देऊं तुम्हां सरदारी, शिवाय
मोठी जहागिरी, बहु नामी ॥
कडकडून मिठी मारी, मुंडके त्याचें दाबून धरी, मजी म्हणे ढेकणांपरी,
टाकतो चिरडून। धृतराष्ट्र भीमा जसा, हस्तिनापुरांत तसा, प्रसंग
आला बांका खासा, घ्या बघून ॥
मस्तकांत आली कळ, शिवाजीला दावी बळ, हीच म्हणे ठीक वेळ,
अफझूलखान। उपसूनी कट्यार, बरगडीत त्याच्या वार,
सुपरसण्याचा यत्न कर। चपलाईनं ॥
बदलून) कपटासी करितसे कपट, शिवराया सर्जा तो धीट, सोडवूनी मुंडी आटोकाट,
भेदीक ६) करूनिया चपलाई, बिचवा काढून लवलाही, पोटामध्यें त्याच्या
पाही, खुपसून। आतड्यांचा त्याच्या गोळा, पोटातून बाहेर
काढला, खान म्हणे अल्ला अल्ला !, ये धांवून ॥
परत्यानें जलदी करून, आपली तलवार उपसून, वार केला
शिवाजीवर, त्यानें जोरानें। चुकवुनी शिवबानें वार, केला उलट
प्रहार, भवानी तलवार, परजून ॥
बदलून) अफझुलखान पडला धरणीला, कृष्णाजी ब्राम्हण धांवला, शिवाजीला ठार करण्याला,
भेदीक्र. ६) पाहतां ब्राम्हणासी, म्हणे शिवराया त्यांसी, कां रे! प्राणघात करसी, आपुल्या
तलवारीसी आतां नको म्याज, होईल मला ब्रम्हहत्या, करूं नको अशा कृत्या,
घे ऐकून ॥

॥ मोहीम ७ वी (चालू) ॥

बदलून भेदीक ५ ) बाजूस सरला ब्राम्हण, आला सय्यद बंडा धांऊन, शिवाजीवर हात उचलून। वार आतां करणार, तोंच आला शूर वीर, जिवा महाला नरवीर, तेव्हां धांऊन, वरच्यावर याचा हात, फक्त एकाच घावांत, कलम केला हातो हात, मोठ्या आवेशात ॥

बदलून भेदीक ५ ) होतां जिवा म्हणुनिया शिवा, बोलला इतिहास पहावा, राष्ट्राचा जगाविला ठेवा। अफझूलखान आला ठार, सय्यदबंडा केला गार, शिवराया जिजाईचे। पाय धरुन, म्हणे हरेकृष्ण जबर, अहे! खानशाहा मातब्बर, आले चकाजिया ठार, तुझ्या कृपेनं ॥

चा. प्रा. १ ) तो धन्य धन्य शिवराय, धन्य जिजामाय, भवानी साह्य, धन्य ती वंद्य भवानी तलवार, धन्य हा भारत धर्म साधार, धन्य शाहीर धन्य होणार ॥ ७ ॥

दीक्षित क्रांती शाहीर, भिलवडीकर, कृष्णेचे तीर, महाराष्ट्रांत वस्तीचे धाम, शहर सांगली तयाचे नाम, करितसे राष्ट्रसेवा निष्काम ॥ (श्रीगणेशचतुर्थी शनिवार दि. १०।९।८३. र.द. दीक्षित पुणे)

(कवी:- ) ॥ वीरात्मा ॥ चाल. मुजरा घ्या महाराज ॥ (र.द. दीक्षीत)

चंद्र कधी येणार, उदयां, सुभाष कधी येणार ॥ ध्रु० ॥

परदास्याची काळरात्र सरली, स्वातंत्र्याची उषा पसरली।
चंद्र दिसेना घोर नभ मंडळी, धीर कुठवरी जन धरणार ॥ १ ॥

मतामतांची रणे माजली, मानवता हि जनीं पोळली।
कोण तुझ्याविण अखंड भारत, सांग सुभाषा तं करणार ॥ २ ॥

सिध्द असे तव आझाद सेना, देशासाठी द्याया प्राणां।
कदम कदम ती बढ रही जाणा, उणीव एक ती तूं नसणार ॥ ३ ॥

एक महात्मा निघुनी गेला, दुजा गुप्त जरी कोणी झाला।
प्रकाश देई सकल हृदीं पण, जन नयनां या कधीं दिसणार ॥ ४ ॥

तोंच एकला योग्य चीआता, हिंदभूमीच्या पालिस तत्तां।
फक्त एकदा येई मारुता, घेई सुभाषा अजि अवतार ॥ ५ ॥

दि. १३।९।८३ मुक्काम वाडा (जव्हार) जि. ठाणे र.द. दीक्षित.

॥ श्री ॥

( श्रीमंत युवराज फत्तेसिंह महाराज गाईकवाड बडोदा यांचे )

॥ वाढदिवस प्रसंगीं, अभिनंदन कवी:- शांतीशाहीर ग. द. दीक्षित ॥

चा. क्र. ७ भेदीक - ५ बहुत चढविला तव विचारशील काव्यालंकार, युवराजा फत्तेसिंह थोर ;
आज आला परी योग, तुला चढविण्या अलंकार ॥

गुर्जराधिपती महाराजांचे प्रतापसिंह उदरी, जन्मुनी श्रीमंत विसीवडोदरी,
महाराणी त्या शांतादेवींची कुशी उजळली खरी ॥

चैत्र मासीं ये ... पडवा ... थोर दिनीं, त्याच मासींच्या शुक्ल पक्षीं,
चंद्र चतुर्थीला जन्मुनी ... राज्य दीक्षा ॥

चा. क्र. ७ भेदीक - ५ गाईचे कारण्या रक्षण, तुझ्या पूर्वजांनें, जंदाजी पाटलानें, लावले गाईकवाड, हे नाम ॥१॥
यास्तव पहिले नांव बदलुन, आम्ही होजाण, आज हे जाण, गायकवाड ॥२॥

चा. क्र. ६ कटाव - ४ तव पूर्वज पराक्रमी फार, दमाजी थोर, गाईकवाड वीर, पेशवाईत
गाजले रणधीर ॥

पुढें पहिले सयाजीराव, गाजले नांव, जनीं पहावें, पुढे श्रेष्ठतम
खंडेराव ॥

चा. क्र. ७ भेदीक - ५ त्यांचे नंतर जगद्वंद्य असे तिसरे सयाजी नृपती, गाजले अरवील
महीवरती, इंग्लंड, अमेरीका, फ्रान्स, जर्मनी, जयास वाणिती ॥

त्यांचे पोटीं तुझे आजोबा फत्तेसिंह वीर, जन्मुनी ... हे नगर,
फत्ते मिळवुनी या जगतीं ते आले पहा अमर ॥

पिताजी तव प्रतापसिंह, विचारी समय ओळखून, करिती पहा राज्य
चतुराईनें, जग हे जाई पुढें तुम्हीही पहावें निरखून ॥

चा. क्र. ७ भेदीक - ४ ज्याचे नांव ऐकतां थोर, पडतसे घोर, शत्रूला फार, असे वीर धन्य ॥३॥
त्या थोर पुरुषांचें कन्या, साथ तव धन्या, कोणी नच अन्या, तयां समजाण ॥

चा. क्र. ६ कटाव - ४ शांतादेवी महाराणी, दक्ष राजकारणीं, प्रजापालनीं, तव माय श्रेष्ठ ध्यानीं ॥

चा. क्र. ७ भेदीक - ५ हो दीर्घायू, सर्वांमनीं ही एक असे आस, आजच्या वाढदिवसास,
चंद्र कलेपरी तुझ्याही कला वाढो दिसादीस ॥

॥ गीत ॥

युवराज, युवराज, युवराज, जय हो जय युवराज ॥ धृ० ॥
उत्साहानें नगरीं बडोदरी प्रमुदीत हो आजला, सर्वे दीर्घायू, मंगल
इच्छूनी, करिते स्वागताला, पशुपक्षीही एक रवानें गाती कीर्ती तव साज,
जय हो फत्तेसिंह महाराजा जय हो जय युवराज ॥ १ ॥

:-

॥ गीत बांधू ॥

राजर्षी नृप सयाजीरावांचे सद्गुण तव अंगीं, पूर्ण बडोदे, विद्येची ये
आजला पाही सृष्टी, पूर्वजांचे औदार्य, धैर्य, पुण्याई लाभी तुज आज।
जय हो भारत जय हो युवराज फत्तेसिंह महाराज ॥ २ ॥
पारतंत्र्याची तोडुन बेडी ही भारतमाता, स्वतंत्र झाली माय आपुली जाग
बाळ आतां, रक्षण करणें आतां तिचे असे आपुले काज, ठेवा ध्यानीं
तुम्हीं महाराज फत्तेसिंह युवराज ॥ ३ ॥ दि. १३।१२।६३. नवापूर.

॥ महात्मा ॥ कवी : शाहीर जी. डी. दीक्षित.

ललकार, ललकार, ललकार, जय गांधी ललकार ॥ धृ० ॥
म्हणती गांधींना कुणी सॉक्रेटीस की येशू खिस्त आजला, परी पटेना
मुळींच आम्हां, कारण एक तयांला, मृत्यू नंतर ठरले महात्मा, ते दोघे
साधार, परी ठरला हा इह जन्मींच या महात्माची साकार ॥ १ ॥
कुणी गांधीजां देती गौतम बुद्धाची उपमा, परी जवांटे सार्थ शाहीरां
ऐका त्याचा महिमा, ठरे महात्मा बुद्ध सोडितां प्रपंच नी घरदार।
प्रपंच साधून परमार्थांतून झाला गांधी साकार ॥ २ ॥
अशोकापरी महान सम्राट बुद्धशिष्य होई, तसा इथें जनहृदय सम्राट
जवाहिर साधी वेई, आचरील जो मार्ग तयाचा तो महात्माची ठरणार।
परी ठरला हा इह जन्मींच या महात्माची साधार ॥ ३ ॥
पूर्ण शांतीने करी स्वर्गांवरी स्वारी बुद्ध भगवान, तसा महात्मा जगत
चाहीने पुसण्या ईश्वराजाण, काय चुकले मम हिंदू मुस्लीमां भाजियले
मी प्यार, म्हणुनी ठरला इह जन्मींच या महात्माची साधार ॥ ४ ॥
हिन्द भूमीतील पराक्रमाचें महाराष्ट्र हे स्थान, दिला तयाने गांधी महात्म्या
तुज स्वर्गींचा मान, तूंच तयांला दिली असावी प्रेरणा ती साचार।
म्हणुनी ठरला इह जन्मींच या महात्माची साधार ॥ ५ ॥
करितो श्रद्धांजली अर्पण हा क्रांतीशाहीर ही छान, दीक्षित नामें
मिरवितो जगतीं गातो तव गुणगान, अखंड शांती लाभो तुम्हां
स्वर्गीं राहो संचार, घ्याहा मुजरा माझा शाहीरी जय गांधी ललकार ॥ ६ ॥
नवापूर. दि. १३।१२।६३

॥ श्री दत्त प्रसन्न स.ज.स्वा. महाराज की जय ॥

॥ पोवाडा :- अखंड हिंदुस्थान ॥

॥ कवी :- राष्ट्रशाहीर ग. द. दीक्षित निलंगीकर (सांगली) ॥

चा. क्र. १) थोरांचे सर्वही थोर, असा व्यवहार, खास होईतर, माकडचेष्टाही कां
न असणार, गोरगरिबांचे हाल होणार, शाहीरदीक्षित कथन करणार ॥ धृ० ॥

चा. क्र. ७ मेदीक-३) सूर्यवंशी या विष्णुभक्त तो राजा अंबरीष, जयश्री कन्या याची सरस ॥ हो ॥
पुन्हां जन्मली मृत्युलोकावर हिंदभूमी नांव, पिता पर्वत हिमालय ॥ हो ॥

चाल) रूप काय सांगू दिसे आयना, मुखावर तेज तिच्या माइना।
लागले वेड कितीक तरुणा। खलिफ तैसेची परकियांना।
हिंदु मुसलीम आस्पृश्यांना, गोऱ्या इंग्रज युरोपियना।

चा. क्र. हिंजार) नेसली वनश्री शालू पहा काश्मीर, ती जंगल झाडी माथी केशसंभार।
नद्यां, ओढे, नाले हे जणूं बिंदी बिजवर

चाल क्र. २२) लहान मोठीं डोंगर टेकडी, शालूवर खडी, तिच्या सुंदर।
शालूचे कांठ ते हिंदी महासागर ॥
अशी कन्या पित्याच्या अंकी, दास्याच्या पंकीं, लोके पूंवर।
तों आली आपत्ती कशी एका तिजवर ॥

चा. क्र. १) एके दिवशीं पर्वत इच्छी, समाचारासी, येता समयांसी, मोहूनी
गेले तिच्या स्वरूपास, विसरले आपला सर्व संज्ञ्यास।
आला लज्जाना, विचार मजों खास ॥

चा. क्र. २) पर्वत ज्याची ते कोण, जरा इकडे धावं हो ध्यान ॥
पूर्वीचे रूप बदलून, आपलेच वैरी होऊन ॥
पूर्व जन्मी दाढी मिशाच्या, कटाक्ष आला म्हणून ॥
आले करून क्लीनशेव्हींग, डोळ्यांस चष्मा लावून ॥
त्यांचं नांव घ्यावं ऐकून, डॉक्टर आंबेडकर जाण ॥

चा. क्र. ३) इतक्यांत नारदजनंची पोचले येऊन ॥
तंबोरीचा सूर जिथं लागला मोठ्या जोराने ॥
पूर्वजन्मीं त्यांच्या औडींचे आले बिंबन ॥
म्हणून नारदमुनींने तिला चार देऊन ॥
हजवटीवर विचार विनां बराली दाढी होऊन ॥
सिगारेट जळीची तंबोरी मुखांमधीं घेऊन ॥

:-

॥ प्रवेश १ ला (चालू) ॥

चा.क्र. दांगटी ८) येतांच हिमालयानं, पुढे होऊन, स्वागत केलं त्याच वेळां, परंतू पाहतां जयश्रीला, नारद भांबावून गेला, ब्रह्मचारी परंतू गडबडला, मदनाचा जोर अंगी चढला, लग्नाचा विचार ठाम केला, त्यांच्यासी कसला ब्रह्मचारीही फसला, गा. ऐका म्होरं दादा ॥

चा.क्र. १ कुंकवाची उठाठेव जरी, विधवेला तरी, ऐकावं स्वारी, बाजलं पाहातांच बाळंत व्हायची, असते रीत कांही माणसांची, ऐकावी कथा नारदाची ॥ १ ॥

---

॥ प्रवेश २ रा ॥

चा.क्र. १) राजाच्या कानीं लागून, तेव्हां नारदानं, केला प्रश्न, जयश्री सासरहून आली काय, किंवा कुमारीच अजून ती हाय, सांगतो राजा नारदाला काय ॥ नारदाचे पुढे पुढे करणें, कानीं लागणें, मस्का लावणें, आवडले नाहीं पर्वत ऋषी यांस, म्हणून नारदाच्या दाढीला खाज, धरून ओढले त्यानं समयांस ॥

चा.क्र. २) आम्हीं इथले मूळ रहिवासी, ऑबाजिजीज म्हणती आम्हांस ॥
शिवाय आलो अयोगें नाही, म्हणून प्रथमाधिकार मज खास ॥
म्हणे सांग अंबरीष राजा, जयश्री काय आली माहेरास ॥
कथिलें मग अंबरिषानें, असे कुंवार या समयांस ॥

चा.क्र. ३) म्हणे पर्वत ऋषी तो, आहे प्रथम वर मीच ॥
म्हणूनिया कन्या जयश्री घ्यावी मजलाच ॥
नारदमुनी सांगे आहे मी पण प्रथमवरच ॥
घालतो मागणी ऐसरीती परी साच ॥

चा.क्र. दांगटी ८) होतांच आमुचे लग्न, स्वारी मी जाण, नाव हिचं ठेविन पाकिस्तान, बोले मग पर्वत ऋषी गुणवान, नाव ठेविन मी अस्पृश्यस्तान, प्रसंग असा बांका रेऽऽ महान, नारद तर म्हणतोय पाकिस्तान, पर्वत ऋषी म्हणे अस्पृश्यस्तान, अंबरिष म्हणे अखंड हिंदूस्तान, शाहीर म्हणतो ऐका ध्यान, तुम्ही आता दादा ॥

चा.क्र. तवा सवाल केला राजानं, कन्या मम छान, अती गुणवान, वरील स्वयंवरी योग्य वरास, शूराचे भेटी मिळेल शूरांस, कसे मिळणार सांगा इतरांस ॥ २ ॥

॥ पॉंक ३ रा ॥

(चा. क्रं. ६ भेदीक - ९) बडा मुत्सद्दी नारदमुनी तो गेला थेऊनी विष्णूकडे ।
ध्यान विष्णूचे कसे होते सांगतो लक्ष द्या तुम्हीं इकडे ॥
पंचा खादीचा होता नेसला हातीं सुदर्शन तो चरखा ।
गरगर गरगर फिरवूनी देई इंग्रजांचे हृदयीं चरखा ॥
गोऱ्यां साहेबाला पाडीत होता स्वर्गी सुतानें टकळीच्या ।
बंद पाडिल्या गिरण्या तयानें सा ऱ्या गव्हेरनरच्या ॥
नांव तयाचे गांधी महात्मा तोची आणा विष्णू भगवान ।
नांव होते नारायण परंतु होता दरिद्री नारायण ॥

(चा. क्रं. १) पोचला नारद त्या स्थळां, धूप घातला, तंबाखूचा मळा, लाघी विष्णूला खूप मस्का, कावेबाज स्वार्थसाधू पक्का ।
बॅरिस्टर जीना नारद खरं कां ॥
जाणिले चित्तीं विष्णूनं, आलाय कामानं, माहित होऊन, बालब्रम्हचारी आलाय घ्यायाला, म्हणून पसरतोय मायाजाळ, सोडला या दाढीवाल्यांनताळ ॥

(चा. क्रं. २) मग प्रश्न केला नारदाला, म्हणे सांग नारदा त्वरित ॥
झाहला काय बाजारी। आज मस्का भयंकर स्वस्त ॥
काय कंट्रोल बसले त्यावर। असें काय घडले अकस्मात ॥
नारद म्हणे योग लग्नाचा। आला जुळून माझ्या निश्चित ॥

(चा. क्रं. ३) हिमालयाची कन्या हिंदभू जयश्री छान ॥
तय्यार आहे वरण्यास मला आज पण ॥
पर्वत ज्ञरषीनं आडवा पाय घालून ॥
लग्नात आमुच्या पहा आणिले विघ्न ॥
तरी तिनें मलाच वरावे असेंकरा भगवान ॥
म्हणे विष्णू असें तिला सांगणारा मी कोण? ॥
आजकालच्या मुलीं काय असती सांग रे सान ॥
घोड जवळ्या एकापरी एक दुसरीवर ताण ॥

(चा. क्रं. सांगरी) म्हणे नारद सांगतो युक्तीला, स्वयंवर वेळां, पर्वत ज्ञरषीला, करावे माकड तोंडया त्यास, मान्य केले विष्णूनं त्या सख्यांस, नारद मग गेला लक्ष्मीकडे खास, लग्नासाठीं दागीने मागावयास, विष्णू जर दरिद्री नारायण खास, कस्तूरबा लक्ष्मीखरी पणत्यांस, देणार काय दादा ॥

॥ चौक ३ रा (चालू) ॥

दिंडी ) इकडे पर्वत ऋषीही मेला, विष्णू कडे आला, बोले सानयाला, स्वयंवरा-
पुरते नारदाला, काळतोंड्या हुप्या करावा त्याला, विष्णूनही कबूल
केलं त्याला, मजी मुळे पाहूया गमतीला, दोघांच्याही दादा ॥
चा.क्र. १ ) भगवान गांधी महात्मा, हिंदभू आत्मा, जेईल सुखधामा, जयश्री
त्यालाच माळ घालणार, स्वयंवर पुढील चौकीं होणार,
चला उठा! कोण? कोण? येणार ॥ ३ ॥

---

॥ चौक ४ था ॥

चा.क्र. १ ) दुसरें दिवशीं मांडले स्वयंवर, जयश्रीचं थोर, म्हणून सत्वर, दोघेही
नटून आले मंडपास, एक लाल दुसरा काळतोंड्यारवास, हासती
दोघे एकमेकांस ॥
तवा प्रश्न केला जयश्रीनं, अटी मम मान्य, कराल तरीच जाण, करीन
मी विचार लग्नाचा, नाहीतर व्यर्थ वेळ तुमचा, दवडून जाईल
तो साचा ॥
चा.क्र. ६ करावे-६/८ ) मी भाकरी आज जिव्हाळ्याची, प्रसिद्ध या जगीं, कामकाजकांहीं, हो, नाहींकरणार ॥
माझी तुलसी बहीण भारतभूमी, तिच्यापरीच मी, बनुनिया नामी,
पैशान वरणार ॥
झाडी जंगलापरी केशभार, कटींग हेअर, बॉब्ड करणार, हो,
सत्य साचार ॥
चा.क्र. ३ )
आगिनगाडी रुळाचा कमरपट्टा करणार ॥
मंगळसूत्र तारायंत्राचे गळ्यांत बांधणार ॥
माझें नांव माहेरचे नाहीं बदलूं देणार ॥
स्वातंत्र्या विना मी कुंकू मुळीं न लावणार ॥
पाकिस्तान अस्पृश्यस्तान मला मान्य नसणार ॥
चा.क्र.४ लगट ) असं म्हणून हात जोडून, विष्णूचे करितसे ध्यान, धांव रे प्रभू
तूं धांव आतां भगवान ॥
चा.क्र. ७ भैरवी-५ ) धांवत येई श्री प्रभूरायाचा मन बोले कठीण, आपुली दासी
मी दीन, दीन वत्सला गांधी महात्म्या ये बा! नारायण ॥
प्रल्हादास्तव प्रगटुनी स्तंभीं नारसिंह रूपानं, द्रौपदीस वस्त्रें पुरवून,

॥ चौक ६ वा (चालू) ॥

कौरव मंदिरीं श्री तूंच केलें ना माझें अब्रू रक्षण ॥
सावंत्याची भाजी खुडली कबिराचे शेले विणून, जनीच्या संगे दळण दळून, नामदेवाचा हट्ट पुरविसी प्रसाद भक्षून ॥
रुक्मिणी साठीं धांवत गेलासी गवळी वेष घेऊन, मोहुनी टाकसी कुंजवन, आजच देवा मला रक्षणें तुला काय कठीण ॥
सोलापुरला कीचक वधिला भीमा हातून, बार्डोलीला लढाई लढवून, शिरोड्यास तो खेळलासी बा! रणाचे रंगण ॥
चा. क्र. ६ कराव - ६) एकोणिसशें तीस सालाला, देऊन संदेशाला, गेलास दांडीला, हो, तूंच ना रे देवा ॥
जवाहीरा करिसी वारस, हिंद तरण्यास, हरवुनी ग्रास, हो, तूंच ना देवा ॥
चा. क्र. ६ कराव - ४) एकोणिसशें बत्तीस सालाला, जाशी इंग्लंडाला, शिष्टाई करण्याला, गोलमेज परिषदेला ॥ (राऊंडटेबल परिषद)
खादीचं तत्व पटवून, स्वावलंबन, मार्ग तो छान, जगा दावून, दाविसी चरखा फिरवून ॥
चा. क्र. १) भक्तांचे करावया काज, रक्षण्या लाज, अजू तो आज, सांगा कां नाहीं धांवत येणार, येई घेऊन भक्तां कैवार, ऐका शाहीर पुढें गाणार ॥४॥

॥ चौक ७ वा ॥

चा. क्र. ६ कराव - ५) मिळूनिया दोघींही जयना, करी प्रार्थना, तेव्हां दोघांना, वाटले काय?, आपणांलाच घालते माळ वाटते हाय! ॥
त्या आजराच्या आंत, दोघांनीही बरीत, टुणकन खाचेत, उडी मारीली, एकमेकां मिठी मारून चुंबिती गाली ॥
चा. क्र. दांगटी ८) इतक्यांत पातला विष्णू, कस्तूरबा म्हणू, सुदर्शन चरखा फिरे हातीं, टकळीवर सूत स्वतः काती, पाहिली जयश्रीने मूर्ती, घातली माळ याच वर्ती, घेऊनीया तिला विष्णू मूर्ती, जाहली गुप्त जाणा चित्ती, वानर माकडांची झाली फजीती, ध्यानीं घ्या दादा ॥
चा. क्र. १) म्हणे पर्वत ऋषी नारदा, आली आपदा, गेली संपदा, आहे तो कुठे जयश्री-बाला, वानराचाची आवाज तूं केला, म्हणून गेली पळून भिऊन बोला ॥

॥ चौक — ला (चालू) ॥

चा. क्र. ३ ) एकोणिसशें बत्तीस सालीं तूंच केलास घोटाळा ॥
राऊंडटेबल सभा उधळून लावली त्या वेळां ॥
पाकिस्तान ट्यूमर जाहला तुझ्या मेंदूला ॥
सन एकोणिसशें पंचेचाळीस सालाला ॥
परिषद भरली ज्यावेळीं जाण सिमल्याला ॥
फिसकटवण्या वेव्हल योजना कारण तूंच झाला ॥
पर्वतऋषी म्हणे व्यर्थ दोष देतोस मला ॥

चा. क्र. ४ लगट ) स्वतंत्र मतदार संघाची, चळवळ सांग कोणाची, ही कॉंग्रेस आहे हिंदूंची, अशी भाषा होती कोणाची, गांधीवरती चौदा प्रश्नांची, कुणी फैर झाडली त्याची, जो गांधी झटतो करण्यास उन्नती तुमची ॥ असं असून आयत्या वेळेला, तुम्ही दगा दिलारे त्याला, म्हणून ऐका माझ्या शापाला, पर्वत होऊन पडशील दक्षिण प्रांताला ॥ मग पर्वत ऋषींजही शाप दिला नारदाला ॥ वानरासारखा आवाज त्यां दिला, म्हणून वानर होऊन फिरशील सतत जंगलाला ॥ तुला स्वतःचे घरदार, कधीं नाहीं करतां येणार, माकडांचे राज्य आज पर, तूं माणसाळलेला वानर, तरी कुणीं न जवळ करणार, इतक्यांत जयश्रीसह आले विष्णु खरोखर ॥

चा. क्र. १ ) घालूनी हातामधें हात, पाहता अवचित, खवळले पित्त, नारद विष्णूलाही शाप देणार, ब्रह्मचर्याचा करशील आचार, बंधूनो करा आता विचार ॥ ५ ॥

---

॥ चौक ६ वा ॥

चा. क्र. १ ) त्यां कन्या अंबरीषाची, पळवली साची, म्हणूनिया त्याची, वंशामधें पुन्हा घेशील जन्मास, तुझीही पत्नी पळवील शत्रू हमखास, हंसू आवरेना भगवंतास ॥
म्हणे नारदा ठीक बोललास, येईन जन्मास, त्याच वंशास, जाण तो पुढील राम अवतार, शाप तुझा तेव्हां खरा होणार ॥
तूर्त तुम्हीं करा तुमचा विचार ॥

चा. क्र. २ ) असं म्हणून स्वतः विष्णूनं, आणवून आरसा एक ॥
आरशांत पाहूनी मुखडा, दोघेंही जाहले थक्क ॥
:-

॥ चौका ५ वा (चालू) ॥

करी माफ आम्हां भगवंता, जाहली आमुची चूक ॥
धापिले विषय जादाजें, कामाची लागूनी भूक ॥

(चा. क्र. ४ लावट) तंवा सवाल केला विष्णूनं, आज जरी तुमच्या भांडणानं, माझी वधू मिळाली मज जाण, तरीच राम अवतारी पण, तुम्हा दोघांच्या मदतीनं, माझी वधू (पत्नी) मला मिळणार असो ध्यान ॥ बंधूजो ध्यावं ऐकून, हिंद-भू सीता गुणवान, पळविली इंग्रज रावणानं, म्हणूनिया एक होऊन, सोडवण्या गांधी विष्णूला साह्य करू छान ॥ अन रामरूपी जवाहिरलाला करू अर्पण ॥ नका बोलू पाकिस्तान, नका म्हणू हो अस्पृश्यस्तान, तें आपणा सर्वांचे अखंड हिंदुस्थान ॥

(चाल क्र. १) कवी-गणेश शाहीर दीक्षित, राज दरबारांत, आहे विलसत, तरी तो भारत भूमीचा दास, मानितो सत्य अहिंसा मंत्रास, अर्पितो हे कवन गांधी महात्म्याला ॥ ५ ॥ (पुनर्लेखन)

(शुक्रवार दि. २३।९।८३ मु. नागपूर C/o एन.के. गीजरे केळीबाग रोड स.नं. ५५८ महाल नागपूर. क्रांतिशाहीर रघुवीर दीक्षित चिंचणीकर)

---

पद:- मुजरा घ्या महाराज, युवराज, कवी - क्रांतीशाहीर ग. ह. दीक्षित.

(चाल - सुभाष कधीं येणार, परतुनी)

मुजरा घ्या महाराज, युवराज ॥ धृ० ॥
गोमातेचे रक्षक म्हणुनी, यशगंगा ती ज्यांची अजूनी,
दुथडी वाहे भारत भुवनीं, त्याच कुळीं तूं विलसशी आज ॥१॥
अमूल्य हेवा गाईकवाडांचा, पुण्यश्लोक श्री सयाजी नृपाचा,
असुचे भावी गुर्जराधिपती, शोभती फत्तेसिंह युवराज ॥२॥
राष्ट्र ध्येय हो साध्यची आतां, मतामतांचा परि हा भंवता,
माज गलबला जाणुनी चिंता, घेई शिक्षणा योग्यची आज ॥३॥
आश्रित असे मी बडोदा दरबार, माळव्यांत देवास सिनियर
कर्नाटकामधें राज्य सोंडूर, मानकरी जरीपट्टा कट्यार ॥४॥

दि: २३।९।८३ नागपूर

---

॥ श्री ॥

॥ सद्गुरु जयराम स्वामी महाराजकी जय ॥

## ॥ पोवाडा — स्वातंत्र्य सिंहासन ॥

॥ कवी : क्रांतीशाहीर ॥ चौक १ ला ॥ ग. द. दीक्षित चिंचणीकर (सांगली) ॥

चा. क्र. ३० साकी) १९) बेच्याळिसच्या क्रांती लढ्यामधें पांडव शौर्ये लढती ।
गोऱ्या कौरवां जर्जर करुनी चलेजाव ला करिती ।
मिळाला विजय पांडवांला, एकोणीसशें सेहेचाळीस सालां ॥ १ ॥
धर्मराज काँग्रेस भीम तो वल्लभभाई सरदार ।
अर्जुन जवाहिरलाल, नकुल ते खानसाहेब स्वेर ।
सहदेव आझाद मौलाना, जमले विचारार्थ एकस्थाना ॥ २ ॥
हिंदी जनता ही दीन द्रौपदी कृष्ण सखा परमात्मा ।
चरखाधारी हिंदभूआत्मा तोची गांधी महात्मा ।
करुनिया साह्य पांडवाला, मिळवुनी दिले स्वराज्याला ॥ ३ ॥
चरण वंदुनी श्रीकृष्णाचे पांडवबंधू पुसती ।
कसा करावा राज्याभिषेक सांग आम्हा या वक्तीं ।
तुझ्यावरी आसे पूर्णनिष्ठा । तूंच जगीं थोर वीरश्रेष्ठा ॥ ४ ॥

चा. क्र. १) मग बोले सखा कृष्णराज, हिंद-शिरताज, पूज्य गांधीराज ।
चतुर भारतीय स्त्रियांनी थ्यार, सिंहासन आधींच केले तय्यार ।
सरोजिनी नायडू मुख्य साधार ॥
मुहूर्त राज्याभिषेकाचा, उत्तम त्याचा, सांगतो साचा, एकोणीसशें सत्तेचाळीस सालांस, पंधरा तारीख ऑगस्ट महिन्यास, कृष्ण जन्माच्या सांधा समयांस ॥

चा. क्र. २)
होतांच आज्ञा कृष्णाची, सजविले हो सिंहासन ॥
असा योग हिंद देशाला, आला जमून दीडशें वर्षानं ॥
टिळकांनी घातला पाया, चढविला कळस गांधीनं ॥
स्वातंत्र्य मिळविले संपूर्ण, सत्य, शांती, सेवा, अहिंसेनं ॥
सुरु झाली पहा धामधूम, उगवतां हो स्वातंत्र्यदिन ॥

चा. क्र. ५ कटाव — ३) मंगलवाद्यें झडू लागली, तोफांची सरबत्ती उडाली, गुढ्यातोरणें ध्वज झळकली, तिरंगी झेंडे उडती आभाळीं, दल सेनानी सिध्द राहिली, बालरवीनें प्रभा फांकली, हिंदभूमाता विभवे नटली, अशा सुमंगल प्रात:काळीं, पांडव मंगलस्नान करोनी, :—

॥ भाग १ ला (चालू) ॥

शुध्द स्वादींची वस्त्रं नेसुनी, सिध्द जाहले चढण्या सिंहासनी, तोंच द्रौपदी हिंदी जनता ती, केस मोकळे पाठीवरती, गाली मळवट भरून येई ती, थरथर थरथर क्रोधें कांपती, वदली कृष्णाला, खोहळा कसला मांडियला ॥

॥ पद ॥

कृष्णा योग्य कां? धर्मास हा अभिषेक आजच्या वेळीं पहाना।
पुत्रांस तो माझ्या बळी देऊन आला ना ॥ ध्रु० ॥
तुकडे पहा मायभूचे, कराचीयासाचे, विजयी म्हणवून, पुत्रांस ॥ १ ॥
देऊन उशाला साप, आपोआप, पाकिस्तान, दिले तोडून, अर्धकरी हा निजपुत्राचे दादो मिरा उतरून ॥

चा. क्र. ३ हा उत्सव कसला असें अर्ध माझ्या पुत्रांचे ॥
हे कसले सिंहासन थडगे माझ्या बाळाचे ॥
मी निपुत्रिक करें भूषवूं सिंहासन त्याचे ॥
हा धर्मराज नसें योग्य बोल सत्याचे ॥

चा. क्र. ६ कराव-५ द्रौपदीची वाणी ऐकून, गोपालकृष्ण, चरखा सुदर्शन, फिरवूनी हातीं, बोलला भगिनी तव वचन मान्य मज अती ॥
पाहे अगदीं गहीवरून, जवाहीर रत्न, पूर्ण दृष्टीनें, करे वनवीले, मगकरी द्रौपदी, हिंद भू बाळे ॥ १ ॥

---

॥ भाग २ रा ॥

चा. क्र. ६ कराव-२ नवखाली आज कलकत्यास जेजे झाले ठार, तुझे पुत्रवीर थ्यार, त्यांच्या देहाच्या साचार, याला पायऱ्या केल्या मजबूत, जी दिसती कमळें अद्भुत, सिंहासनीं तुझ्या अळकात ॥
दुष्ट गुंडवासनेला बळी (पडल्या) ज्यासती, तेव्हां नवखालीमती, पतीव्रता सुमती, त्या बनल्या तारका आकाशीं, देहांच्या तयांच्या स्वाशीं, पुष्पमाला घातली आसनासी ॥
चा. क्र. १ हिंदू शीख बंधु जे प्यार, लढविले समर, तळहातीं शीर, घेऊन अमृतसर गुजराणवाला, त्यांचे दोन खांब सिंहासनाला, भक्कम असती पहा आजला ॥

:-

(२६)

॥ भाग २ रा (चालू) ॥

जे दिसते सिंहासनावर, चक्र गरगर, सतत फिरणारें, खूण चाफेकर बंधूंची खास, भगतसिंग राजगुरु सुखदेव खास, काजेरे कवेही विलसती यांस ॥

चा. क्रं. २) सिंहासनाचा मुख्य आधार, तें लोकमान्य टिळक ॥
पाठीशीं यांस धरणारें, सारें हिंद वीर निःशंक ॥
म्हणूनीच हे सिंहासन, मजबूत जाहले देख ॥

चा. क्रं. ३) त्यापासोनि लालजी लाजपतराय काढली वेलबुट्टी ॥
ही पहा तयांची सुंदरशी कलाकृती ॥
वरमुगुट बोजयाचा झळके जो सांगती ॥
तोंच याग सावरकर बंधूंचा निश्चिती ॥
खालीं सिंह दोन तें टिळक पुत्र ओळखती ॥
"केसरी न मराठा" प्रसिद्ध साऱ्या जगतीं ॥
पाठीवरती आगरकर रेशमी झूल घालती ॥
"सुधारक" पत्राची पहा भरजरी कृती ॥

चा. क्रं. ४ (लगट) आहे भव्य अमर सिंहासन, नव पुत्र अमर होऊन, चमकती पहा यांतून। यांच्याच बलिदानानें, होआपा पांडवाना हा स्वातंत्र्यदिन ॥

द्रौपदी म्ह.) पण कृष्णा! योना राज्याभिषेक करण्यास तसाच लायक पुरुष नको कां?

कृष्ण म्ह.) ती सर्व व्यवस्था मी केली आहे.

चा. क्रं. ९) न्यायरत्न विनोद धुंडीराज, पुरोहित साज, योग्य असे आज, साथ त्या धारे गुरुजी मम खास, पुरवितील साहित्य अभिषेकास, शाहीरी वाणी सत्य मम खास ॥

चा. क्रं. ४ (लगट) करूनिया अशी तजवीज, पांडवानासांगे हितगुज, श्रीकृष्ण गांधी महाराज, करा आनंद सोहळा तुम्हीं आज, मी जातो नवखालीस, शांतता निर्माण करण्यास, आणि गेला निघून त्या आर्तीमहात्मा खास ॥
कृष्णाचे वचन मानून, जवाहिरलाल अर्जुन, वल्लभभाई भिमानें, सहदेव नकुल साथानें, कॉंग्रेस धर्माला केला राज्याभिषेक छान ॥ तोंच आणा पंधरा ऑगस्ट स्वातंत्र्यदिन ॥ द्रौपदी ही भूषवी सिंहासन। याची साक्ष देतो पटवून, हिंदुसभेच्या डॉक्टर मुखर्जीनींही समय जाणून ॥

भाग २ रा (चालू)

मंत्रीपद भूषविले करण्या राजकारण ॥
प्रार्थना देवीची करिती सर्व या ध्यान ॥

पद चाल :- ऑरिया मिळाके

भगवती देवी, हस्त शिरीं ठेवी, दीन जनांया ॥ ध्रु० ॥
त्यागानें लढलें समरीं, बंधुभाव चराचरीं, तीच त्यागमूर्ती, वसो सदा चित्तीं, हिंद जनांया ॥ १ ॥
झाल्याही होतीलही, चुका सुधारून घेई, प्रभू कृष्णलीला, कळो अवध्याला, हिंद जनांया ॥ २ ॥
कवी क्रांतीशाहीर, दीक्षित चिंचणीकर, बास सांगलीला, जिय त्याचा बोला, कृष्णा तीरीं या ॥ ३ ॥ (मंगळवार दि. २७।९।८३ नागपूर)
(लावी . देवास दरबारं शाहीर ग. द. दीक्षित चिंचणीकर)

पद :- जयहो जय परमार ॥ चाल :- जयवंत, यशवंत, गुणवंत, परमार, परमार, परमार, जयहो जय परमार ॥ ध्रु० ॥
अग्नीकुलोत्तम अरवराजी तूं, विक्रमसिंह महाराज ।
देवासीच्या सिंहासनीं नृप शोभसी पहा तूं आज ।
प्रेमदृष्टीनें अवलोकिती तुज पूर्वज तुकोजी परमार ।
ऊठ विक्रमा, चल करवीरीं जय हो जय परमार ॥ १ ॥
उठे भयानक अग्नी तिकडे क्रांतीलन्हीं अंगार ।
तूंच एकला संकटकालीं शांत तया करणार ।
पाहती वरुनी राजर्षी शाहू, राजाराम नृपती ।
येई करवीरीं आशीश वदती जय हो जय परमार ॥ २ ॥
राजकारणी माता तव ती छत्रपती कन्या ।
विद्वान मंडित पिता तुकोजीराव जाहलास धन्या ।
प्रेमळ पत्नी शमिलाराणी पुत्र कृष्ण परमार ।
प्रजा गर्जते एकमुखानें जय हो जय परमार ॥ ३ ॥
न्यायरत्न तें विनोद मजला भूषविती साधार ।
दिव्य क्रांतीचा संदेश देई तूं क्रांतीशाहीरा साचार ।
यश करुनी तव पूर्वज मिरविती 'दीक्षित' नांवानें थोर ।
त्यापरि करुनी आत्मयज्ञ तूं सेवा करी परमार ॥ ४ ॥

——————::—————— दि. २७।९।८३

॥ सद्गुरु जयरामस्वामी महाराज कीं जय ॥

॥ विक्रमालंकार ॥ कवी : कवी शाहीर ग. द. दीक्षित चिंचणीकर (सांगली) ॥

श्रीमंत विक्रमसिंह महाराज पवार राज्य देवास सिनियर यांचे वाढदिवस प्रसंगीं.

चा. क्र. ७ भेदीक ५) किती चढविला आजवरी म्यां काव्यालंकार, तुम्हांसी, पवार सरकार,
शब्द न उरले आज आवया उपमा अलंकार ॥ ध्रु० ॥
काय द्यावी उपमा तुम्हांला कांहीं सुचेना आज, विक्रमसिंह महाराज,
परी चढवितो नविन अलंकाराचा तुम्हां साज ॥
सांब सदाशिव म्हणों तुम्हां जरी जंगलांतत वसती, तुम्हीं तरी आहां राज्यतक्तीं,
नसे योग्य ही उपमा तुम्हीं तर भावी छत्रपती ॥
श्रीरामापरी तूंही बालपणीं भोगलासी वनवास, म्हणावे श्रीराम तुम्हा प्रतीं खास,
नको कल्पना वनवासाची या शुभ समयांस ॥

चा. क्र. ७ भेदीक ४) तूं अग्नी कुलोत्पन्न वीर, म्हणूं आजीं जर, सूर्य बरबर, विक्रमराया, विक्रमराया ॥
देशीं न ताप त्यांपरी, जनां तूं तरी, उपमा ना बरी, म्हणून हीसदयां, म्हणून हीसदयां ॥

चाल क्र. ७ भेदीक ७) जर म्हणूं चंद्र स्वर्गीचा, शांत भू त्याचा, वर्षाव अमृताचा, त्याला ही डाग आहे त्याचा ॥

चाल क्र. ७ भेदीक ५) इंद्र स्वर्गीचा म्हणेन तुम्हां जर पराक्रमी थोर, त्यासही जिंकिले तो वीर,
इंद्रजीत म्हणुनी या उपमा ही न बरोबर ॥
तुम्हां लागीं जिंकील असा कुणी जसे महीवर, ध्वज तंव लालेलाल थोर, फडफड करुनी सांगे अजिंक्य हा पृथ्वीपती पुंआर ॥
चितोड राणा समरसिंह जरी तुम्हां म्हणावे तर, ठरला तोही अपेशी थोर। इंग्रज जर्मन युद्धांत मिळविले तुम्ही सुयश थोर ॥

चाल क्र. ७ भेदीक ४) जर म्हणावे राजे शहाजी, पराक्रमी गाजी, परी ते राज्यीं,
नव्हते अभिषिक्त, नव्हते अभिषिक्त ॥ हां हां जि रं जी ॥
तुम्हां तरी राज्य अभिषेक, जाहलासे चोख, करिसी बिनधोक,
राजकाज आज, राजकाज आज ॥ हं हां जी रं जी ॥

चाल क्र. ७ भेदीक ५) आहे मान छत्र चामरांचा, छत्रपतींचा भाचा, म्हणून ही वाचा,
जर म्हणेल छत्रपती त्याचा ॥
तरी राज्याभिषेकावांचून, छत्रपती वदणं, ठरेल कसे मान्य,
मती गेली माझी गुंगून ॥ :-

॥ विकमालंकार ॥(चालू)

तुम्हां राजश्रेष्ठ दुष्यंत, उपमा ही सार्थ, दिसते पण यांत, अडचण आहे भारत ॥

चालक्र. ७ भेदीक ५) कवी कालिदासाची योग्यता नसे माझे ठायीं, उपमा ती ही बरी नाहीं, मती खुंटली लेखणी थटली वर्णू पुढें कांई ॥

परी सूर्याप्रती दीपज्योतीनें ज्यापरी ओवाळीती, त्यांपरी तुम्हांलागीं सांप्रती, नत कीर्तीप्रकाशें ओवाळीन शाहीरी पंचारती ॥

सर्व शब्द भांडारच तुमचे, उपमाही तुमच्या, करितो अर्पण तुमचे पायां, शाहीर तुमचाच, वाणीही तुमची, तुमचीच ही काया ॥

व्हा दीर्घायू पुत्र पौत्रांसह हीच मनीं आस, करुनी आपल्या वाढदिवसांस, कीर्ती वाढू दे, चंद्र कलेपरी तुमची जगतांस ॥

आशीर्वच मम "छत्रपती भव" पवार सरकार, घ्यावें हातीं राज्य करवीर, तुम्हींच वारस सिंहासना त्यां कशासी मग उशीर ॥

क्रांती शाहीर वदती जनीं मज परी राज्यभाट, देवासचा खरा राजनिष्ठ, वेळ क्रांतीची आली उधळूनी जेव पत्र नीट ॥

आता तरी जा करवीर तख्ता भूषवी महाराजा, सांभाळी ती ही दीन प्रजा, जातांना परी सांगून जावें आपुल्या कृष्ण राजा" ॥

दरबारींचा आश्रित आपुल्या दीक्षित शाहीर, त्यापरीच राज्य सोंडूर। कृपा तयांवरी बाळराजे तुम्हीं ठेवा निरंतर ॥ समाप्त ॥

दि. ७।१०।८३ मु. नवापूर जि. धुळे. क्रांती शाहीर रघुवीर दीक्षित

॥ श्री दत्त प्रसन्न ॥

## ॥ चौफलाहार - फुलणी - संवाद ॥

कवी - शाहीर शं. द. दीक्षित चिंचणीकर ( सांगली )

॥ भाग १ ला ॥

चाल क्रमांक भेदीक → ७/८ | नामदेव कीर्तन करी पुढे देव नाचे पांडुरंग, पुढे देव नाचे पांडुरंग, जनी म्हणे बोला देवा नामदेवा अभंग ॥

चा. क्र. ५ कटाव - ५ | श्री चंद्रभागेच्या तिरीं, प्रसिध्द नगरीं, पंढरपुरीं, विठूरायाची, रायाची, जाहली यात्रेला गर्दी संत महंतांची ॥

एके दिवशीं संतांचा मेळा, आला तिथं गोळा, अपूर्व सोहळा, गजर नामाचा, नामाचा, परि नव्हता प्रसन्न पांडुरंग विटेवरचा ॥

पांडुरंग :- काय ज्ञानेश्वरा! यंदा यात्रेला गर्दी फार कमी दिसतेय? माझ्यावरची लोकांची भक्ती कमी झाली कीं काय?

ज्ञानेश्वर :- छे! छे! देवा! यात्रा कमी आली, म्हणून भक्ती कमी झाली असं नाही. त्याला वेगळंच कारण आहे.

पांडुरंग :- तें कोणतं रे?

ज्ञानेश्वर : चा.क्र. ७ भे. ५ | एक विठ्ठला इंग्रज जर्मनी युध्द आड येई, वाहनाची सोयमुळी नाहीं, शिवाय इंग्रजी कायदे न्यारे न्यारे ऐका नवलाई ॥

जमून एकत्र करतील राजकारण अशी थोर भीती, इंग्रजी कुटील राजनीती, येऊ देईना यात्रेलाही देवा असून भक्ती ॥

पांडुरंग :- अरे! माझे भक्त काय येवढे भेमळे आहेत? अरे! त्यासाठीं तर यात्रांची योजना आहे. दिंड्या पताका हा नुसता देखावा आहे.

ज्ञानेश्वर पण देवा! हल्ली लढाईमुळे जिकडे तिकडे रेशनिंग सुरू झाले आहे ना, आपलं सरकार काय करतंय? ऐका!

चा. क्र. ७ भेदीक ४ | चांगले चांगले उत्तम धान्य, जाती घेऊन, फौजेच्यासाठीं, फौजेच्यासाठीं, हं ॥ नासके कुचके देती लोकांला, म्हणुनीच बोला, कॉलऱ्याची भीती ॥ हं ॥

चा. क्र. ७ भेदीक - ७ | महामारी उपद्रव होई, खालोसात पाही, म्हणूनीच यात्रा आली नाहीं ॥ तीच तऱ्हा आगिनगाडीची, मोटारगाडीची, तिकिटाची मारामार होई ॥

पांडुरंग :- (हंसून) अरे! काय वेड्यासारखी समजूत घालतोस माझी! मागें एकदां एका राजानं, समुद्राचं पाणी आडवायचं म्हणून, केरसुणी आडवी लावली होती, त्यांतलाच हा प्रकार आहे. पण मग इतके लोक तरी कसे आले रे?

॥ चपलाहार (चालू) ॥

ज्ञानेश्वर :- देवा हे लोक आले खरे ! पण यांचे काय हाल आलेत तें त्यांनाच माहिती. तो शेतकरी काय सांगतोय, ते ऐक.

(चा. क्र. ३१)

॥ पद ॥

आगीनगाडीवाला रं चालला, भारीच मस्तवाल झाला, रं झाला ॥ ध्रु० ॥
देऊन पैसा आगगाडीला, लावावी बारी तिकिटाला, नाहीं काळवेळ
मुक्कीं त्याला, जवो जको याना बिटूला होई असं त्याला, रं त्याला ॥ १ ॥
आली बंदी मोटार गाडीला, आग लागली बैलगाडीला, ह्या इंग्रज इंजिन-
वाला देवा, फुगला रं फुगला ॥ २ ॥
सरकारी कायदा झाला, चार चौघं एका जाग्याला, जमल्यास म्हणती
आम्हीं धाडू तुम्हांला तुरुंगाला, रं तुम्हांला ॥ ३ ॥
जरी त्यातनं पंढरपुरीं आला, लागे बारी तुझ्या दर्शनाला, पोलीसांचे
धपाटे खायाला, उपासाच्या दिवशीही मिळती फराळाला ॥ ४ ॥
जरी त्यातनं आंत यो आला, बडव्या धरून झाली मानेला, आपटतो तुझ्या
पायाला, दाणकन आवाज बघ होतो टणू डोक्याला, रं आला ॥ ५ ॥
शिवाय भीती चोरा चिलटांची, चंगराचेंगरी बायकापोरांची, प्राणहानी
आमित जीवांची, काय भक्ती असून उपयोग सांग या वेळीं ॥ ६ ॥

पांडुरंग :- अरे ! पण भक्त तरी कोणकोण आलेत ?

ज्ञानेश्वर :- सांगतो ऐका !

(चा. लावणी क्र. ३२) एकनाथ, निवृत्तीनाथ, सोपान, मुक्ताबाई, सजन कसाई जनाबाई रे,
नामदेव गोरा कुंभार, नरहरी सोनार, चोखामेळा महार, कबीरही ॥

पांडुरंग :- अरे ! सगळे भक्त आले, पण अजून रोहीदास कसा आला नाहीं ?

ज्ञानेश्वर :- हां, देवा, तो पहा रोहिदास यायला लागलाय !

(चा. क्र. ३२ अंतरा) तोंच रोहिदास चांभार, एक गठ्ठा घेऊन पाठीवर, पोचला येऊन सत्वर,

पांडुरंग :- काय रे रोहिदासा, आज तुला एवढा वेळ कां लागला ?

रोहिदास :- देवा ! हल्लीं हिंदमातेनं माझ्याकडं एक महत्वाची कामगिरी सोपवली आहे.

पांडुरंग :- ती कोणती रे ?

रोहिदास :- चपलाहार तयार करण्याची. आणि त्यासाठीं फाटक्या तुटक्या चपला गोळा करीत गावोगाव भटकतो आहे. हा पहा केवढा गठ्ठा आणलाय !

॥ चपलाहार (चालू) ॥

पांडुरंग :- अरे पण हा हार तयार करणार कोण ?

रोहीदास :- देवा ! तुमचा भक्त नरहरी सोनार आहे ना ! त्याच्याकडून हा हार तयार करवून घे, आणि माझ्याकडे आण, अशी हिंद मातेची आज्ञा आहे.

पांडुरंग :- ठीक आहे. ठीक आहे. पण, मला आधीं हे सांग, हा हार कुणाला घालायचा ?

रोहिदास :- ऐका तर देवा।

(चा. क्र. ८ दांगटी) अति सुपीक असा या भारतात, बंगाल प्रांत, तांदूळ जास्त पिकविणारा, जिथं आज उपासमार बोला, असा बंगाल देश आपुला, ज्यानं इंग्रजांचे हवाली केला, अशा त्या नीच मीरजाफराला, चपलाहार देवा ॥

पांडुरंग :- अरे! पण हा दुसरा हार कोणासाठीं ?

रोहीदास :- भारताचे स्वातंत्र्य हरवण्यास, अबदाल्ली यांस, हिंदुस्थानांत आणवणाऱ्याला, सतराशें एकसष्ठ सालांला, पानपतावरच्या मैदानाला, महाराष्ट्राला रडवणाऱ्याला, नऊलाख बांगड्या फोडणाऱ्याला, अशा त्या नजीबखाज रोहिल्याला, चपलाहार देवा ॥

पांडुरंग :- अरे! पण या कोंकणी वहाणांचा हार कुणासाठीं ?

रोहिदास :- त्या अर्काटच्यावेढ्यांत, आणा ध्याजांत, खाऊनी कण्या स्वतःला, मळिदा ज्याजं चारलाय कुाईव्हला, कर्नाटक प्रांत सुपीक आपुला, ज्यानीं इंग्रजांच्या स्वाधीन केला, आमुच्या त्या हिंदी शिपायानला, या चपलाहार देवा ॥

पांडुरंग :- अरे! या ब्राम्हणी जोड्याची माळ कोणासाठीं ?

रोहिदास :- इसवी सन अठराशें आठराला, ज्यानीं ज्यानीं बोला, केलं इंग्रजांना राज्य दानाला, सन अठराशें सत्तावनला, झांशीच्या शूर लक्ष्मीबाईला, ठार ज्यानं केलं त्या इंग्रजाजला, रे चपलाहार देवा ॥

पांडुरंग :- पण कायरे ! हा मोठा गठ्ठा कुणासाठीं आहे ?

रोहिदास :- देवा, पंढरपुरला आलाय, आणि नुसतं कमरेवर हात ठेऊन उभा राहिलाय, जगांत काय राजकारण चाललय, याची तुम्हांला कांहीं दाद आहे कां ? ऐका ! हा मोठा गठ्ठा कुणासाठी आहे तें.

भारताचे गेलेले स्वातंत्र्य, पुन्हां आणण्यास, झटणाऱ्या आमच्या पूज्य गांधीजीला, लाल जवाहीर नेहरू याजला, :—

॥ चपलाहार (चालू) ॥

मौलाना आझाद वीरांला, अशा मोठमोठ्या पुढाऱ्यांजला, पकडून तुरुंगात टाकणाऱ्यांजला, तुरुंगात टाकल्यावरती बोला, एकोणिसशें बेचाळीस साला, ज्याजीं ज्याजीं संताप दारवविला, केलं विध्वंसकार्याला, अशानला पकडून देणाऱ्यांजला, आमच्याच फितुरांना, गा चपलाहार देवा ॥

पांडुरंग :- अरे! पण हा पंजाबी जोडा कुणासाठीं?

रोहिदास :- भगतसिंगासारखा क्रांतीवीर, राजगुरू धीर, सुखदेव थोर, फेडाज ज्याजीं शरीर तळहाताला, देशासाठीं फांस कंठीं वरिला, कोर्टामधें खटला जेवा चालला, त्यांतील माफीच्या साक्षीदाराला, चपलाहार देवा ॥

पांडुरंग :- रोहिदासा, अरे हे नवीन मॉडेल कुठून आणलेस? अन हे कुणासाठीं आहे?

रोहिदास :- देवा, ही नवी तऱ्हा सातार्याकडची हाय, आणि ती येड्याच्या नाना पाटलानं खास बनवली आहे. कुणासाठीं तें सांगतो ऐका!

चा. क्रां. दां. ( ) शेतकऱ्यांच्या मुंड्या मोडून, त्यांचे गळे दाबून, मुंड्या मोडून, आलेल्या शेठ सावकारांजला, गोरगरिबांना नाडणाऱ्याला, काळाबाजारकरणाऱ्याला, अशी सरकारची पत्री चपला, पत्री मारल्याली सातारी चपला, ऐका तुम्हीं देवा ॥

पांडुरंग :- छे, छे, छे छे, ज्ञानेश्वरा! आतां मला ऐकवत नाहीं रे. तूं आपला भजन सुरू कर पाहूं!

ज्ञानेश्वर :- भेदीक क्रां.

बोला आहे देवा ऐसी आपली आशा!

नामदेव कीर्तन करी पुढें देव नाचे पांडुरंग,

शाहीर दीक्षित होई तयाच्या भजनामधीं गुंग ॥

दि. २ ऑक्टोबर ८३ नवापूर. — क्रांतीशाहीर रघुवीर दीक्षित

## ॥ पोवाडा - चलेजाव ॥

कवी:- राष्ट्रशाहीर गणेश दत्तात्रय दीक्षित चिंचणीकर (सातारा)

चा.क्र. ६ कटाव-२) एकोणीसशें पस्तीस सालची राज्याची घटना, हिंदी संस्थानिकांना,
हिंदूसभावाल्यांना, तैशीच जाणा कॉंग्रेसला, आवडली नाहीं तरी
घेतला, बनवून मंत्रीमंडळा ॥
यत्न केला आधीं दारूबंदी ती करून, जागोजागीं शाळा काढून,
कुळकायदाही करून, जनतेवरी पाडला प्रभाव, दारू, अज्ञान
केले चलेजाव, कर्जपाणी केले चलेजाव ॥
जागृत झाली हिंदी जनता सारी त्यावक्तास, मानती कॉंग्रेसचे
तत्त्वास, होती भीती पण चित्तास, ब्रिटिशांच्याही जिवांत नव्हता
जीव, हरतऱ्हेची दाऊनिया भाव, संपत्ती केली चलेजाव ॥
चा.क्र. ६ कटाव-६) ठेविली नेऊन इंग्लंडास, आणा घ्यायास, सामील त्यांत फ्रान्स, करुनिया
डाव, हां, पैसा चलेजाव ॥
इटलीनंही ॲबिसिनियास, दाऊनी सोट्यास, स्वातंत्र्या स्वास,
त्यांच्या घालीं घाव, हां, करी चलेजाव ॥

चा.क्र. ३) जपानजंही घेऊनिया हातीं सोटा चलेजाव ॥
बहुतेक चीन देश तो केला चलेजाव ॥
हिटलरनें पोलंड देशाला केले चलेजाव ॥
बव्हेरिया ऑस्ट्रिया घेऊन केले चलेजाव ॥
हॉलंडच्या राणीला इंग्लंडास केले चलेजाव ॥

चा.क्र. ७ भेदीक-४) मग फ्रान्स आणि इंग्लंडला, दाऊन सोट्याला, काय बोलला, तुम्हीही
चलेजाव, तुम्हीही चलेजाव, हां ॥
असं पाहून रशियनही, करून चपळाई, देश तें कांहीं, केले
चलेजाव, केले चलेजाव ॥ हां ॥
चा.क्र. ६ कटाव-२) पडूं लागले बॉंब चलेजाव सोट्याचे, इंग्लंडवरतीही त्यांचे, दणाणले
धाबे इंग्रजांचे, कासावीस जाहला जीव, बायकापोरांना नव्हता
मुळीं ठाव, कॅनडात करती चलेजाव ॥ १ ॥

॥ भाग २ रा ॥

चा. क्रमांक ५ / कटाव - २

पाडून असा सोरा चलेजाव या समयास, अमेरीकाही सर्रास, गडगडली हो खास, इंग्लंडजेही करून धावाधाव, अमेरिकेचे पकडीले पाव, हिटलरला करण्या चलेजाव ॥

हिंदुस्तानलाही म्हणती जुनं ते विसरा, आणि दोस्ती करा, तसेंच सैन्यांत शिरा, तुम्हांवरती भिस्त ती सर्व, संकटी साह्य आम्हां द्यावं, शत्रूला करण्या चलेजाव ॥

भरती केले हिंदी वीर आपुल्या सैन्यांत, बळी द्यावया रणांत, आपल्या यज्ञाच्या कुंडात, हक्कावरती घातला असा घाव, कॉंग्रेसने वळखिली माव, आणि स्वतःच केले चलेजाव ॥

चाल क्र. ७ / भेदीक - ४

तों तिकडे वीर जपान्यानं, अमेरिकेची जाण, बैठें कांहीं लहान, केली चले जाव, केली चलेजाव ॥ हां ॥

जावा सुमात्रा घेतली जिंकून, पाडले रंगून, सिंगापूर पण, केले चलेजाव, केले चलेजाव ॥ हां ॥

चा. क्र. ५ / कटाव - २

महात्माजी, जवाहीर, आझाद, वल्लभभाई, तेव्हां जमले एके ठाई, विचार करुनी लवलाही, म्हणती पाहूंया सह्य यात काय, साम्राज्यतृष्णेची हाव, म्हणून म्हणती सारे चलेजाव ॥

अर्थाअर्थी युध्द नव्हे हिंदुस्थानाचे, आहे युरोपियनांचे, साह्य कशाला आमचे, वळखुनी इंग्रजांचो माव, अहिंसा टाकिला डाव, नको म्हणती युध्द, चलेजाव ॥

जनमेजय करी जसा सर्पयज्ञ महान, तसाच मांडी इंग्रज छान, त्यांत गरीब हिंदुस्तान, होईल जळून खाक जाण, इच्छाय तक्षकाय स्वाहा, एकमतानें केला ठराव, क्विट इंडिया ब्रिटीश चलेजाव ॥

ऐकून अशी वाणी आग तळपायाची, गेली मस्तकी त्याची, ब्रिटिश सरकार यांची, पकडुनी पुढारी सर्व, जुलुमांचा करून वर्षाव, तुरुंगात केले चलेजाव ॥

चा. क्र. ७ / भेदीक - ४

यामुळे झाला हाहाकार, देशामधें फार, धमाल आजिवार, आली धा ध्यान, आली धा ध्यान ॥ हां ॥

कोर्ट कचेऱ्याही जाळून, तुरुंग फोडून, केले पलायन, केले पलायन ॥ हां ॥

॥ भाग २ रा (चालू) ॥

चा. क्र. ३ ) किती पूल रेल्वेचे आले तेव्हां चलेजाव ॥
किती गाड्या पडुन मिलिटरी आली चलेजाव ॥
सरकारीं हत्यारें कितीक आली चलेजाव ॥
जुलमी आबकारशाही आली नष्ट केली चलेजाव ॥
सारा हिंद देश गर्जला ब्रिटिश चलेजाव ॥

चा. क्र. ४ लगट ) त्याचवेळीं सुभाषबाबूजी, ब्रिटिशजां तुरी देऊनी, विमानातून मोठ्या वेगानीं, धैर्यानं केलं चलेजाव आणावें ध्यानीं ॥

चा. क्र. ६ कटाव-२ ) पटले तेव्हां इंग्रजानां निःशस्त्र हिंदुस्तान, आहे नारसिंह रूप जाण, आमच्यावरी करी ताण, तरी त्यालाच रणीं ओढावें, स्वराज्याचं आमिष दावावं, जपान्याला करण्या चलेजाव ॥ २ ॥

---

॥ भाग ३ रा ॥

चा. क्र. ६ करावा-२ ) पाहून जर्मन, जपान्याचे वाढते अत्याचार, दावण्या पराक्रम थ्वार, आले संस्थानिक तय्यार, मायभूचा करण्या बचाव, ऐष आरामा म्हणती चलेजाव, हातीं घेती शस्त्र चलेजाव ॥
विक्रमसिंह वीर भूपती राज्य तें देवास, मिलीटरीत देवास, मनीं शौर्याची ती आस, इपाळे सरकार जतेचे विजयसिंह, जव्हार संस्थानचे यशवंतराव, असे कितीक संस्थानिक पहावं, इटलीला करती चलेजाव ॥
तों तिकडे ब्रम्हदेशीं सुभाषचंद्रान, आझाद सरकार स्थापून, उभारीले आझाद सैन्य, घातला बर्मावरी घाव, गडबडले इंग्लंड सर्व, आला कठीण प्रसंग अभिनव ॥
म्हणून कांहीं योजना देऊन क्रिप्स साहेबांस, खरी जपानी फुग्यास, म्हणती हिंदुस्थान को चलेजाव, कॉंग्रेसशीं सख्य करावं, आणि रणांत करावं चलेजाव ॥
धन्य गांधीबाबा, धन्य जवाहीरलाल, वल्लभभाई आलेलाल, सारा भारत बनला जहाल, करा स्वातंत्र्य बहाल, म्हणती एकच आमचा हा ठराव, आमचं राज्य आम्हांवर सोंपवावं, तुम्हीं क्विट इंडिया चलेजाव ॥

॥ भाग ३ रा (चालू) ॥

चा.क्र. ७ भेदीक - ४) तोब्रिप्स सायबाचा फुगा, रबराचा बधा, फोडला म्हणे निधा, करा चलेजाव, करा चलेजाव ॥ हां ॥
त्यामुळेंच ब्रिटिश सरकारानं, रशियाचं सैन्य, बळीं देऊन, हिटलरला जाण, केले चलेजाव, केले चलेजाव ॥ हां ॥
चा.क्र. (लगट - ४) लढून तयां परस्पर, आपण ठरले रणशूर, केला जपानचा चक्काचूर, लैं धूर्त जात इंग्रजांची घातकी खरोखर ॥ पराभव केला शत्रूचा ठरले बहाद्दर ॥ ३ ॥

---

॥ भाग ४ था ॥

चालक्र. ५ करावं २) जपानचाही मोड आला पंचेचाळीस साला, मिळाला विजय ब्रिटिशांजला, हिंदी सैन्याजेच दिला, पराक्रम बारूज जाणावं, दाविले शौर्य सद्भाव, जपान्यांचा केला पाडाव ॥
पाहुनिया मोहीम ही चलेजावची खास, मोठमोठ्या शहरांस, आनंद घरमालकांस, वाढू लागले जागेचे भाव, अधिक भाड्याची धरुनिया हांव, भाडेकरूस म्हणती चलेजाव ॥
गुपचूपपणें त्यांना नोटिसा देऊन, जागा हवी असं सांगून, बार करती पाठीमागून, भाडेकरूंवर घालती घाव, आम्ही मालक ध्यानीं हे घ्यावं, तुम्हीं एकदम करा चलेजाव ॥
कांहीं दिवस सासूचे तर कांहीं सुनेचे, ध्यानीं धरावें साचे, सांगतो बोल हिताचे, एक दिवस येईल जाणावं, तुमचं घर होईल लीलांव, आणि कराल तुम्हींच चलेजाव ॥
चा.क्र. ७ भेदीक - ४) इकडे व्हॉइसरॉय साहेबानं, मोठ्या आनंदानं, स्वदेशीं जाण, केले चलेजाव, केले चलेजाव ॥ हां ॥
करून भारतमंत्र्याशीं विचार, पुढारी सारं, तुरुंगाबाहेर, केले चलेजाव, केले चलेजाव ॥ हां ॥
चा.क्र. ७ भेदीक - २) द्यावया स्वराज्य त्यांना, हो, सिमल्याला जाणा, बोलावले सर्व पुढाऱ्यांना ॥ रामा हाजीरं ॥
एकीच्या मंत्र केला, हो, डाव चालून, परिषद भरविली जाण, रामा हाजीरं ॥

:-

॥ भाग ४ था (चालू) ॥

पण अडेलतट्टू एक त्यांत, हो, आडवायेत, लक्ष देऊन घ्यावं ध्यानांत ॥
रामादाजीरं ॥

चा. क्र. 3
बॅरिस्टर जिनानं एकीस केले चलेजाव ॥
म्हणून काँग्रेसजेही केली मुस्लीम लीग चलेजाव ॥
इंग्लंडातही पराक्रम दावी सोटा चलेजाव ॥
चर्चिलला मजूरपक्षानें केलं चलेजाव ॥
इवाडे ए. आय. सी. सीचा बाहेर पडला ठराव ॥
क्विट इंडिया नव्हे विचेट गेली या ब्रिटिश चलेजाव ॥

चा. क्र. ४ (लगट)
जसं मलम सोटा चलेजाव, गजकर्ण करते चलेजाव, तसा अहिंसा सोटा चलेजाव, काळ्या बाजारादी सारे जुलूम करील चलेजाव ॥
त्याला उपाय एकच काज, जवा होईल इथं इलेक्शन, काँग्रेसला मतं देऊन, आणा काँग्रेस पुढारी निवडून, अज करा परकिय सत्ता चलेजाव येथून ॥

चा. क्र. ६ करार-२
मोहीम अशी जगभर सोटा चलेजाव, करी अज्ञान चलेजाव, म्हणा सारें चलेजाव, शरीराचे ही दारिद्र्य चलेजाव, हाच यंग इंडिया ठराव, दीक्षितास मान्य चलेजाव ॥ ४ ॥

चा. क्र. १
दीक्षित क्रांती शाहीर, चिंचणीकर, कर्पूरगंगा तीर, महाराष्ट्रांत वस्तीचे धाम, शहर सांगली तयाचे नाम, संपला पोवाडा घ्यावा रामराम ॥४॥

र. द. दीक्षित नवापूर दि. ३।१०।४३

॥ भाऊबीज ॥

कवी :- राष्ट्रशाहीर ग. द. दीक्षित चिंचणीकर (सांगली)

॥ भाग १ ला ॥

चा. क्र. ७ भेदीक-५) एके दिवशीं हिंदमातेची नामदार स्वराज्यांत, असतांना उभी विचारांत, दोन पंच्यात्तर होत्या तेथें अखंड तेवत ॥
एक यमुनेनें यमरायाला भाऊबिजेला, ओवाळली अखेरवास त्याला, दुसरी द्रौपदीनें श्रीकृष्णाला बंधुरायाला ॥
इतक्यांमाजीं देवी सरोजिनी, अन विजयालक्ष्मी, पातल्या पहा तयां धामीं, भाऊबीज आज, 'माते' कोणा ओवाळावें आम्हीं ॥

देवी :- कुणाला म्हणजे? तुझ्या भावांना ओवाळ!

सरोजिनी :- चा. क्र. ३१ पद :- कोणास ओवाळूं मी, माते, कोणास ओवाळूं मी ॥ धृ० ॥
बंधू एकला सुभाष माझा, स्वर्गीं गेला सहजासहजा, त्रैलोक्याचा झाला राजा, भाऊबीज करी आम्हीं, करावी, कोणास ओवाळूं मी ॥१॥
करीत गर्जना जय जय हिंद, जय जय आझादी जय वीर हिंद, भारतीय वीरांगना जयहिंद, सौख्य चिरधामीं, अखंड, कोणास— ॥२॥

देवी :- अगं! एकटा सुभाष गेला म्हणून काय झालं? तुझे इतर बंगाली तसेंच भारतीय बंधू नाहींत काय? त्यांना ओवाळ.

सरोजिनी :- पण आई, त्या लॉर्ड मेकॉलेनं, बंगाल्यांना भ्याड, भित्रे असं म्हटलं आहेना! मी वीर बंधूंनाच ओवाळीन.

देवी :- अगं, लॉर्ड मेकॉले काय सांगतो! त्याला म्हणावं!
(पद) आज सहाशें तीन वर्सं, बंगाली बंधू मम खास, खिचपत असती तव तुरुंगांत, सत्तेचाळीस नामी, खरोखर, कोणास— ॥३॥

---

॥ भाग २ रा ॥

देवी :- शिवाय त्याला हे विचार!

चा. क्र. ८ दारी) दगडांतही असे खरा देव, झाडांतही जीव, सिद्ध केलं पहावं, असें जगदीशचंद्र बोस विख्यात, वाल्मिक टागोर रविंद्रनाथ, अरविंद घोष साधू संतात, रामकृष्ण परमहंस प्रख्यात, तयांचाच अंश विवेकानंदात, दास बंधू हे प्रसिद्ध भारतात, आणिक कोण होते घेई ध्यानांत, बंगालीच दादा ॥

:-

॥ भाग २ रा (चालू) ॥

अमृत बझार पत्रिका संपादक, लिहिणार रोखठोक, मोतीलाल घोष कोण असणार, बॅरिस्टर सेनगुप्ता लैय्यार, केलं ज्यानं आझाद सैन्य साकार, सुभाषचंद्र बोस वीर सरदार, शरश्चंद्र बोस बहुत हुशीयार, इंग्रजानी मान देऊन साचार, गव्हर्नर पहिला केला साधार, असा लॉर्ड सिंह कोण असणार, बंगालीच दादा ॥

(चा. क्र. ३)
याशिवाय तुझ्या बंधूंचे आझाद सैनिक ॥
हे तुझे देशबंधूच मानी निःशंक ॥

सरोजिनी :- खरच आई, हे माझ्या लक्षांतच आलं नाही. आतां मी याजांच ओवाळीन. देहाची पंचारती करुनी, ममत्वाचे तूप घालुनी, भगिनी प्रेमाची वात लाऊनी, नेत्र ज्योत ही नामी, ओवाळीन, मदीय बंधूस मी ॥ ओवाळीन आझाद बंधूना, बंधू प्रेमाचा हा मम बाणा, स्वर्गही यापुढे तुच्छची जाणा, भाऊबीज हीच नामी, ओवाळीन, मदीय बंधूस मी ॥ शाहीर दीक्षिताची वाणी, भाऊबिजेची गाते कहाणी, यंगइंडिया रेकॉर्ड कंपनी, संदेश देई नामी, घरोघर, मदीय बंधूस मी ॥ २ ॥

दि. ४।१०।८० जबापूर

॥ आरती - काँग्रेसची ॥ कवी - शाहीर दीक्षित सांगली ॥

(चा. क्र. ३२) आरती आम्ही सद्भावें करू काँग्रेस देवतेची, वृद्धी कराया झटणाऱ्या त्या गांधी महात्म्याची ॥ मंत्र अहिंसा पटवुनी ज्याने वृत्ती हिंदांची, जागृत केली आनी वाढविली जि: शस्त्र क्रांतिकाराची ॥ घरोघरी फिरवुनिया चरखा धुंदी परवश्यांची, उडविली ज्यानें देऊन चरखा गोष्ट ही नवलाची ॥ टिळक, गोखले, मेथा, राजेंद्र यांच्या त्यागाची, मूर्ती काँग्रेस ही वाढवुनी करी जोपासना तीची ॥ आजला करीतसे सद्भावें साची, वृद्धी कराया ॥ १ ॥ दारिद्र्यादिक आजार सारे स्मरणें पळवीती, जपान, जर्मन, अमेरिकाही परकीय वाजिती ॥ समतावादी बलाढ्य रशिया पण भीतो चित्तीं, परस्थ शत्रू जिच्यापासूनी दूर दूर पळती ॥ लाल, बाल, पाल, जिथें गाजले दत्तची मूर्ती, भक्त सकल जाहले भारतीय अखंड या भारती ॥ हिंदू मुस्लीम एकी करुनिया पतीतां उध्दरीती, स्वातंत्र्यास्तव तिरंगी झेंडया खालीं सर्वजमती ॥ मान घ्या, प्रेमही घ्या, भक्ती शाहीराची, वृद्धी कराया झटणाऱ्यां गांधी महात्म्याची ॥ २ ॥

॥ ॐ ॥

## ॥ आरती काँग्रेस देवतेची ॥

चा.क्र. ३२/अ

आरती काँग्रेस देवतेची । करूया गांधी महात्म्याची ॥ध्रु०॥
लाल, बाल, पाल त्रिमूर्तीची । नेहरू मोतीलाल यांची ॥
नेताजी सुभाषचंद्राची । मौलाना आझाद वीरांची ॥
सेवक देश सेविकांची । वीरांगना, आझाद सैन्याची ॥
चाल :- गर्जना त्रिवार इंडिया करिता, ठेवुया मान, घेऊया आण, मिळवुया प्राण, मायभू सुवर्ण ही आमुची, करूया गांधी महात्म्याची ॥ १ ॥
चाल :- जयजय जय गांधीराया, असो त्या नमन तुझे पाया ॥
आम्हांसी सत्यज्ञानी घ्याया, अरसी बा तूंच एक सदया ॥
मायभू बंधन तोडाया । झिजवूं आम्हीं अमोल ही काया ॥
चाल :- असें तव प्राण जवाहिरलाल, हिंदभू लाल, रक्षू आम्हीं लाल, करणिया ढाल, आमुच्या अमूल्य प्राणाची, करूया गांधी महात्म्याची ॥ २ ॥
चाल :- पुरुष तो एक जगीं साचा, चंद्र तो प्यार ओकराचा ॥
आझाद हिंद सैनिकांचा, झाला नेताजी सैन्याचा ॥
दाविला मार्ग स्वराज्याचा, तिरंगा वंदुनी राष्ट्राचा ॥
चाल :- असे तव बोल खरा जयहिंद, पुन्हा जयहिंद, गर्जा जयहिंद, असो जयहिंद, प्रार्थना जाहीर दीक्षिताची, करूया गांधी महात्म्याची ॥ ३ ॥

॥ श्रीगुरुदेव प्रसन्न ॥

॥ संवाद :- नवऱ्यावर रेशनिंग ॥

कवी :- राष्ट्रशाहीर ग.द. दीक्षित चिंचणीकर मु॰ (सांगली)

चा.क्र. ३३/१) बंगाल देशामध्यें एका खेडेगांवाला, सुखवस्तू गृहस्थ एक, नांदतो चोख, करून प्रपंचाला ॥

चाल :- होत्या कन्या तयाला पांच, रूपवंत सुंदर साच, शिक्षण सर्व प्रकाराचं, घेऊन नांदतसे खास, आणा ध्यानास, त्याच वेळेला ॥
पांचा नाहीं नवरे त्यानं ठेवले होते योजून, योग्य तो हुंडा द्येण्यास, देण्याचे खास, हरखुनी बोला ॥
बंगालची उपासमार नाहीं अन्न ठावें कोणाला, झाडावरती पान राहीना, मुकले किती प्राणा, पटापट बोला ॥

ती :- कारभारी, म्हटलं ऐकलं कां? आधींच उपासमारीनं जीव हैराण झालाय, त्यांत या पोरी वाढलेल्या, चटकन लग्न करून मोकळं व्हावं.

तो :- आगं पर, मलाकांहीं कळत कां न्हाई? आगं या लढाईमुळं सगळ्यांचे भाव कडाडले आहेत. ना, तसेंच या नवऱ्यांचेही भाव कडाडले आहेत.

ती :- काय नवऱ्यांचे भाव? काय बाई तरी!

तो :- कारभारणी, सांगतो ऐक.

(गाणे) हुंड्याची ही चाल, करिते हाल, आमुचे जाण गे,
नवरोबाचा भाव, देईना ठाव, आम्हां जाण गे ॥

ती :- अहो! पण ते म्हणतात तरी काय?

तो :- आपला पहिला जावाई म्हणतो, आपला दोनशें रुपये हुंडा ठरला होता. पण आतां मी युनिव्हर्सिटीची परीक्षा पास झालो आहे. तेव्हां दोन हजार रुपये हुंडा देणार असाल तरच मी लग्न करीन.

ती :- पण असं कां?

तो :- तो काय म्हणतोय ऐक.

(गाणें) आजवरी शिक्षणासाठीं खर्च आम्हीं केला, अहो केला,
हुंड्या विना वसूल कसा होईल सांगा तुम्हीं बोला ॥

ती :- अन् ते दुसरें तरी काय म्हणतात?

तो :- अगं, तो इथं एका गिरणीत फिटरचं काम करतो, पण लढाईमुळं १८ रु.च्या ऐवजी १८० रुपये मिळवतोना, तेव्हां त्याचाही भाव वाढला आहे. त्यानं तर नवीनच तऱ्हा काढली आहे. तो काय म्हणतोय ऐक.

॥ नवऱ्यावर रेशनिंग (चालू) ॥

(गाणे) जर कन्या कराल तुम्ही गोरी, पिवळी खरोखरी, एकाबरोबरी, मोहरा पुतळ्यांनं, तरीच वरीज आपुली सुंदर कन्या जाणं ॥
ना तरी म्हातारा कुणी, वर पाहुणी, टाका ऊरकुणी, ओढ चटावर, हुंड्याविना मिळावा कसा अथमवर ॥

तीः- आणि हो तिसरा काय म्हणतोय?

तो:- अगं, तो एक आर्डिजरी १८ रुपयाला रिक्रूट भरती झाला होता. पण आतां त्याच्या मिलट्रीच उड्या आहेत. तो काय म्हणतोय? ऐक.
(गाणे) ब्रम्हदेश हाती घेईन, जपान्यास उधळून लावीन, लेफ्टनंट होईन मिळवीन जहागीर गं, चाल हुंडा पंधरा हजार, वरीज तुमची कन्या साधार, आहे असा काळा बाजार, काय करूं गं ॥

तो:- अगं, तो चौथाही त्यातलाच. अन् हो पांचवा, एका दवाखान्यांत बाटल्या धुवायला, कंपाऊंडर होता. पण लढाईमुळं डाक्टरांचा पडला तुटवडा! अन् तो कंपाऊंडरचा एकदम डॉक्टर झालाजां, तो म्हणतो मला हुंडा मुळीच नको.

तीः- कारभारी! हो जावाई मला खरा.

तो:- अगं पर हो काय म्हणतोय तें पुरतं ऐकतरी! अगं तो म्हणतो, मला हुंडा नको, पण माझी बायको डॉक्टरीण होण्याचा खर्च द्या. (सारांश काय!) ॥ गाणे ॥
आतां कुमारिकांना नाही गं वाली कुणी, जो तो जबर हुंड्याची करितसे मागणी ॥ धृ० ॥

अंतरा:- लाविला हरताळ वचनाला, किम्मत त्याला, ऊरली नाही, खरोखर नारी गं ध्याजो आणी ॥

तीः- मग आतां काय करायचं तरी काय बाई?

तो:- (गाणे) आतां काय करूं गं सुंदरी, सुचेना खरोखरी, अन् जांवयाची हौस वाटते तुजला। काय कर्ज सावकारी काढूं, घरदार सोडूं, जाऊं अरण्याला, गं, नारी तूं गं, पोरी तूं गं, नारी तूं गं चलजी ॥

मुलगी:- आई! याला आतां उपाय एकच. या नवऱ्यांवरती रेशनिंग केलं पाहिजे. आतां लवकरच काँग्रेसच्या हाती सत्ता येणार आहे. :-

॥ नवऱ्यावर रेशनिंग (चालू) ॥

तेव्हां पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्यापुढें आम्हीं आमचं गाऱ्हाणं मांडून, दाद लावून घेणार आहोत.

तीवतो :- ठीक आहे.

॥ भाग २ रा ॥

मोर्चा :- पंडीत जवाहरलाल नेहरू की जय। नवऱ्यावर रेशनिंग करा। काळा बाजार नष्ट करा। भारत माता की जय।

पंडीत :- सैनिक हा काय गडबड आहे.

सैनिक :- महाराज। काही तरुण मुली, हातांत तिरंगी निशाणे घेऊन, काळाबाजार नष्ट करा. नवऱ्यावर रेशनिंग करा, अशा आरोळ्या ठोकीत, आप=ल्याला भेटायला आल्या आहेत.

पंडीत :- जा, घेऊन या त्यांना आंत.

मुली :- (सर्व मुली आंत येऊन) नमस्ते, वंदे मातरम्.

पंडीत :- काय मुलींनो? काय चळवळ आहे!

मुली :- महाराज आमचं म्हणणं काय आहे? तें ऐकून घ्या, आणि आम्हांला न्याय द्या.

॥ गाणें ॥

हा हुंडा जिथं तिथं नडतो, आमुची लग्नें व्हायया ॥ ध्रुव ॥

(अंतरा) श्रीमंतांचा हक्कची जणू तो, शिकला म्हणुनी गरीबही अडतो, वधूपित्याला पुरे [illegible], [illegible] ॥ १ ॥

नोकरदार तर वरतीच बघतो, स्वर्ग त्याला दीड बोटच उरतो, भावी श्वशुरा घरघर फिरवितो, भिक्षा मागाया ॥ २ ॥

रूपसुंदरा जरी वधू असली, गृहिणीपदाला योग्य चांगली, हुंड्याची जर हुंडी न पटली, देण्या जावया ॥ ३ ॥

असते जरूरी दोघांनाही, कितीही आटाट्या शिकला तरीही, शिक्षण सारें (मुलीतच) व्यर्थच जाई, हुंडा मागाया ॥ ४ ॥

गुलाम घेणे देऊन पैसा, प्रकार होता पूर्वी ऐसा, परी प्रकार हा उलटा खासा, गुलाम बनवाया ॥ ५ ॥

पं. नेहरू :- बरं मुलींनो, मग मी काय करावं म्हणतां?

मुली :- तुम्हीं, या सगळ्या नवऱ्यावर रेशनिंग बसवून, यांना हुंडा-

:-

॥ लग्नावर रेशनींग (चालू) ॥

घेण्याचे कायद्यानेंच बंधन घातले पाहिजे।

पंडितजी:- आणि समजा असं न झालं तर ?

मुलीं :- न झालं तर ! ज्याप्रमाणें श्रीकृष्णाला सोळा हजार एकशें आठ बायका कराव्या लागल्या, तसं तुम्हांला या बंगालच्या सर्व पोरीशीं लग्नें करावी लागतील.

पंडीत :- अरें बापरे !

पेपरवाला:- नवाकाळ, लोकमान्य, टाईम्स ऑफ इंडिया, बॉम्बे क्रिकल, संडास. (बापाजवळ हुंडा द्यायला पैसा नसल्यानें, तरुण कुमारिकांची आत्महत्या!

पंडीत :- काय आत्महत्या? सैनिकहो याचा बंदोबस्त झालाच पाहिजे.

(गाणें) बोलवा आगोदर पत्री सरकार, हुंडा द्या यांना भरपूर,
नाहींतर सातारी चपलाहार, लग्नें व्हावया ॥६॥
बोला! किती हुंडा पाहिजे ?

नवरेमुलगे:- छे! छे! महाराज, आम्हांला हुंडाबिंडा कांहीं नको.

(गाणें) मुळीं न घेऊं आम्हीं हुंडा, लाऊं जी सत्याग्रहाचा दंडा,
मोडूनी टाकूं त्याच्या बंडा, मिळवूं त्या विजया ॥७॥

॥ बोला पंडीत जवाहरलाल नेहरू कीं जय ॥

(बुधवार दि. ५।११।८३. र.द.दीक्षित नवापूर)

---

॥ सुभाषितें ॥

"जोपर्यंत बुद्धिबळाचे पटावरील प्याद्यानें आपला पाय आपल्या घराबाहेर काढला नाहीं. तोपर्यंत तें प्यादें वजीरपदास पोंचणार नाहीं ॥ १ ॥

॥ जोंपावेतों शिंपीतून मोत्यें बाहेर पडणार नाहीं, तोंपावतों तें आपल्या x x x रुपी नवरीच्या नाकावर चढणार नाहीं. (थोरवी येणार नाहीं) ॥२॥

॥ शुद्ध चरणीं स्त्रीच्या नेत्रांत एक प्रकारचे दैवी तेज चमकत असतें. त्या तेजापुढें, कोणतीही पापवासना टिकाव धरूं शकत नाहीं. आपल्या पवित्रतेनें स्त्री जरी जगाला वंद्य, तरीच आजिंक्य आहे. ॥ ॥३॥

॥ सीता शुद्धी आख्यान (कीर्तन) ॥ कवी :- राष्ट्रशाहीर र. द. दीक्षित.

॥ भाग १ ला ॥

(सीता शुद्धी या शब्दांऐवजीं) :- पद ॥ (सीताशोध हा शब्द असावा असें वाटतें) र. द. दीक्षित

श्रीराम :- तुजविण कोणी मारुतीराया मिळविल सीता प्यारी ॥ धृ० ॥
पंचवटीमध्यें सोडुनी आलो, रावणें केली चोरी ।
जगेल कैसी मजविण सीता, कोमळ ललना भारी ॥ १ ॥
बंधू लक्ष्मणा होईल कां रे, सीताशुद्धी सारी ।
शाहीर दीक्षित दत्तप्रभूचा सेवक तो निर्धारीं ॥ २ ॥

लक्ष्मण :- प्रभो, सीताशुद्धीसाठीं ही सर्व वानरसेना येथें जमली आहे. पण एक अडचण ही आहे. त्यांनीं कोणीही सीतादेवींना पाहिलेलं नाहीं. तेव्हां आपण वर्णन कराल तर,

राम :- लक्ष्मणा, मग तूंच कां करीत नाहींस?

लक्ष्मण :- पण प्रभो! (साकी) मुख न पाहिलें आजवरी त्या जगन्माय त्या सतीचें ।
पायां नूपुरीयुक्त असें ते चरण पाहिले जीचें ।
वर्णन काय करूं, कवणाचे का चरण धरूं ॥

राम :- शाब्बास लक्ष्मणा! ऐकतर सीता कशी आहे ती.

(चा. क्र. सहा / कटाव क्र. 3) मुखचंद्रापरी सुहास्यवदना, सुदीर्घ केशी कृशकटी जाणा, सोनचाफ्यापरी सुवर्णवर्णा, नेत्र कमल मीनाक्षी अंगना, पानें खाणारी ती पर्णशना, सदैव धारण करी जी मौना, दृष्टी वरती सदैव गगना, राजसबाळी, शोधील कोण यावेळीं ॥

वानर :- ठीक आहे. चला रे! असं म्हणून सर्व वानरसेना उठली आहे. एका वानरानें, हास्यमुखी, वाटोळ्या चेहऱ्याची म्हणून एक डुक्कर आणलं आहे. दुसऱ्यानें लांब मानेची म्हणून एक जिराफ आणलं. एका बारीक कमरेची म्हणून एक सिंहीण आणली. एकानें सोनेरी रंगाची म्हणून एक हरीण आणलं. एकानें माशासारख्या डोळ्यांची म्हणून मासेच आणले. एकानें गवत, पानें खाणारी म्हणून गायच आणली. एकानें वर पाहणारी म्हणून एक सांडच धरून आणली. व सर्वांच्या मतें सांडेमध्यें सर्व गुण असल्याची खात्री झाली. आणि रामापुढें आणली.

(श्लोक) सर्वांमतांनीं केला ठराव, सांडेमध्यें हे गुण खास सर्व ।
म्हणून धरूनी एक सांड छान, रामास देती सीता म्हणून ॥

बंधूंनो, एवंच रामाला सीता कांहीं मिळाली नाहीं. त्याप्रमाणें आपल्याला आपल्या स्वातंत्र्य रूपी सीतेचा शोध घ्यावयाचा आहे. तो कथाभाग उद्देशक वर्णन करूं.

॥ बोला श्रीरामचंद्र की जय ॥

मूळ कॉपीवरून पुनर्लेखन
दि. २५।१।८३ नवापूर

॥ सीता शोध - भाग :- २ ॥

हं! कार्यकर्ते, कालचं आख्यान पुरं करायचं आहे. असो, याप्रमाणें आजचे राम-लक्ष्मण, गांधी-जवाहरलाल, हे भारताच्या स्वातंत्र्य सीतेचा शोध करूं लागले असतां, वानरसेनेचा नायक सुग्रीव याची गांठ पडली. तेव्हां सुग्रीवानें प्रश्न केला रामा, आजच्या रावणाला दहा तोंडे कुठं आहेत: व ती कुठली?

श्रीराम:- (पद) सख्या सुग्रीवा ऐक ना ॥ ध्रु० ॥ घोडदळ, पायदळ, आरमार, विमानदळ, तसाच तो तोफखाना ॥१॥ व्यापार, शिक्षण, फॅशन, व्यसनें, शिवाय व्यसनें नाना ॥२॥

बुवा:- ज्यावेळीं, रामानें, रावणाकडे सीतेची मागणी केली, तेव्हां गव्हर्नर मॅक्डोनॉल्ड यानें एक कमिटी (रावण) भरवून विचारले, तुम्हांला सीता कसली पाहिजे? कॉंग्रेस म्हणाली - हास्यमुखी, ही घ्या म्हणून १९३५ ची राज्यघटना दिली. त्यामुळें ती हास्यमुखीच ठरली. ॲंग्लो इंडियन्स म्हणाले, बारीक कमरेची, ही घ्या म्हणून त्या घटनेंत सर्व अधिकार गव्हर्नरकडे देऊन, तिचे कंबरडे मोडून सिंहकटी केली. मुस्लीम लीग म्हणते लांब मानेची, ही घ्या म्हणून, मुसलमानांची संख्या जादा देऊन, लांब मानेची केली. हिंदुसभा म्हणते सोनेरी रंगाची. म्हणून कुणाला मिनिस्टर, मुख्य मिनिस्टर, असा किताब देऊन सोनेरी मुलामा चढवून, सोनेरी रंगाची केली. शीख म्हणाले माशाच्या डोळ्यांची. ठीक आहे. संस्थानीक म्हणाले, पानें खाणारी. ही घ्या. म्हणून तशीं दिली. म्हणजे संस्थानी प्रजा शांत असते, त्यांच्यात कांहीं गडबड नसते. आदीवासी म्हणाले, मुकी आहे. (मौन धरणारी) ही घ्या. म्हणजे मनुष्यप्राण्यांत त्यांची गणनाच केली नाहीं. अस्पृश्य म्हणाले, वर पाहणारी. ही घ्या म्हणून त्यांचे प्रतिनिधी घेतले. पण विशेष प्रसंगी त्यांना वर सरकारकडेच पाहण्यास लावले. एवंच रामाला जशी सीता मिळाली नाहीं, तशी गांधी, जवाहिराला पण अद्यापी मिळाली नाहीं. पण ती मिळवण्याची संधी जवळच आली आहे.

श्लोक:- आली पुन्हां संधी मिळवावयाची, व्हा सज्जसारे कामरा करायाची,
कॉंग्रेसला घ्या साह्यासी सारे । जातीय तेढ मोडूनी बारे ॥

॥ बोला श्रीरामचंद्र कीं जय ॥

सीताशुद्धी हा शब्द बरोबर न वाटल्यानें, सीताशोध असें म्हटले आहे. र. द. दीक्षित

( पुनर्लेखन दि. ५।१।८३ नागपूर. ) — ० —

॥ पागडी-संवाद ॥ कवी- राष्ट्रशाहीर ग. द. दीक्षित. सांगली ॥

॥ भाग १ ला ॥

गणपतराव:- (घाईनें) अगं, एकलस कां? आनंदाची बातमी चहा आण पाहूं!

सरस्वती:- अहो! पण बातमी तरी कळूं दे.

तो:- अगं! मुंबईला रेशनिंग ऑफिसमध्यें, माझी चेकींग इन्स्पेक्टर म्हणून नेमणूक झाली.

ती:- बरं झालं बाई!

तो:- अगं! पण सध्यां मुंबईला नोकरी मिळवणं जितकं सोपं आहे, त्यापेक्षां रहायला जागा मिळवणं फार अवघड झालं आहे.

ती:- तें कां, एवढ्या चाळी आहेत, त्यांत एक जागा मिळणार नाहीं?

तो:- अगं कां मिळणार नाहीं ऐक.

चाल (लावणी) क्र. ८:- ब्रह्मदेश हातीं घेऊन, अंदमानला शह देऊन, लंकेवरती बाँब टाकून, जपान्यांनीं लावलें तिथल्या लोकां पळवून, राहिले मुंबईला येऊन, चाळीमधल्या गल्ल्याही, गेल्या भरून ॥१॥ याशिवाय तिथें आतां पुन्हां पागडी प्रकरण सुरू झालं आहे.

ती:- मग एखादी पगडी घेऊन जावं.

तो:- अगं! ती पगडी नव्हे. पागडी म्हणजे चाळीच्या मालकाला, भय्याला, किंवा पूर्वीच्या बिऱ्हाडकरूला, द्यावी लागणारी भली मोठी रक्कम.

पोस्टमन:- गणपतराव दंडवते.

ती:- अगं बाई! टपाल आलं वाटतं? (वाचून) माझ्या मैत्रिणीचं आहे. मागें तुम्हीं तिला (तिच्या) नवऱ्याला, व्यापारासाठीं २०० रुपये दिले होते ना? त्यांनीं आतां मुंबईला दोन बंगले बांधले आहेत. आतां कांहीं आपल्याला जागेचा वांधा पडणार नाहीं. ॥ गाणें ॥

जाऊंया चल पाहूंया चल मुंबईला मन राया ॥ संगसंग मोहना, कसली ती पागडी, पाहूंया घडी, मैत्रीण मम बडी, जिवलग ना रे सख्या ॥१॥

तो:- अगं तुला भ्रम आहे. ॥ गाणें ॥

महामाया मुंबापुरीं नारी गं, नाहीं जागा तिथें ॥ तिथें जाऊन राहूं कुठं सांग गं, नाहीं जागा तिथें ॥ (चाल) तिथें माझी कुणाची नाहीं ओळख, प्रत्येकजण आपापल्या कामांत दंग असतो देख, कुठं बसूं, कुठं राहूं, जाऊन तिथें सांग गं ॥१॥

:-

॥ पागडी (चाल) ॥

जसं कुत्र्यांच वारूळ गं, नाहीं रिकामी मुळी चाळ गं, काय फूटपाथवर
ठोकू तळ गं, नाहीं जागा तिथं ॥२॥

तो:- आहे; पण जाऊन पाहूया तरी.

तो:- जाऊया, पण जरा ऐक

चालक्र. ६ / कराव- ५) अगं कुणी नव्हे कुणाचा सखा, बाप आणि काका, ताई आणि आक्का,
जिथं पैशाचा, येईल ओघ तिथं नव्हे कोणी-कोणाचा ॥

॥ भाग २ रा ॥

(बोरीबंदर स्टेशन. हमालाची ओरड)

हमाल:- काय रावसाहेब हमाल?

तो:- रावसाहेब हमाल!

हमाल:- तसं नव्हे साहेब. हमाल पाहिजे कां?

तो:- हां हां, काय देणार?

हमाल:- काय देणार! गरिबाची थट्टा करतां व्हय साहेब.

तो:- अरे तसं नव्हे. एवढा श्रीमंताचा माल तुझ्या ताब्यांत द्यायचा, त्याबद्दल
कांहीं ॲडव्हॉन्स घ्यायला नको कां?

हमाल:- असं कसं? साहेब.

तो:- बरं बरं, जा ठेव जा त्या लाल मोटारींत. (मैत्रिणीच्या घरीं येतात. मुरलीशेठ
सामोरे येतात. दोघे एकमेकांना नमस्कार करतात.)
काय मुरलीधर शेठ, कसं काय? सर्व ठीक आहे, खूप पैसा मिळवला ना?

शेठजी:- हां हां भाई घणो पैसा! (२ दिवसानंतर गणपतराव शेठजींना म्हणतात.)

गणपत:- (गाणें) एकदोन जातां दिन, गणपतराव हिंमतीनं, शेठजीस विनंतीनं, बोले
हळुवार, शांताक्रूसचा तुमचा बंगला, भाडे घेऊन द्यावा मला, सहकुटूंब
रहायाला, कृपा करून ॥

शेठजी:- (चाल) शेठजीनी केला सवाल, दोन हजार पागडी जर द्याल, अर्ध्या
चा.क्र. ७ / मैदीक ७० ) जागेमधें रहाल, (चाल) व्यवहार तो व्यवहार, बेपार तो बेपार, आलो नाहीं
सावकार, भोळेपणानं। घासलेटच्या व्यापारानं। कापडाचे दुकान,
उठविले बंगले दोन, घ्या बघून ॥
गणपतराव, माझा बोलणं मंजूर असेल तर तुम्हांला जागा मिळेल.
:-

॥ पागडी (चालू) ॥

गण :- अरे चोरा! दोनहजार पागडी पाहिजे काय? ठीक आहे. मलाहि गणपतराव दंडवते म्हणतात.

(गाणे) मग त्याजी बधुनी सावकार, बायकोचा चपलहार, पिकुनिया दोन हज्जार, दिले त्याला रोख मोजून, मोठ्या कष्टानं, करावीचार ॥

(स्थळ - शेठजींचं घर)

लीलाबेन:- जुवो, आपणो शांताक्रूझनो बंगलो छे जा. तो एने भाडे आपवू पडशे. बगर पागडी.

शेठजी:- शुं! बगरपागडी? तूं गांडी छे के? बेपार एटले बेपार. तें मां मैत्रणनां शुं काम?

लीला:- हु बधू जाणू छूं. एनें बे हजार रुपीया वापस आपी दो.

शेठजी:- हर व्यवहारमां, बेहराना कोण सांबळे?

(गाणे) हूं तो मारवाडका बणियो रे, बम्बई शेहेरमां आव्यो ॥ ध्रु० ॥
बम्बई सेहेरमां आव्यो जब तो जोहिंथी पहुंचे जूतो, घासलेटकीं फेरीफरीने पिंजरापोळमां सोतो ॥ १ ॥

पण तें इथं कशाला हायाला मागते?

गणपत :- माझी येथं रेशनिंगमध्यं इन्स्पेक्टर म्हणून नेमणूक झाली आहे. शांताक्रूझला एका बंगल्यात घासलेटचे डबे व ४२ ठिकयाचा कापडमाल भरून ठेवल्याचे कळले आहे. माझी माणसे तपासाला गेलींच आहेत. मी पण तिकडेच चाललो आहे.

शेठजी :- शुं! तमे रेशनिंग इन्स्पेक्टर छो? अरे भगवान! अरे मेरे बालाजी! अरे माझाच बंगला तो, गणपतराव, मला वाचीव बाबा आतां. अरे! आपलो पहिलो स्नेह तो पहा.

गणपत:- अरे लुच्चा! आता स्नेह आठवतो काय? छे! छे! मला माझं कर्तव्य केलंच पाहिजे.

शेठजी:- आजी गणपतराव, असा काय करते! सरस्वती बेहेन तूं तरी सांग!

सरस्वती:- (गणपतरावास) (गाणे) ॥ चाल - पाळण्याची ॥
करी माफ आतां सख्या मम भगिनीला, प्रिय मैत्रिण माझी लीला ॥
जरी तसतीच्या पाहुनी ऐशा लीला, ये क्रोध राजसा तुजला ॥
तरी मजसाठीं दया दाखवी तिजला, लाडक्या लीला भगिनीला ॥ :-

## मागणी गाणं

(चाल) तंव चरणीं शरण मी आले, तें श्रीमंतीला भुलले, घ्याटयानीं बोल हे सगळे ।

(चाल) परी माफ तया करजी सोडवी सखया, मलागिनीच्या पतिराया ॥ १ ॥

गणपतराव:- तुझ्यासाठीं कांहीं प्रयत्न करून पाहतो. पण मी तुला काय सांगत होतो? तें खरं आहे ना! तेव्हां पुन्हां एकदा ऐक.

(गाणें) कुणी नव्हे कुणाचा सखा, बाप आणि काका, ताई आणि आक्का,
जिथं पैशाचा । येईल प्रश्न तिथं नव्हे कोणी कोणाचा ॥ १ ॥

॥ समाप्त: [illegible] ॥

॥ श्री ॥

॥ श्रीसद्गुरु जयराम स्वामी महाराज की जय ॥

॥ भोजन नियंत्रण संवाद ॥

॥ कवी:- राष्ट्रशाहीर ग. द. दीक्षित चिंचणीकर सांगली ॥

ती:- आवं, ऐकलं का? समदी माणसं माझ्या तोंडात शेण घालाय लागल्याती!

तो:- आगं, पर त्ये काय म्हणून!

ती:- न्हवं एकुलतं एक पोर, थाटामाटानं लगीन केलसा, अन आता गावजेवाण घालाया नगं का?

तो:- आगं, पर मी काय न्हाई म्हणतोय काय! पर आता यो नवीन कायदा आलाय न्हवं! आगं एकुणपन्नास माणसाच्यावर माणसं जेवाय घालायची न्हाई ती।

ती:- जळ्ळा मेला त्यो कायदा, काय गं बाई? जेवनावरबी कंट्रोल?

(गाणे) कंट्रोलनं पुरतं बाई छळलं, जगं जगं समयाला कयेलं ॥धृ०॥
लगीनाचं जेवण घालाई, कायदा आडयेई, ह्ये सरकार असलं बाई कसलं, आमचं आम्हीच खर्च जर केलं, ह्येच्या बापाचं यात काय गेलं।
जगं जगं समयाला कयेलं, कंट्रोलनं पुरतं बाई छळलं ॥१॥

ती:- मग आता काय करायचं वं?

तो:- कारभारणी, त्येच्यावरबी एक युगत हाय! सांगतो ऐका.
(कराव) रोज पन्नासच माणसं घालूया, कायदा मग तो काय करतुया।

ती:- व्हय गं व्हय गं व्हय व्हय गं व्हय बया।
कारभारी पर कारभारी! हं जावा बरं, तुम्ही गावात आवातनं कराजावा, तंवर मी सैंपाकाची तयारी करते.

तो:- ह्यो बघ निघालो. झरकन जाऊन, परकन येतो.

ती:- पर बघा हं अठ्ठेचाळीसच पानं सांगा. नवरा मुलगा तरी वसाय पायजे न्हवं!

तो:- बरं, बरं। (गाणे- चाल तमाशाची)

चा. ता. तमाशाची (४९) एकुणपन्नास पानाचा रोज बेत मी गं केला, राजरोस बलावणं करून घालतो जेवाण गांवाला, कायदा मग काय करतुया मला?, आतां मी बळं आटप लवकर। सुंदरी गं गं गं ॥

तो:- कारभारणी, आलो बघ आवातनं करून!

ती:- मग, माझाबी सैंपाक तयार हाय. पानं घ्याचं बघा.

तो:- हां, चलारं पोराजों, चला, चला, बिगी बिगी पानं घाला बरं!

:-

" भोजन निमंत्रण "

आरे! त्यो पुरल्या कुठं गेला? हं आटपा! अर भेताय कशापायीं?
(४८) आरं अट्ठेचाळीसच पानं घालावीं, हं दार लावा. कुलूप बी घाला.
हं! बसा मंडळी. बोला पुंडलिका वर दे हारी विट्ठल! आरं ए पोरां, काय शिलोक बिलोक म्हण कीं, संवादलांत जातुयास न्हवं! म्हन! म्हन!

मुलगा:- (श्लोक म्हणतो) चला गांधीबाबा तुम्हं हांक मारी, जिवडून आणा कॉंग्रेस पुढारी,
तुम्हं साठीं जे सोडिती तुरुंगी हाल, म्हणा गांधी कीं जय जवाहीरलाल॥
"बोला गांधी महाराज कीं जय" "पंडीत जवाहीरलाल नेहरू कीं जय"
(दारांवर टकटक आवाज होतो)

लोक:- अरें बापरे! पोलीस आले वाटतं?

ती:- तुम्हीं गप जेवा! मी बघतं कोण हाय त्यें.

---

" भाग २ रा "

(बाहेर तिचा बाप, मामा वगैरे मंडळीं आलेली असतात.)

बाप:- अहो पाटील दार उघडा दार.

ती:- न्हवं! पर एवढा दरडावणारा कोण रं तूं? आर, अट्ठेचाळीसच पानं हाईतकीं.

बाप:- आगं! मी तुझा बाप हाय बाप!

ती:- आत्तां गं बया! ह्यो तर लईच आगाऊ दिसतुया, माझा बा काटतुया. ह्येचं मडं बसवलं, ह्येला परकीचा पोड उठला! काशे, नागे, ए लाटणं आण. बघुं दे मला कोण हाय त्यो!

बाप:- अहो! दार उघडा दार!

एकजण:- अहो पाटील. उघडून बघा तरी कोण हाय! बायका माणसांचं काय ऐकतां!

ती:- आरं चल! मोठा आलाया सांगायला! आम्हीं बाया माजरं करूं ये तुमच्या बायान्च्यानंबी हुयाचं न्हाई.
(गाणं) आझाद सैन्यामधें कॅप्टन लक्ष्मीनं शूरपणा नाहीं दावला कां!।
फलटण बायांची गोऱ्यासंग रणांत लढाया ग्येली कां! ॥१॥

बाप:- अहो दार उघडा दार!

ती:- उघडत्यें हं. काशे नागे ये लाटणं नीट धर. त्येच्याजवळ फुकणी बिकणी असलं दार उघडल्याबरुबर गच्च धर. चूल फुकाय व्हईल.

:—

॥ भोजन निमंत्रण ॥

( दार उघडते, बाप आंत येतो )

ती :- कोन बाबा!

तो :- कोन मामा!

सर्वलोक :- आं, कोण पाटील! तुम्हीं हायव्हय? ध्यानेच्यायला. काय राव घाबरलूं आम्हीं. आम्हाला वाटलं, त्यो रेशनिंगचा किडमिड्या हपीसरच आलाय वाटलं. आलासा येवीं बरं झालं।

ती :- पर बाबा, कवा आलासा?

बाप :- आगं कवापासनं हाळ्या मारतुया. बरं आटीप बरं. वाढ जेवाया. भुका लागल्याती.

ती :- काय जेवाण? आतां हातं कुठलं जेवाण? अट्टेचाळीस पानं तर बसली.

लोक :- वाढा की हो! एका पानानं काय हुतंय! आतां, बा आलाय त्येला काय तसाच पाठवणार?

ती :- आरे चला; तुम्हांला काय त्याचं! नाचीला पोटावरनं हात फिरवीत. पान तवारून खाऊन आमच्या नांवावर थुकत. त्यो रेशनिंगवाला आला म्हणजें पांचशें रुपय दंड आन सहा महिने शिक्षा. नको गं बाई! नाग, काय, :-

(गाणें) पान वाढून घ्यावं एकबाबाला, ऊऊनशानी खाईल नदीच्याकाठाला, तोटा नाहीं पाणी पीयाला, आरपा लौकरीं ॥ १ ॥

बाप :- काय वड्याला जायचं छे! छे!

(गाणें) झोंगाडी हातच बसूनशानी खानार, नाहीं जाणार, नदीला जेवणार, काय करतंया सरकार बघणार, झोंगाडी हातच —— ॥ १ ॥

दि. ७।१०।८३. नवापूर.

॥ श्री ॥

॥ अमृतहार ॥ कवी: राष्ट्रशाहीर ग. द. दीक्षित चिंचोलकर ॥

॥ भाग १ ला ॥

चा. गवळण.) अगं राधे तुला पुशितों गं, पोरगडी कांबळीवाला ॥ ध्रु० ॥

चा. श्रो. ध / कराव - पु) थांब, नारदा थांब, अरे, आज वैकुंठ चतुर्दशी ना? मला शंकराच्या पूजेला जायचें आहे. तेव्हां :- ॥ गाणे ॥

चा. श्रो. ध / कराव - पु) श्रीशंकर पुजण्या गौरीहर, अमृतहार कर, कमळें आणवून, आणवून, एका रात्रींत व्हायला पाहिजे अमृतहार छान ॥

गरुड :- मग देवा, रोहिदास चांभाराला बोलावणं पाठवूं?

लक्ष्मी :- अरे, रोहीदास चांभार कशाला?

गरुड :- देवी, मागें त्यानं एक उत्तमसा चपलाहार तयार केला नव्हता कां?

लक्ष्मी :- वेड्या, आतां चपलाहार करायचा नाहीं. अमृतहार करायचा आहे. तेव्हां नरहरी सोनाराला बोलावून आण.

गरुड :- हा पहा नरहरीच आला.

लक्ष्मी-विष्णू :- नरहरी, चटकन कमळें आणवून अमृतहार तयार कर बरं!

नरहरी :- पण देवा, तुम्हीच सांगा.
बोल भगवाना (बोल) जिकडे तिकडे सर्वत्र कंट्रोल नाहीं कां? ।
कमळें बाहेरून आणायची तर त्याला परमीट नकोच कां? ॥

लक्ष्मी :- खरंच बाई, ही लढाई संपली तरी अजून कंट्रोल कांहीं उठत नाहीं. अर्थकंट्रोल काय, धान्य कंट्रोल काय, सगळं कंट्रोलच.

नरहरी :- शिवाय चौकिंग. गांवात या, चौकिंग. बाहेर जा, चौकिंग. मोटारीनं जा, टोलनाकं. सगळीकडे टोल. सर्व देश नुसता या टोलांनी भरला आहे.

लक्ष्मी :- अरे असं कर! ॥ पद ॥
कैलास पर्वतावरी जा, तिथं शंकर भोळा राजा ॥ ध्रु० ॥
कंट्रोल मुळीच ना तिथं, कशाला परमीट, रेशनिंगचा नाहीं गाजावाजा,
तिथनं खुशाल कमळें तूं आण जा, तिथं शंकर (यशवंत) जव्हार राजा ॥ १ ॥

नरहरी :- खरंच, जव्हारला कंट्रोल नाहीं खरं! पण देवा, मी कैलासला जाऊं कसा?
(गाणें) काळ कसा आला रं आला ॥ ध्रु० ॥ गेला काळ सोज तिकिटांचा, आरामांत प्रवास करण्याचा, आज एकच प्रवासी फक्त मिलिटरीवाला ॥
मोटारवाला आपल्याच तोऱ्यांत, पॅसेंजर नसती हिशेबांत, जाऊं दे, राहूं दे, आपल्याच तालामधीं बोला, रं आला ॥

:-

॥ अमृतहार ॥

बाकी देवा, सध्यां कैलासाला जायला म्हणजे, कैलासवासी व्हायला सध्याचा हा रेल्वे, मोटारीचा प्रवास फार चांगला. छे! छे! प्रवास म्हणलं, कीं अंगावर कांटा येतो. नको रे बाबा.

लक्ष्मी :- अरे, असा घाबरूं नकोस. तें पहा त्या जव्हारच्या राणी प्रियंवदेनं, अत्यंदा आपल्या पतीलाच, विमान देऊन तुला न्यायला पाठवलं आहे. हं. बैस त्यांत. हं उघड आतां डोळे.

नरहरी :- अहाहाहा! ज्ञानेश्वरा! कितीसुंदर सुंदर कमळं ही?

(लावणीची) पाहूनिया कमळं नाना, भांबावुन गेला जाणा, तोडूं कुठची ज्ञानेश्वरा गेलो मोहून, बोले ज्ञानेश्वर त्याला, आंग्लदेवीच्या या गळा, हार आतां जमुन्याला, घे बघून ॥ १ ॥

नरहरी :- ठीक आहे.

॥ भाग २ रा ॥

ज्ञानेश्वर :- (चा. प्र. ८ दांगी) हे पहा आंग्लदेवींचं, कमळ हाराचं, करुन ज्यानं खोट्या दस्तऐवजास, फसवलं सावकार ऊमीचंदास, सुपीक बंगाल घातला जरआस, लॉर्ड क्लाइव्हचें कमळ हें खास, ऊलटसाच्या घेई अमृतहारास, ऊमीचंद सावकाराचे कमळांस, सोनार दादा ॥ १ ॥

पैशासाठीं बेगमा अयोध्येच्या, छळून ज्यानं साच्या, गाडलं पाताळीं काशीराजास, महापराक्रमी चेतसिंगास, इंग्रजांची कृत्यें बाहेर आणणाऱ्यास, फांशी ज्यानं दिलं नंदकुमारास, आंग्लदेवतेनं ज्याला कोर्टास, खेचला परी सुटला निर्दोषी खास, नीच वॉरन हेस्टींसच्या ऊलट आपणांस, नंदकुमार कमळ घेई हारास, सोनार दादा ॥ २ ॥

हे पहा टवटवीत कमळ, दिसतें जें तिकं, ज्यानीं अठरा सत्याण्णवसालांस, कंटाळून इंग्रजांच्या जुलुमास, पुण्याला ठार केले रॅण्डसाहेबास, अशा चापेकर बंधू कमळास, तोडूनिया घ्यावें अमृतहारास, सोनार दादा ॥

हे पहा कमळ नवलाचं, आंग्ल देवीचं, ज्यानं तैनाती फौज काढून, हिंदी राजांना टाकलं गाडून, अशा लॉर्ड वेलस्लीचे कमळ दडून, पारतंत्र्य पाकळ्यांच्या आडून, तसंच घे आपणासाठीं तोडून, सोनार दादा ॥

थेट तसंच सुंदर तें कमळ, पहा लालेलाल, ज्यानं तैनाती फौजेचे पाश, केली धडपड तोडण्या त्यांस, रणांवरीच वरिले वीर मरणांस, अशा वीर बापू गोखले कमळास, तोडून घेई अमृतहारास, सोनारदादा ॥

॥ अमृतहार ॥

हे पहा विचित्र चमक, असे सोज्वळ। ज्यानें हिंद वीर शूर पुत्रांस, पेंढारी म्हणून पकडुनी त्यांस, हाल हाल करून धाडले स्वर्गास, मार्क्विस हेस्टिंग्सचे कमळ हे खास, पाकळ्या त्याच्या लाल भडक सर्वांस, त्या उलट पाहिजेत अमृत हारास, पांढरा शुभ्र रंग हवा पाकळ्यांस, ज्यानें स्वातंत्र्य जातां असतांस, मिळवुनी हिंदू मुसलमानांस, दे माय धरणी ठाय केलें इंग्रजांस, अशा यशवंतराव होळकराचे खास, कमळ घे तोडून अमृत-हारास। सोनार दादा ॥

यापुढचं आंग्लदेवीचं, कमळ डौलाचं, ज्यानें ब्रश घेऊनिया हातांस, तांबडा रंग दिला हिंदुस्थानास, छळलें बहु हिंदी राजे रजवाड्यास, केले गटागट गट्ट राज्यास, जणूं बकासूर भासे समयांस, लॉर्ड डलहौसीचे कमळ ते खास, त्याच्या उलट कोणतें घ्यायचं आपणांस, सांगतो दादा ॥
पाकळ्यांच्या रंग ज्यांच्या हिरवा, पाचू कीं मरवा, पांढरा स्वच्छ रंग पाकळ्यांस, लालेलाल रंग मध्य भागास, पाजलं जिनं पाणी गोऱ्या लोकांस, स्वातंत्र्यासाठीं लढून समरांस, इसवी सन अठराशें सत्तावनास, लढतां-लढतां आली निधन कैलासास, कमळ झाशीच्या राणीचं हे खास, मधोमध घाल अमृतहारास, नरहरी दादा ॥

नरहरी :- पण ज्ञानेश्वरा, हा हार गुंफायला सोन्याची तार हवी का ?

ज्ञानेश्वर :- तारेला काय तोटा ! - (गाणें) नारदाच्या तंबोऱ्याची तार, सुवर्ण झंकार, शाहीर दीक्षितानें लावली तुणतुण्यास, तीच घे अमृतहार गुंफण्यास, वेळ नको लाऊं हार करण्यास, आटप लौकर अमृत हारास, सोनार दादा ॥
जाहला हार तय्यार, अमृतहार, विष्णुनी ओपियला शंकरास, शंकर प्रसन्न होऊनी त्यांस, विचारले घालूं हार कुणास, विष्णू तवा दावी चमत्कारास, गुप्त जाहला हार त्यां समयांस, दिसला परत हार पुन्हा सकळांस, होता अहिंसावादी गांधी चरणांस, गांधीजीं वंदन करुनी हारास, विष्णुरूपी जवाहिरलालास, घातला प्रेमानं अमृत हार त्यांस, ध्यानीं घ्या दादा ॥

शंकर :- हे पहा नरहरी, तुला आणखी सांगून ठेवतो.

पा. क्रो. ७ / पंक्ती – २

स्वातंत्र्यास तव देईल प्राण तो वीर येईल कैलासी ।
सेन्सॉर नाहीं, परमीट नाहीं, कंट्रोल नाहीं कैलासी ॥

॥ बोल महात्मा गांधीजी की जय ॥ दि. ७।१०।१९८३ नवापूर

॥ हिंदुस्थान कान्स्ट्रक्शन ॥ कवी-राष्ट्रशाहीर ग. द. दीक्षित चिंचणीकर ॥

॥ भाग १ ला ॥

चा. क्र. १ ) एके दिवशीं हिंदमातेनं, दरबार भरवून, जमविले जाण, राष्ट्राचे मुख्यमुख्य आधार, अनुभवी वृध्द वीर साधार, शाहीर दीक्षित गाते त्यांचे सुविचार ॥ ध्रु० ॥

आले महात्मा गांधीजी जाणा, आझाद मौलाना, मालवीय, जीना, जवाहरलाल मुख्य प्रधान, सरहद्द गांधी फकीर महान, नरसिंह केळकर मोठे विद्वान ॥

हिंदमाता:- बाळा जवाहिरा! सध्याची माझ्या इंग्लीश पध्दतीच्या राजवाड्याची रचना, माझ्या हिंदपुत्रांना मुळीच पसंत नाहीं.

जवाहिर:- माते! मग काय आज्ञा आहे?

हिंदमाता त्या हिंदुस्थान कन्स्ट्रक्शनच्या वालचंदला बोलावून, त्याचेकडून नवीन कन्स्ट्रक्शन करा.

जवाहीर:- ठीक आहे. हे वालचंद शेठच आले, आणि इंजिनिअरही आले. बोला इंजिनिअर या इंग्लीश पध्दतीच्या वाड्याची रचना बदलून नवीन करायची आहे. बोला! कशी करावी?

एंजिनिअर:- हा पहा मी एक नकाशा तयार केला आहे:

चा. क्र. १ ) हे आधींचे स्टील ओमचे, ओक लाकडाचे, इंग्लीश पध्दतीचे, काढूनी आधीं जुनें आधार, जातीय ऐक्याचे घ्यावे साधार, देशप्रेमाचे सिमेंट भरदार ॥

पूर्वेचा भाग वाड्याचा, बंगाल त्याचा, सुपीक लई साचा, जणूं वाड्याची धान्य कोठी, तिच्यावर सर्व भिस्त मोठी, मधली भिंत काढू नको दाटी ॥

चा. क्र. २ ) आणि त्याच्याजवळचा भाग, बंगाली भाषा बोलणारा ॥
सामील करावा त्यांत, आसाम बहार तोरसारा ॥
नेमावा गव्हर्नर तेथें, जिनासाहेब बॅरिस्टरा ॥

चा. क्र. ३ ) हे ईकडे मोठे दालन प्रांत संयुक्त ॥
त्याचे भाग करावे दोन घालुनी भिंत ॥
उत्तरेस, नंदनवन असा काश्मीर प्रांत ॥
चापेकळी नाक, जणूं हिंदुस्थानचे अरण्यात ॥
प्रेक्षणीय वस्तूचे म्यूझियम करावें तिथें ॥
हल्लीच्याच राजांना कायम ठेवावें निश्चित ॥

चा. क्र. ४ लगट ) हे त्याच्या खालचें दालन, पंजाब अर्धा घेऊन, ...... :-

॥ हिंदुस्थान कान्फूकशन ॥

त्यांत हिंदु वसाहती जाण, सामील करण्यात जाण, आणि नव्या जव्या कल्पना काढून, खेळवतात जे राजकारण, त्यां राजाजीनाच गव्हर्नर टाका नेमून ॥

चा. क्र. ८ झंपाटी ) पलीकडे सरहद्द प्रांत, डोंगराळ स्थान, करावा त्यांत सामील बलुचिस्तान, तथा सरहद्द नामाभिधान, संरक्षणासाठीं लष्कर ठाण, गव्हर्नर पाहिजे तिथला बलवान, नेमावे डॉक्टर मुंजे बडे विद्वान, ऐका तुम्हीं दादा ॥

हा सिंध प्रांत वाळवंट, म्हणुनिया त्यांत, संस्थानें कांहीं पूर्वेकडची, करावी समाविष्ट साची, गव्हर्नरपदीं नेमणूक कोणाची, तें सांगतो म्होरं दादा ॥

चा. क्र. १ ) वाळवंटाचेही नंदनवन, करील असामहान, वीर गुणवान, स्वातंत्र्यवीर सावरकरांस, नेमावे गव्हर्नर यासमयांस, ऐका यापुढें पुढील इतिहास ॥ १ ॥

---

॥ भाग २ रा ॥

हे दालन गुजराथ प्रांत. हा वल्लभभाईचा अत्यंत आवडता प्रांत आहे. म्हणून :—

चाल क्र. १ ) तो मुंबई प्रांतापासून, भिंत घालून, वेगळा करून, काठेवाड आणि गुजराथ खास, असावेत स्वतंत्र दोन्हीही खास, व्यवस्थाही वेगळी ठेवावी त्यांस ॥

तिथं बडोदा अधिपतीयांना, कायम त्या स्थाना, करावे त्यांना, अन् सरदार वल्लभभाई पटेलास, प्रधानपद द्यावें तेथील त्यास, चोख कारभार होईल हमखास ॥

चा. क्र. २ ) रत्नागिरी प्रांत कोंकण, ठाणें मुंबई, कुलाबा कारवार ॥

वेगळा करुनीया तेथं, जव्हार राजे करावे गव्हर्नर ॥

आप्पासाहेब पटवर्धनांसी, तेथलां द्यावा कारभार ॥

चा. क्र. ३ ) कर्नाटक, म्हैसूर मुलुख काढडी सर्व ॥

तिथं सोंडूरच्या महाराजांना मुख्य नेमावं ॥

कर्नाटकसिंह देशपांडेना प्रधानपद द्यावं ॥

नागपूर मराठा भागीं इंदोर नरेशां ठेवावं ॥

तिथं मुख्य प्रधान तें देशमुख रामराव ॥

चा. क्र. ४ लगट= ) त्या निजाम राज्यांतून, मराठी भाग बाजूस काढून, वऱ्हाडांत सामील करून, :-

॥ हिंदुस्थान कल्लूकरीन ॥

चा. क्र. ४ ) बाबासाहेब खापर्डेकडे कारभार भावा सोपवून ॥ पुण्यारवालचे मराठी जिल्हे सारा, महाराष्ट्र नांव त्यां अहाहाहा!, आनंदवनभुवन पहा, शिवरायाचा मुलुख तो महा, तिथं लोकमान्य टिळकांचा नातू नेमावा ॥ ज्यांचे नांव जयंतराव, तिथं ल. ब. भोपटकर यांना प्रधानपद द्यावं ॥ ओरिसान गोंड संस्थानं, सारीं एकाजागीं करून, गव्हर्नर डॉक्टर मुखर्जीना टाका नेमून ॥

चा. क्र. ८ दांगटी ) याशिवाय निजाम राज्यातून, प्रांत तेलंगण, बाजूस काढून, मद्रासमधलाही तेलंगणप्रांत। दोन्हीं मिळवावे एकमेकांत, सरहद्द गांधी वीर अरव्यांत, गव्हर्नर नेमावे त्याप्रांतात। तसेंच त्या पलीकडील आंध्रात, पट्टाभी सितारामय्या ख्यात, गव्हर्नर पदीं नेमा अरवयांत, तयांला दादा ॥

चा. क्र. ४ लाट ) त्या तिकडे केरळभागांत, म्हैसूरच्या राजांना मुख्य नेमावं तिथं ॥ कारभारी नेमा खास गोविंद वल्लभ पंत ॥

चा. क्र. ३ ) बाडयांत ग्वाल्हेर, इंदोर ही मुख्य दालनं ॥
ठेवावें मुख्य ग्वाल्हेर महाराजा जाण ॥
कारभारी, बडे शितोळे यांजकडे सोपवून ॥
वाड्याचे कराया हवाई संरक्षण ॥
जोधपूर नरेशांना सर्वाधिकार देऊन ॥
मदतीला द्यावे गव्हर्नर प्रांत कोंकण ॥

चा. क्र. ४ लाट ) तेथोर जव्हार महाराज, वाड्याभोंवती समुद्रसाज, संरक्षण करण्या आज, वाड्याचे पाहण्या सारे मुख्य कामकाज ॥ कमांडर इन चीफ साधार, महाराज देवास सिनियर, परराष्ट्र आणि प्रधानमंत्री लाल जवाहीर ॥ संरक्षण मंत्री कुंअरूजा, मजूरमंत्री एन. एम. जोशींना, शिक्षणमंत्री बी. जी. खेरांना, फायनान्स मिनिष्टर जमनादास मेहतांना ॥ लष्करी सत्ता द्यावी कन्हय्यालाल मुन्शींना ॥ रेल्वे बोर्डावरी नेमावे आझाद मौलाना ॥ वाड्याची अशीही नवी करावी रचना, मग त्याचा रंग इंग्लीश, बदलूनी पांढारवहीरवास, पांढऱ्या शुध्द खादीचा चालुया यांस ॥ वरी चढवूं झेंडा भारताचा तिरंगा खास ॥

चा. क्र. १ ) जाहली मान्य ही रचना, सकलांसी जाणा, संपवी कवना, शाहीर दीक्षित, आतां साचार, मांडिले सुचले जेजे विचार, शाहीरी धर्माचा हाच आचार ॥ २ ॥

शनिवार दि: ८।१०।८३ नवापूर.

॥ श्रीगुरुदेव प्रसन्न ॥

॥ काळा बाजार ॥ कवी :- ग. द. दीक्षित (सांगली)

॥ भाग १ ला ॥

चा. क्र. ७ भेदीक - ९) (७९) ३९ साल महा, सप्टेंबर महिना आहा, तारीख त्याची तीज पहा, इंग्रज जर्मन, पराक्रमी हिटलर, आणि इंग्रज सरकार, युद्ध त्यांचे घनघोर, तेव्हांपासून ॥
सरकारानं केला साठा, धान्याचा तो फार मोठा, शेतकऱ्यांचा केला तोटा, कायदे करून, घेऊनिया धान्य स्वस्त, करूं म्हणती आता शिस्त, चहूंकडे दरोबस्त, हिंमतीनं ॥

जाई पण परदेशांत, धान्य आणि कापड यांत, आगबोटी गलबत, भरभरून, व्यापाऱ्यांची चंगळ झाली, पोटं त्यांनीं फुगविली, काळ्याबाजारानं भेली, कावा करून ॥
शहाणा झाला कितीजरी, शेतकरी तो शेतकरी, लुटती त्याला व्यापारी, फसवून, नफेबाजीस सुमार नाहीं, राज्य आलं मोंगलाई, ऐका त्याची नवलाई, लक्ष देऊन ॥

चाल बदलून) सगळीकडे बसले कंट्रोल, मोटारीस नाहीं पेट्रोल, सारख्या आणिक रॉकेल,
चाल :- ) म्हणून काहीं व्यापाऱ्यांना, देऊनिया परवाना, सरकारानं काढली जाणा, धान्य दुकानं, तिथं सुध्दा बाजार काळा, नंगानाच चालू लागला, डोकेबाज व्यापारी भेला, पूर्वीपासून ॥

आलं आलं रॉकेल आलं, आलं आलं संपून गेलं, आला तुम्हां येण्या वेळ, जावा निघून, सारख्याची तीच तऱ्हा, देती कसा लोकां खरा, ऐका त्याच्या परकारा, पाणी मारून ॥

चा. ब. ) गरिबांच्या कार्डावरती, तें पन्नास धान्य हे देती, सारख्या काढूनी नेती, काळ्या बाजारांत धाडिती।

चाल :- ) कोळशाच्या गाडीतूनी, जाती तांदळाच्या गोणी, सारख्याही डब्यातुनी, ध्या बघून, सायकलीच्या ट्यूबमधून, नेती दारू भरभरून, पोलीसांच्या समोरून, धूळ चारून ॥

चा. ब. ) पोलीस घाली जर खोडा, नोटांचा करकरीत जोडा, फेंकती तयांच्या तोंडा,
चाल :- तोंड त्यांचे रंगवूनी, जाती दिवसाढवळ्या घेऊनी, धान्यावरती बसले जरी, देशाजिंग। बाहेर कांहीं पडूं न देती। अधिकाऱ्या वळविती, यावे कसे उघड्यावरती त्यांचे बिंग ॥

एकीकडे काळाबाजार, दुसरीकडे सरकार, युद्ध असे त्यांचे फार, चाले जोरानं। अजबसा गनिमी कावा, मोठमोठ्यांचाही दावा, साधला त्यानीं धरूनी हेवा, गमतीनं ॥

:-

## ॥ काळा बाजार ॥

चा. ब. ) औरंगजेबासारखा जोर, हतवीर्य आला खरोखर, जनरल डी बेट ही थोर,

चाल:-) थोरांपासून लहानापर्यंत, मालकापासून नोकरापर्यंत, वरिष्ठापासून शिपाया पर्यंत, काळाबाजार। घालीतसे नाचनंगा। युद्धतिकडे येता रंगा। दुष्काळाचा फिरला ढंगा, उपासमार॥

॥ भाग २ रा ॥

चा. क्र. ७ भेदीक - २) किर्लोस्करवर खटला आला, अधिकारी कितीगेला, तुरुंगामधे कोंडायाला, खडीजाण। गिरणीवाल्याचीही पोटं। फुगुनशानी आली तट्ट, काळा जसा करी गट्ट, मासा लहान ॥

बेचाळीस शिवल्याचा माल, चव्वेचाळीस साल आलं, पंचेचाळीस उलटून गेलं, तरीही दडवून, विकती काळ्या बाजारांत, दसपट भाव घेतात, पातळाचे जरीकांठ गेले विटून ॥

मोठमोठ्या स्त्रियांनाही, जाडजूड अशा पाही, जावे लागे पायीं पायीं, झगे घालून। पोरं सोरं फिरती उघडी, चोळीसारखी एकच चड्डी, प्रसंग असा पुरुषांवरती, आला कठीण ॥

चा. ब. ) उघडले खाते छापमारी, तरीजाणा धूर्त व्यापारी, गिऱ्हाईका आपची मारी,

चाल:-) असुनीया शिल्लक कोठा, म्हणती संपला आमचा सांठा, घाल जर भाव मोठा, न्यावे घरून, तुम्हीं आमचे विश्वासराव, म्हणुनिया असा भाव, नाहींतरी निघून जावं। जलदी करून ॥

युरोपियन लोक ज्यांचा मेंदू हुशीयार, सुशीक्षीत लैय्यार, आहे तिथंही काळा बाजार, घाली थैमान। भारतमंत्री ऍमरीपुत्र, काळाबाजार करणार, लॉर्ड हॉ हॉ सारखेवीर, येती जन्मून ॥

चा. ब. ) बंद करण्या काळाबाजार, एकच उपाय जाणा छानदार, काँग्रेसला सर्वाधिकार,

चाल:-) म्हणुनीच व्हॉईसरॉय, लॉर्ड वेव्हेल साहेब पहावं, काळाबाजार म्हणे, नष्टकरणं, झटतसे बोलावुनी, गांधी बाबालागीं क्षणीं, सिमलापरिषदच्याध्यानीं, लक्षदेऊन ॥

चा. ब. ) शाहीर देवास दरबार, माणिक राज्य सौंदूर, दीक्षित क्रांतीशाहीर,

चाल:-) नवी नवी तऱ्हा काढी, कवनाची लावी गोडी, अन्यायाची काढी खोडी, धीर धरून। बंद करा बाजार काळा, सुखवा गोरगरिबाला, विनती ही चरणांला, नम्रपणानं ॥ २ ॥

नवापूर दि. ८।१०।८३. क्रांतीशाहीर रघुवीर दीक्षित चिंचणीकर.

॥ नाडीपरिक्षा वैद्य ॥ ॥ संवाद लेखक - कवी - राष्ट्रशाहीर म.द. दीक्षित ॥

॥ भाग १ ला ॥

हिंदमाता :- बाळा जवाहिरा! नाहीरे, या पारतंत्र्याच्या दुखण्यातून मी उठेन कां? आतां अगदीं सोसवत नाहीरे!

जवाहीर :- माते! हे पहा, हकीमसाहेब आलेत, या, या, हकीमसाहेब.

हकीम :- क्यों, माई बीमार है! ठैरो, आजो इनका बदन बहुत बडा हुवा है.

जवाहीर :- मग याला उपाय काय?

चा. क्र. ६ कटाव-५) जर हिचे भाग कापून, तुकडा एक लहान, घाल तुम्हीं जाण, पहा पाकिस्तान, पाकिस्तान / तरच होईल आईची सुंदर आकृती छान ॥

जवाहीर :- काय पाकिस्तान? तें शक्य नाहीं. माझ्या प्रिय मातेचे मी कधींही तुकडे होऊं देणार नाहीं. चले जाव. (इतक्यांत धन्वंतरी येतात) कोण धन्वंतरी! या, धन्वंतरी या. माझ्या या मातेला रोग तरी कोणता झाला आहे सांगा.

धन्वंतरी :- (इकडे तिकडे पाहून, तपासल्यासारखें करून) या बाईनं कांहींतरी गिळलेलं दिसतंय. इथं हे एकाच मुस्लीम लीगचें आत्याचं पेड दिसतं आहे. तेव्हां, राष्ट्रीय मुसलमान हे दुसरें पेड, हिच्या पोटांत गेलं असावं. तें ओकल्याशिवाय या बाईला बरं वाटणार नाहीं.

चा. क्र. ८ दांडी) पाहून यांची कल्पना, हसं आवरेना, हिंद-पुत्र जवाहीरास, वैद्यराज चुकला आपण तर्कास। दुसरें पेड इकडे आहे या समयांस, राष्ट्रीय मुसलमान नांव हे त्यांस, भरडून काढण्या पाकवाल्यास, ठेवलं हाय दारा ॥

(नाडी परिक्षा वैद्य)

जवाहीर :- या, या, वैद्यराज या. तुम्हीं तरी चांगलं रामबाण औषध सांगा.

वैद्यराज :- हां हां, सांगते, सांगते, आम्हीं कधीं कुणाला बरा केला तो तुम्हाला करेल? अहो हिच्या अंगात रक्त फार झालं आहे. तेव्हां :-

आधीं काढलं पाहिजे रक्त, सांगतो सक्त, नोकरशाही वैद्य मी घ्या ऐकून, काढावं रक्त जळवा लावून, युध्दाचे फंड उभे करून, व्हॉईसरॉय फंड टाका देऊन, नॅशनल सेव्हिंग सर्टीफिकेटस काढून, रेडक्रॉस दिमाख वाढवून, बोटी आरमार सैन्य सुधारून, पोसा हिंदी फौज शिक्षण देऊन, तरीच ही माता राहील टीकून, ध्यानीं घ्या दादा ॥

जवाहीर :- अहो! हिंदी फौज म्हणतां, पण ती आपल्या आईचं रक्षण करण्यासाठींच :-

॥ नाईगोरीचा लैंस ॥

जवाहीर:- असली पाहिजे. तें कांहीं नाहीं. विलायतेहून इकून आलेला डॉक्टरच आणूया.

॥ भाग २ रा ॥

चा. क्र. ५ कटाव - २) सूट, बूट, हॅटवाले आले तें डॉक्टर, रबरी नळ्या बरोबर, लावून कांनां खरोखर, म्हणती रक्तच वाढलेफार, वाढवुनी इथें व्यापार, आधी कमी कराबें सांधार ॥

उभे करा मोठे मोठे असें भांडवलदार, युरोपियन सांधार, अधिकारी तें भरदार, नेमून बडे पगारदार, परदेशीचा करा प्रचार, कादा गिरण्या अमित साचार ॥

चा. क्र. ८ कांटी) तोंच आले बोडके वैद्य एक, बोलती देख, सांगतो पक्क, भयंकर रोग हिच्या उदरांस, नष्ट करा आधीं भांडवलदारास, पिकती जें गोरगरीब लोकांस, बड्या बड्या शेठ सावकारांस, पथ्यपाणी एकच या रोगांस, रशियाचे अन्न घावें खाण्यास, मदत होईल पचनक्रिया होण्यास, नाहीतर कराल आईचा नाश, ध्यानीं घ्या दादा ॥

पाहुनी बावरा लाल, जाहला लाल, जवाहिरलाल, ऑपरेशन करून आली हैराण, आमुची हिंद माता ही जाण, औषध एकच तिला रामबाण, इथलेंच अन्न पाहिजे खाज, सुधारेल माय होईल बलवान, अखंड भारत फडकेल निशाण, माईचे दादा ॥

चा. क्र. ३ )

पुत्राचे बोल ऐकून आला गहिंवर ॥

बोलली हिंदमाता ती बाळ जवाहीर ॥

वळखिलास तूंच बा एक माझा आजार ॥

परक्यांचा जुलूम होईजा सहज क्षिणभर ॥

चा. क्र. ४ लाट) एकच औषध देई रामबाण, मनावरीं प्रेम ठेऊन, जातीय तंटे मोडून, एकदील सर्व होऊन, परक्या जकबा कराचलेजाव एक मतानं ॥ तरीच जगण्यायोग्य मी बाळा खास होईन ॥

जवाहीर:- आई! या देहांत प्राण असेपर्यंत मी एकच घोषणा करीन.

॥ बोला अखंड भारतकीं जय ॥ बोला हिंदमाताकीं जय ॥

॥ बोला स्वातंत्र्य देवीकीं जय ॥

दि. ८/१०/८३ जवापूर

॥ सद्गुरु जयराम स्वामी महाराज की जय ॥

॥ कॉंग्रेस इलेक्शन ॥ कवी – क्रांतीशाहीर ग. द. दीक्षित चिंचणी ॥

॥ भाग १ ला ॥

चाल क्र. १) आझाद हिंद फौज नेता। सुभाषचंद्र ख्याता, स्वर्गामधीं जातां, पाहुनी आपुल्या वीर पुत्रांस, आनंद झाला महादेवास। शाहीर दीक्षित सांगे सकलांस ॥ धृ० ॥

म्हणे सुभाष तात शंकर, फार सत्वर, आला भूवर। परी राक्षसांची शक्ती वाढण्यास, झाला उपयोग तयाचा खास, पडला भारत आजार जगतांस ॥

चाल क्र. २)
त्या समयीं महादेवाजीं, केली आज्ञा धन्वंतरी यास ॥
आश्विनीकुमारास घेवोनी, दवाखाने हिंदुस्थानांस ॥
काढुनीं ठीक ठिकाणीं, करा सत्वरीं उपचारास ॥
डॉक्टर देशमुख आणि गिल्डर, याजांही घ्यावें साह्यास ॥

चाल क्र. ३)
उघडला दवाखाना भव्य, हिंद नगरीस ॥
येऊ लागले रोगी भराभरा दवाखान्यास ॥
पहिला रोगी डोकेदुखीवाला मुस्लीमलीग खास ॥
पाहती तपासून डॉक्टर देशमुख त्यांस ॥
झाला म्हणती पाकिस्तान ट्यूमर याच्या मेंदूस ॥

अश्विनीकुमार :- हा रोग फार भयंकर आहे. ब्रिटिश राजवटीच्या स्टिलफ्रेमने यांच्या डोळ्यांना विकार आला आहे. त्यामुळे यांची डोकेदुखी बरी होत नाहीं. तेव्हां ती स्टील फ्रेम काढून टाकणे, हेंच यांवर रामबाण औषध आहे.

धन्वंतरी :- ठीक आहे हे. दुसरे रोगी पहा.

चाल क्र. ४ रंगारी) एक होता सनातनीवाला, दुसरा तो भला, हिंदुसभावाला, गिल्डराजी तपासिले तें त्यांस, हंसुनिया सवाल केला समयांस, डोळ्यांचाच विकार याही दोघास, म्हणून पाहताच पहिल्या रोग्यांस, मुस्लिमलीगवाल्या आणा ध्यानांस, भरते धडकी यांच्या हृदयांस, वाटते भीती यांच्या चित्तास, कारण याचे एकच सांगतो आपणांस, फार दिवस गुलामगिरीच्या काळोखास, राहिल्याने आजार झाला डोळ्यांस, आवडतोय यांना स्वराज्यप्रकाश, परी नाहीं सोसत यांच्या नेत्रांस, म्हणून यांना शेंच दवाखान्यांस, ठेऊन घ्यावें उपचारास, सोसेल तसा द्यावा स्वराज्य प्रकाश, ऐका तुम्हीं ॥

चा. क्र. लगट ४) आला इतक्यांत कुंडलेवाला, मूर्तिमंत दारिद्याचा पुतळा, —— :-

॥ कॉंग्रेस - इलेक्शन ॥

पा. क्र. ४) लगट

शेतकरी पोटदुखीवाला, येऊन बोलूं लागला, पोटदुखी असें आम्हांला, सावकारानं पुरतं लुबाडीलं आम्हांला ॥ नाहीं अन्न पुरतं पोटाला, देशमुखांनी सवाल काय केला, एकच उपाय आहे बाबा याला, निवडून आणा कॉंग्रेस सरकाराला, निघून जा आतां आपल्या गांवाला, न. निवडणूक होईल ज्यावेळां, मत आधीं देऊं कॉंग्रेसला, मग तुझा आजार जाईल खात्रीनं याला ॥

इतक्यांत लट्ठ पोटवाला, दुसरा रोगी एक आला, भूक लागते फार म्हणे मला, नाहीं माल व्यापार करण्याला, कंट्रोलनं आमच्या पोटाला, पहा चिमटा बसूं लागला, काळाबाजार किती जरी केला, तरी पोट भरेना या वेळां, गिल्डराजीं तपासून त्याला, त्यांनीं सवाल काय केला, ही भूक खरी नव्हे बाळा, हे देणगी स्वराज्य फंडाला, मतं द्यावीत कॉंग्रेसवाल्यांला, आणि निवडून खास यावेळां, फी हीच आमच्या औषधाची आणा ध्यानाला ॥

दांगटी

पा. क्र. ८ दांगटी

चौथा रोगी कापड गिरणीवाला, खोकतच आला, क्षय म्हणे झाला, परदेशी मालाचे जंतू हे खास, आम्हांला डॉक्टर देतीत्रास, कॉम्पीटीशन करणें त्यांच्यासंग खास, अशक्य होतें माल पुरवण्यास, हाच क्षयरोग आणा ध्यानास, देशमुखांजीं तपासुनी मग त्यांस, सांगितलं काय घ्यावं चित्तास, उपाय याला एकच सांगतो खास, शुद्ध हवेमधें जावें रहाण्यास, पगार भरपूर द्यावा मजुरांस, स्वच्छता ठेवा त्यांच्या भागास, समाधानी ठेवा त्यांच्या चित्तास, बोनस भरपूर देऊन सकलांस, कामाचे कमी करा नियातास, सांभाळावे गरीब मजूर लोकांस, घ्यावे मग औषध तुम्हीं समयांस, पथ्य मात्र नीट ठेवा चित्तास, पथ्य म्हणजे अर्धा गुण रोग्यांस, म्हणून सांगतो पथ्य आपणांस, कॉंग्रेसला मतें द्यावी या समयांस, गुण मग येईल पहा हमखास, तुम्हांला दादा, दादारं जीरं दाजी हे जीजी ॥ १ ॥

॥ भाग २ रा ॥

चा. क्र. ६/५ कटाव-) तोंच एक रोगी आला शुगरफॅक्टरीवाला, म्हणे साखरेच्या किती कुजला, आलीधाण सारीं बोला, परमीट देईना सरकार, ऊठविनामाल भरपूर, त्यामुळें पसरे आजार ॥

देशमुखांनीं सवाल केला त्याला तपासून, उपाय ठेवला हे योजून, मतें काँग्रेसला देऊन, आण निवडून काँग्रेस सरकार, येईलपर्यंत बाबा दम धर, म्हणजे जाईल तुमचा आजार ॥

चा. क्र. १) आला वालीसुगींचा भीम, आला धांडज, आला धामाधूम, हात पाय जणूं कुळवाच्या दांड्या, जणूं वाळलेल्या गवत काड्या, होता पोटवाल्याजी रडतोंड्या ॥

चा. क्र. २) एकामागून एक आली रांग, गेला भरून दवाखाना खास ॥
करूनिया तपासणी त्यांची, गिल्डरानीं समजाविले त्यांस ॥
दिले होते तुम्हां औषध, १९३५ सालांत ॥

चा. क्र. ३) पण तुम्हीं मानले नाहीं आमच्या वचनांस ॥
दारूबंदी केली तरी तुम्हीं न मानिलें त्यांस ॥
अजुनिही पिता चोरूनी ठावें आम्हांस ॥
मोडले पथ्य म्हणून आली दशा अशी खास ॥
औषध तेंच घेणें जरूर तुमच्या आजारास ॥
निवडून आणणें काँग्रेस हेंच हमखास ॥
ना एकमतानें द्या मतें काँग्रेसलाच खास ॥

चा. क्र. ४ लगट) राखण्या तुमची स्वच्छता, गिरणीवाल्यास सांगितलंय आतां, ना निघून घरीं तत्वता, काँग्रेसला मत हाच उपास द्यावा यानंतरतां ॥ इतक्यांत शेतकरी कांहीं, येऊनी लागले पायीं, म्हणती जमीन आम्हांला नाहीं, देशमुखांनीं पाहून लवलाही, सांगितले ऐका नवलाई, जलोदर झालाय तुम्हांस जाणाया समयीं ॥ खाल्लेलं तुमचं सारं अन्न, जलोद टाकतो खाऊन, तुमच्यासाठीं काँग्रेस सरकारानं, कूळकायदा तो करून, आणि केलं कर्ज निवारण, दिलं होतं औषध रामबाण, त्यापरीच आजही औषध जरूर आहे घेणं ॥ खाण्यास योग्य असं अन्न, काँग्रेसला मतें तुम्हीं देणं, हे पथ्य पाळावें तुम्हीं मनापासून ॥ गेला शेतकरी, परी आला रोगी ढोंगी एक महान ॥ :-

॥ कॉंग्रेस इलेक्शन ॥

चाल क्र. ३) सर्वांगी जाहली करटें त्याच्या अनिवार ॥
देशमुख म्हणती बाबांनो हा काळाबाजार ॥
करूनिया बंद आणा निवडून कॉंग्रेस सरकार ॥
तर मात्र जाईल हा सारा तुमचा आजार ॥
पक्का कॉंग्रेसच करील भारताचा उध्दार ॥

चा. क्र. ८) डांगरी) इतक्यांत सुभाषबाबूंचे, आझाद सैन्याचे, रोगी आलेसाचे, लढाईत जखमा झाल्या होत्याच्यार, धन्वंतरीस दु:ख झाले अनिवार, कारण तो बंधुतयाचा थ्वार, सुभाषचंद्र हा चंद्र साधार, म्हणून या धन्वंतरीनें साचार, तपासून सवाल केला जोरदार, सांगतो ऐका त्याचा परकार, पुढे आतां दादा ॥
यांना इथेंच घ्यावे देऊन, समय जाणून, परकीय जंतूपासून जखमांस, संभाळले पाहिजे यावक्तास, शौर्य अवाहाच्या पाण्यानें त्यास, धुवुनिया स्वच्छ करा यासमयांस, शांतताप्रेम वॅसलीन खास, खटल्यातील मुद्दे बारीक पावडर त्यास, भिसकून लावा साऱ्या जखमांस, उशिर काय जखमा बऱ्या होण्यास, पथ्य आहे माहीत आझाद सैनिकास, कॉंग्रेसला साह्य करणें समरांस, निवडणुकींत मतें देण्यास, कॉंग्रेसला दादा ॥
गोळीबारांत जखमी झालेले, रोगी ते आले, विद्यार्थी मेले, करीत जय हिंद गर्जनेला, नेहरुजी हंसून सवाल केला, स्वातंत्र्यरणांगणीं बोला, जखमा अशा व्हायच्याच शरीराला, अगदींच किरकोळ, औषध त्याला, कशाला रें पाहिजे बाळांनो तुम्हांला, म्हणून केली आज्ञा नर्सबाईला, देवी सरोजिनी नायडूला, यांना या पेपरमिंटच्या गोळ्या, मंत्र जयहिंद देऊन यानला, महात्मा गांधी की जय बोला, उशीर नाहीं जखमा बऱ्या व्हायला, गा सैनिकांनो दादा ॥

चा. क्र. १) शेवटीं घ्यावें ऐकून, मतें देऊन, आणा ले जिवडून, तुम्ही जर आपले कॉंग्रेस सरकार, होतील नष्ट सारे आजार, शाहीर दीक्षित ग्वाही देणार ॥
शाहीर र. द. दीक्षित ~~सुभाष~~ दि. ९।१०।४३ नवापूर.

॥ रत्नज्या मोत्याचीजय ॥ अर्थात ॥ तेरं गौरेउत ॥

कवी :- राष्ट्र-क्रांती शाहीर गणेशदत्तात्रयदीक्षित चिंचणीकर (सातारा)

॥ भाग १ ला ॥

चा. क्र. ७ भेदीक ३) जरि एकदां हिंदमाता ती जवाहीरखान्यासी, तपासून पाही दागिन्यासी ॥ हो ॥
सर्व दागिन्याच्या मध्यभागीं ती तेजे विलसत । रत्नज्या मोत्याची एक जथ ॥
एका बाजूस सती पद्मिनी आणि जिजामाता । अहिल्यादेवी पतीव्रता ॥
चांद बिबी, कित्तूर चन्नमा, राणी येसूबाई । पराक्रमी तेलीण ती ताई ॥
चा. क्र. ५ कटाव-५) दुसरीकडे मुत्सदी ताराबाई, गोपिकाबाई, पेशवे रमाबाई, होत्या विलसत । विलसत । कल्पकडे जव्हेरी रत्नज्या मोत्याची जथ ॥
इतक्यांत विष्णूदूतांनीं, झाशीची राणी, लक्ष्मी अद्गुणी, आणिली स्वर्गांत, स्वर्गांत । ठेवी मस्तक, लक्ष्मी देवीच्या चरणांवरतं ॥

देवी :- कायगं लक्ष्मी ! हिंदू मुस्लीम ऐक्य घडवून, तूं एवढा पराक्रम केलास, मग तुला अपेश कां आलं ?

लक्ष्मी :- माते, ऐक ॥ गाणें ॥

माते! तुझ्या पुत्रांत, आई! माझ्या भावांत, एकी मुळींच नाहीं, फितुरीचे भिनले विष, अंगीं यांच्या ताई । अजूनीही जन यांचे, उघडत नाहीं, माते ॥ धृ ॥
जिथं जिथं फितुरी, तिथं अपयश । असा इतिहास, जाण लवलाही, अजूनीही ॥

देवी :- मग तूं काय केलेस ?

लक्ष्मी :- माते ! मी,

चा. क्र. ८ दांगटी) हिंदू मुस्लीम ऐक्य घडवून, सालीं सत्तावन, कैक गोऱ्यांना पाजलं पाणी, तात्या टोपेंची मदत घेऊनी, नानासाहेब पेशव्यास साह्य देऊनी, कैक इंग्रज पाडले रणांगणीं, किती पळविले रानोरानीं, पाहिला एकपलकरूनी, परी आमच्याच फितूरांनी, अपयश पदरीं पाडले माझीं, ऐक तूं आई ॥

देवी :- अरेरें ! एकूण माझा जन्म असा पारतंत्र्यातच जाणार नां ?

लक्ष्मी :- नाहीं माते ! तरी एकी पुन्हां घडवून आणण्यास, मी माझा शांतीदूत पाठवला आहे.

देवी :- तो कोणता गं ?

लक्ष्मी :- दांगटी-) ऐक आई !) जयेमध्यें खेडतव पांच, त्यांतला साच, पांढरा तोच महात्मा गांधी, ज्यांते सहाय्य ऋद्धी सिद्धी । खरोखर अतुल त्यांची बुद्धी, सोसतोय तुझ्यासाठीं व्याधी । दिसते ही घडण जरी साधी, राजकारणी आहे मुत्सद्दी, नांबापरीं खरा महात्मा, गांधी ॥ ऐक तूं आई ॥

॥ खव्या मोत्याची नथ ॥

दांगटी :-) चौकड्यांत खडा जो लाल, तोच भूपाल, हिंदभू लाल, जवाहिरलाल नेहरू खास। सोडूनी राजैश्वर्य लिलावास। महात्माजींच्या असे साह्यास, प्यार लई हिंदवीर तरुणास। जणूं युवराज गांधींचा खास, वारस हिंदभूच्या तख्तास। तोच आहे आई ॥

चौकड्यांत पांढऱ्या रंगाचा, खडा महत्वाचा, तेंच पहा तेज महात्म्याचे, हिरवें तेज हिरव्या लोलकाचे, मौलाना आझाद वीराचे, लाल तें जवाहीर लालाचे। चिन्ह हिंदू मुस्लीम ऐक्याचे। तिसरें वल्लभभाई पटेलांचे। चौथे शंकरराव देव यांचे, खास हाय आई ॥

देवी :- पण कायगं लक्ष्मी, ही वरती टीक दिसते आहे ती कसली आहे?

लक्ष्मी :- दांगटी-) वर टीक दिसते जी महाज, तेजस्वी छान, तीच गे जाण, कस्तूरबा गांधी सती हमखास। सोडूनी खांदा पतीचे खांद्यास, लढतां लढतां आली निघून स्वर्गास, भंवतीं जो अठरा मोत्याचा घोस, हिंदी जनता तारसोन्याची खास, खव्या मोत्याची नथ गुंफण्यास, घेतली बघ आई ॥

॥ भाग २ रा ॥

देवी :- पण कायगं लक्ष्मी, हा गांधी तर दरिद्री नारायण दिसतो, हा काय करणार?

लक्ष्मी :- दांगटी-) माते!) जरी दिसला दरिद्री नारायण, महात्मा जाण, तरी हे ध्यान, दिपवून टाकील सर्व जगतांस, भारी तरबेज राजकारणास, मिळवुनी हिंदू मुसलमाजांस, केलं हरीजन उध्दार कार्यास, फितुरी घालविली विलयास। जंगा फकीर दिसतो सकलांस, भासे परी काळ गोऱ्या लोकांस, त्याचे नांव ऐकतां खास, बसते जबर धडकी हृदयांस। सुदर्शन, चरखा चक्र हातास, बसवी जो, चरका आंगल चित्तास। ऐक तूं आई ॥

देवी :- पण कायगं, यानं हिंदू मुस्लीम एकीचं आतिक तरी काय केलं आहे?

लक्ष्मी :- पद :-) पहा हा देवी तिरंगी झेंडा। अकल कातो आज चारी खंडा ॥
मोडूनी जातीभेद बंडा। तोडितो पारतंत्र्य दंडा ॥
बांधूनी स्वराज्याचा गंडा। इंग्रजावरी करी खंडा ॥

देवी :- (रागानें) काय तिरंगी? माझा भगवा झेंडा असतांना त्याला तिरंगी करणारा हा गांधी कोण?

लक्ष्मी :- मातें, यांत त्यानं नवीन काय केलं आहे! :-

॥ स्वराज्य सौख्याची जय ॥

॥ गाणे ॥ (चाल:- अखिल हिंदु विजयध्वज हा)

लक्ष्मी:- जयेमधें तव हे तीज, रंग खरोखर महाज, एकी हिंदु मुस्लीमांची, दाविती जगां ॥
पण तसं कशाला? याचं वर्णनच ऐक.

॥ झेंडा वंदन ॥

प्यारे हिंदु मुस्लीम भाई, वंदूया चला, तिरंगी, पाहूयां चला, ध्रु० ॥
राम रावणाच्या युद्धीं, राम हनुमंता बोधी, वस्त्र घेऊनी हे आधीं, बनवी ध्वजाला ॥
मूळ वस्त्र रंग सफेत, लागतांच रावण रक्त, लाल रंगये किंचीत, एका बाजूला ॥
हिरवा रंग सौभाग्याचा, अलंकार तो सर्वांचा, स्त्रियांचिया जोहाराचा, रंग लागला ॥
बाकी राही रंग सफेत, शांती अहिंसेचा दूत, तीज रंग सहजचि येत, राष्ट्रध्वजाला ॥
भगवा प्यार तो हिंदुला, हिरवा प्यार मुस्लीमाला, एकी हिंदु मुस्लीमांची, दावी जगाला ॥

देवी:- ठीक आहे. पण काय गं! या टिकीच्या जवळ आणखी दोन लोलक व हिऱ्याचे पान कसले?

लक्ष्मी:- (सांगते) हे दिसतें हिऱ्याचें जे पान, तेंच गे जाण, बहादुरी बेगम आझाद गुणवान, बाजूचे लोलक आहेत जे दोन, एक त्या कमला नेहरू छान, दुसरी इंदीरा नेहरू बलवान, ध्याजो घे आई ॥

देवी:- पण काय गं? हे अठरा मोती कोणचे कोणचे आहेत?

लक्ष्मी:- (सांगते ऐक.) सर्वस्वाचा त्याग करणारी, अशी सती खरी, देवी सरोजिनी नायडू खास, कमलादेवी चट्टोपाध्यायही त्यांस, विजयालक्ष्मी पंडीत आण ध्यानास, राणी अमृत कुंवर प्रसिद्ध जगतास, सौभाग्यवती लीला मुनशी समयांस, पराक्रमी हंसा मेहता साथास, सुशीला नायर लढवय्यी खास, अरुणा असफअली ठाऊक सर्वांस, सोफिया खाज डेव चित्तास, मीराबेनही दुसऱ्या भागास, प्रेम कंटक ला जाणती सर्वांस, सुचेता कृपलानी वंद्य सकलांस, कॅप्टन लक्ष्मीही आझाद सैन्यास, ऐक तू आई ॥

देवी:- पण काय गं, हिंदुस्थानांत एवढे पराक्रमी राजे आहेत, देवास सिनिअरला तो विक्रमसिंह पवार, सोंडूरला यशवंतराव घोरपडे वगैरे या राजांच्या राण्या काय इस्पितांतल्या राण्या आहेत कीं काय!

लक्ष्मी:- (छे छे! माते!) हे पहा पत्नी वीराची, शान बाण्याची, राणी धीराची, प्रमिला राजे सिनीअर देवास, सांभाळून आपल्या राज्यकारभारास, :-

॥ खऱ्या मोत्याची नथ ॥

पतीला थाडी थोर समरांस, सुशिला महाराणी सोंडूर राज्यास, दानशूर घोरपडे घराण्यास, चालवलाय त्यांनीही आजच्या वक्तास, राणी प्रियंवदा आहे जव्हारास, शांतादेवी गाईकवाड बडोद्यास, देवी उर्मिळा इंदूर नगरांस, राणी सरस्वतीचा सांगलीत वास, खऱ्या मोत्याची नथ गुंफण्यास, शाहीर दीक्षित घेई कष्टास, सांगलीला कृष्णातीरी रहिवास, दत्तात्रेय कृपा लाभली ज्यास, अशा कितीकांच्या सांगू नावांस, एक म्हणे आई ॥

देवी:- ठीक आहे. जवाहिरखाना बंद करा.

॥ बोला हिंदमाता की जय ॥ नवापूर दि. १०।१०।८३.

क्रांतीशाहीर रघुवीर दीक्षित.

॥ आरशातील मुंबई ॥ कवी :- [illegible] (सातारा)

ती :- बोल खरंच बोल, [illegible] मुंबईला [illegible] का ! ।
नेसून आलू हिरवा, फुलांच्या हवा, मळभार [illegible] का ? ॥

तो :- काय, नाही मुंबई [illegible], तिथं सारी मिलिटरी, सोल्जरांचा [illegible]
का ? । जुलूम सहन होईल का ? । नाही जागा रहाण्यास, सकस अन्न खाण्यास ।
आली अंगामध्ये राहील का ? ॥

ते :- नाही, माझी [illegible], रहातो गिरगांवात, जागा मला जय देईल का ? ।
सोल्जरांची भीती [illegible] का ? । [illegible] आरसून, [illegible] जाईल [illegible] ।
तुम्हीं [illegible] वेडलयात का ? ॥

तो :- अगं आपल्या [illegible], [illegible], [illegible] मिळतील का ? ।
चहाची जागर [illegible] का ? । महागाई [illegible], [illegible] चौपटखाईची, तिथं पगार
चटणीला पुरल का ? ॥

चाल :) तुम्हीं [illegible] शिकलेले नाहीं, थोड्या पगाराची नोकरी तिथं पहा ।
[illegible], पण मुंबईला आम्ही [illegible] ॥

॥ भाग २ रा ॥

तो :- अगं मुंबई [illegible] [illegible] आपल्या [illegible] नाही [illegible]
अगं [illegible] ची [illegible] खोलीमध्ये पाणि [illegible] येई [illegible] ।
अती [illegible] [illegible] आपुली गावदरी, [illegible] ।
[illegible] [illegible] ॥ [illegible] :

ती :- [illegible] तुम्हीं [illegible] शेपटा पाहीं, जाऊ फिराया
जुहू चौपाटी । रोज [illegible] मोटारी । तिथली मजाच न्यारी, बाई ॥

ता :- सोडून आपुली ही [illegible], [illegible] सुंदर जोडी, [illegible]
[illegible], [illegible] मोटारी, इथली मजाच न्यारी, बाई ॥
[illegible] [illegible] [illegible], [illegible] [illegible], [illegible] जाते,
[illegible] [illegible], इथली मजाच न्यारी, बाई ॥

ती :- [illegible] आहे ते [illegible] [illegible] राहूया ।
[illegible] सर्वांना [illegible] ॥ (मागें पहा :-

दि. ११।१।६३ नवापूर

×——————×

॥ श्रीगुरुदेव प्रसन्न ॥

## ॥ कंट्रोलचे रहस्य संवाद ॥ कवी :- राष्ट्रक्रांतीशाहीर ग. द. दीक्षित चिंचणीकर ॥

॥ भाग १ ला ॥

आई :- तारामती, अगं ए तारामती, आजकी नाही आपल्या इथं पाहुणे येणार आहेत.
दहा वाजतां आतां आठ वाजले आहेत.

तारामती :- कोण गं आई ?

आई :- अगं तुला पहायला येणार आहेत ना ! चटदिशी कंट्रोलवर जाऊन साखऱ्या घेऊन ये.
चार दिवस झाले पिठ साखऱ्यांनाच चालले.

तारा :- पण आई, आज दोन तारीख ना ! फार गर्दी असणार बाई शिवाय अकराला
पाळी आली.

आई :- अगं, आज बायकांचा वार. शिवाय आपल्या घरांत कुणी पुरुषमाणूस आहे कां ?

तारा :- पण आई, रेशनिंग दुकानांत काळ्याबाजाराने साखऱ्या मिळतो ना गं ! आजच्यापुरतां.

आई :- चल, फाजील कुठली ? जा लवकर

तारा :- बरं बाई जाते. आणते रेशनिंग कार्ड आन पैसे. (पिशव्या, पैसे घेऊन निघते.)

गाणे :-) या बाई भारत भूमीत, कसा मेला आला चहारवायीत ॥
पूर्वी कांहीं कमी जहते, कंट्रोल भारीच हे जडते ॥

काय बाई तरी, जिथं जाव तिथं कंट्रोल. पूर्वी एकाच कंट्रोल एकात होता. तें म्हणजे
अर्धकंट्रोल. आतां तर सगळीकडेच कंट्रोल.

दुसरी मुलगी :- तारामती ;) जहता आहे कधीच तो हल्ला, कुठून मेला आला हा चहा,
काडीसाठी फक्त किती धांवा, हल कोते कुणाच्या तरी गांवा ॥

काय बाई तरी, म्हणे कार्ड तयार हाय, पर साहेब आऊन पडायचा हाय नां !

पहीली मु. :- म्हणजे काय ग ?

दुसरी :- अगं, त्यांची सही व्हायची नां ! पैसे त्याला सही करायला कुठे फुरसत आहे व्हय गं !

तीसरी :- बाई, बाई, या कंट्रोलनं तरी आधींच थोडं लावलंय मानसाला. दिसाची मजुरी
बुडवावी लागते यांच्या मागं लागावं. उठल्यापासून निजेपावतर सगळं कंट्रोल !
गुळावर : कंट्रोल. साखरेवर : कंट्रोल. कापडावर, लाकडावर, सगळ्यावर कंट्रोल.
अगं लढाई संपून दोन वर्षे झाली पर मेलं कंट्रोल काहीं उठत नाहीं.
अगं धान्यावर तरी कंट्रोल ? आतां सांग काय भाई येणार व्हय ?
आमचंच दाणं । पिकवणार ही आम्हीच, आज ताब्यांत मात्र दुसऱ्यांच्या !

तारामती :- कोणाचं बोलतेस ? कंट्रोलवर चालतीस, अगं पण कार्ड मिळालं कां ?

॥ कंट्रोलचे रहस्य ॥

रखी :- कुठलं गं? तयार आल्यामणं, पर अजून त्यो साहेब आडवा पडायचाय गं।

तारा :- काय ज्या बघं, आमचंच धान्य, आणि आमालाच बंदी. येंनी कायबी करावं.

(गाणं) आगल्यात पिकाला ये डाक। गोरे माजून आलयात गोल ॥
गाजरावाणी आले लाल। पोसल्याती पोलंडाचे पोळ ॥

रांडीचं पगार घेयात ते घेयात, वर आमच्या पिकाला बी कारबारयांत.
ती देवलंड वाल्यांची कारटी, कुठं अंगाच उपडं, उसच मोड, जुंधळाचं तोड,
कुठं नारळाचं फळील, त्या बाया बी तशाच. अन्यातनं आरसाळी काकडी
पळवयात.

तारा :- (गाणं :-) आलं म्हणे कॉंग्रेस सरकार। कंट्रोल जारीस करणार।
शेतकरी राजाच ठजणार। मग लै मजाच होणार ॥

दुसरी :- आगं, आलं की एक वर्षे सरकार येऊन. पण कंट्रोल उठण्याऐवजी, जास्तच
बसू लागलं की.

पहिली :- कुणी कुणी म्हणयात. आतां पोरांवरनी बी कंट्रोल बसणार हाय म्हणं.

दुसरी :- आपलं इंग्रज सरकारच बेस हुतं बाई! हे कॉंग्रेस सरकार आल्यापासनं,
कंट्रोल तर उठलं नाहींच, पर जकडं तकडं दंगे, जाळपोळ, खून मारामाऱ्या,
अन् बायांनी बी पकवयात म्हणं, अगदीं आगलागलीया जणू.

पहिली :- (गाणं) बरं बाई इंग्रज सरकार। नको हें कॉंग्रेस सरकार।
झाला सारा हाहाकार। भिजी भागूबाईच थोर ॥

तिसरी :- आगं त्या कलकत्याला म्हणं, गुंडानी बायकांना उताणे पाडून, पायानं त्यांच
कुंकू पुसलं?

दुसरी :- मी म्हनते आपल्याजवळ जर नाहीं, तर बारा बैलाची इसारत द्यावीच कां?

पहिली :- आतां काय होणं? गुंडानीं वाटेल ते केलं तरी तुम्ही आपलं शांतता पाळा.

पांचवी :- (हातांत रिजपाट व मोडका कंदील घेऊनयेते) नाव मासं मोडू, सोनुबाई.
हातीं रिजपाट नी घेउनाहीं. (गाणं)

गेला फाटण (कंदील) हो गंजून। फूल बी गेलं हाय बिघडून।
यात खालीं वरती होईच ज। छळलं बाई पुरतं या कंट्रोलनं ॥

पहिली :- आगं पण वाटली कां आजुनी नाहीं?

पांचवी :- आगं काल बाटली आणलीयती, पन गर्दीमधें पडून फुटली गं। :-

## ॥ कंट्रोलचे रहस्य ॥

(गाणे) काल रात्री मी गजानली हालीवाटली, नदीमध्ये पडून फुटली,
काच लागून टाच फाटली, पाय अन् रक्ताचीलागली ॥

चाल:) भरल्या कंचा रस्त्यात आले मध्ये गं, फक्त कंट्रोलनं समधा सबाई ॥

(पहिली मुलगी गडबडीने येऊन पुसते)

दुसरी :- अगं ए बया, कुठं चालिलीस पोरे? मागं हो, ही पंढरीची वारी दिसत नाहीं व्हय?

तारामती:- आहे नाई [illegible] मिळाय [illegible] माझी झालाआहे. मला जरा पाणी जोडय़ा हो।

दुसरी :- तरं तर, बघायलाच येनार असल्याल जणू? मागं हो, ये पाताळ फाटल बघ.

तारा :- अहो पण। (पुढं घुसं लागते)

पोलीस:- ए, कांहीं कळतं कीं नाहीं तुला? बारीत हो बारीत.

तीसरी :- पर ऊनांत किती वाळूक हुनं व्हायचं बाबा! ऊन तापतया कीं, त्या भोरड्यासजीं काय? सावलीत असल्यानी खुर्चीत, खुशाल पेडसल तोंडात धरून.

पोलीस:- इथं ऊन लागतय व्हय? अन् चहा ऊन लागत नाहीं वाटतं?

पहिली :- जसं काय मेले [illegible] घरचाच देतात. सरकारनं किती हाजा येवरचा कोळीया पन.

(खुर्चीवर बसलेली कारकून मुलगी)

का. मु.:- [illegible] पाहून) इसाई [illegible] ? तुझंच होय

प. मु. :- व्हय

का. मु.:- नांव काय तुझं?

प. मु. :- तुला वाचाय येत नाई? मग कशाला झोपटा सोडून तत ऐटीनं बसलीयास?

दुसरी :- (पहिलीस) अगं, लगीन हुईना, म्हणून नोकरी धरलीया. देशात दुष्काळ हात, पटला तर पटला एकादा।

का. मु.:- ए फाजीलपणानं बोलू नको, चालती हो. तुला आज कांही मिळणार नाहीं.

पहिली :- ऐ कां? { कारकून मुलगी:- साखर शिल्लक नाहीं. } पहिली मु.:- आनं बघ कीं कार्डावर काय नेलायाते { का. मु.:- कार्डावर असल पण आमचा स्टॉक संपलाआहे.

तीसरी :- ऑ! यवढ्यातच इस्टॉक संपला? मग लगीन कसं करायचं? बाग माझ्या चिमणे! काय म्हणे परमीट हाय, तर माल न्हाई. आग लाव तुझ्या इस्टॉकला. चलगं बया, धरी पोरं रडत असेल. ∴ जळलं मेलं हे कंट्रोलन त्यो इस्टॉक.

दि. ११।१०।८३ नंदापूर

॥ अधुजीवः नारद ॥ लेखक :- श्रीनिवास [illegible] दीक्षित (सांगली)

(पात्रें :- नारद, [illegible], तुंबर)

प्रवेश १ ला

नारद : (प्रवेशून गात गात) अधूं चरण मजसी कुणी दावा, विफल होत परिवार सकल परी । मनीं हुरहुर करीं जीव पिकल । अधूं चरण मजसी कुणी दावा ॥ नारायण ! नारायण ! छे ! छे ! छे ! छे ! कंटाळलो बुवा अगदीं या एकाकी जीवनाला. [illegible] न मिळून घरीं आल्यानंतर, एखादा मंजुळ शब्दही कानांवर पडत नाहीं, तर तें जिणं कसलं ? दिवसभर भटकावं, आणि रात्रीं घरीं आल्यावर, आपली शय्या आपणच पसरावी, तें कांहीं नाहीं संसारातच खरी मजा आहे. पण, संसार तर बायकोशिवाय होत नाहीं, काय करावें ?

तुंबर :- (प्रवेशून,) काय नारदा, आज स्वारी फार ताठ दिसते ? काय तार घातली [illegible] कानांत ? का ! अरे, असा सचिंत कां ? कां, आज कुठं कळ लावायचं जमलं नाहीं वाटतं ?

नारद :- कर बाबा ! तूंही थट्टा कर. अरे, या एकटेपणाचा अगदीं वीट आला आहे बघ. कुठं जावं, तर लग्न नाहीं म्हणून जो तो हेटाळणी करतो, घरीं यावं, तर स्वागताला कुणी नाहीं, मंजुळ असा आवाज कुठला ? ही तंबोरी, आणि या खडावा, हाच आमचा संसार !

तुंबर :- खरं आहे. लोक तरी कसे पहा ! लग्न झालेला माणूस असला, तर त्याच्यावर अगदीं पूर्ण विश्वास. मग तो कसा कां असेना ?

नारद :- अरे ! तें राहू द्या. पण ब्रह्मचाऱ्याला, पैसे देऊनही गांवांत रहायला जागा मिळत नाहीं. फार कठीण झालं आहे.

तुंबर :- तें कसं काय ?

नारद :- भाडं पटलं, जागा ताब्यांत घेतली, बिऱ्हाड आणलं, तेंव्हा मालक विचारतो ? मालकीण कुठं दिसत नाहीं ? काय, लग्न झालं नाहीं म्हणतां ? छ्या ! छ्या ! मग जागा नाहीं. धर्मशाळा तुम्हीं, तुम्हीं धर्मशाळेंतच जावा. अशी तऱ्हा होऊन बसली आहे.

तुंबर :- अरे ! मग लग्न कां करीत नाहींस ?

नारद :- कोणाचा लग्नाचा नाहीं म्हणतो ? अरे ! वधू पाहिजे म्हणून - :-

॥ अद्भुतिक नारद ॥

जाहिरात दिली, स्वैपाकाला पोरं पाहिजे म्हणून जाहिरात दिली, पण अं, हं !

तुंबर :- अरे ! तुझे वडील देव ऑफ देव, सृष्टी निर्माण कर्ते ब्रम्हदेव, भगवान विष्णू, कैलासेश्वर यांना कां विचारत नाहींस ?

नारद :- हे ! बापाला विचारण्यांत कांहीं अर्थ नाहीं ! भगवान विष्णूला विचारावं, तर ते सुंदर स्त्री म्हणून, पण पुरुषांना [illegible] जवळ घेऊन बसलेले. पण भोळा महादेव, त्याला विचारलं तर तो नंगा फकीर, मसणांत रहाणार. काय करावं ? बायको कोण देईल ?

तुंबर :- अरे ! मग मारुतीकडे जा, आणि आता [illegible] आहे कीं नाहीं छान ?

नारद :- वा ! छान म्हणे छान ! अरे ! मारुतीकडे जायचं म्हणजे एकादे तीच्या घरीं शिवरात्र. तुम्हीं तसे आम्हीं, भैटलासे स्वामी. अरे ! तो आडबंब ब्रम्हचारी, अजून ते काय [illegible] ?

तुंबर :- मग रे !

नारद :- माझी मी स्वतंत्र बायको मिळवणार. असा जातो त्या काळ्याकडे !

तुंबर :- काळ्या ! हा काळ्या आणि पिवळा कोण बाबा ?

नारद :- अरे ! काळा म्हणजे ते श्रीकृष्ण ! देव तरी काय अथल पाथल आहेत पहा. स्वतःला सोळा हजार एकशें आठ बायका करून, आणि वर म्हणे मी ब्रम्हचारी. त्यावेळीं जर द्विभार्या प्रतिबंधक कायदा असतां, तर त्याला कोर्टातच खेचला असता.

तुंबर : अरे खरंच ! [illegible], आणि त्याला म्हणावं ! तुझ्या या असल्या करणीनं सोळा हजार एकशें सात पुरुष उघडे पडले आहेत.

नारद :- हा चाललो बघ. ॥ गाणे ॥ (गाणे गात जातो)

पत्नी सुख कमला कुणी द्यावा । विफल त्याविना जीवन जगणे ।
[illegible] । पत्नी सुख मजसी कुणी द्यावा ॥ १ ॥

॥ आधुनिक नारद ॥

(प्रवेश दुसरा. कृष्ण बसला आहे. नारद गात गात येतो)

नारद :- हो — पर्णकुटीत माझ्या कुणी दावा / [illegible] [illegible] जीवन जगणे,
दुरवी हरिनाम [illegible] देवा / अशी पुरवावी मला कुणी दावा ॥१॥
नारायण ! नारायण ! नारायण !

श्रीकृष्ण :- या, या, नारदमुनी या. असे सिंहासनावर बसा.

नारद :- कृष्णा, बसतो [illegible] आहा मजेत [illegible].

कृष्ण :- मुनी! अहो पण झालं तरी काय! आमचं काही चुकले वाटत?

नारद :- कृष्णा, गावाकडचा तू बाहेर काळा आहेस तसा आंतही काळाच आहेस. तोंडानं मात्र गोड बोलतोस. चल! कळलं तुझं देवपण!

कृष्ण :- अहो! पण झालं तरी काय! कळू दे तरी आम्हाला!

नारद :- बाकी तुझा तरी काय दोष म्हणा! सगळ्या पोरी तुझ्याकडेच धाव घेतात. त्याला तूं तरी काय करणार? आमच्यासारख्या दरिद्र्याकडे पाहतो कोण? जिला तिला कृष्णच पाहिजे असतो.

कृष्ण :- पण नारदा, अरे, झालं तरी काय?

नारद :- पण या मुलींचे पालक तरी काय, पहा. एकाद्याची बायको गेली (मेली) किंवा त्याला दुसरी, तिसरी करण्याची लहर आली, तर त्या स्थळावर यांच्या उड्यांवर उड्या, हुंड्याच्या चढाओढी लावतात. पण एखादा गरीब होतकरू पाहून त्याला, अं हं, नाव कशाला!

कृष्ण :- पण नारदा तुला आज झालंय तरी काय? आज मुलींच्या बापावर संक्रांत कां?

नारद :- काय झालं म्हणून विचारतोस? एवढं बोललो, तरी अजून तू वेड पांघरून पेडगांवला जातोस? कृष्णा, तुला स्पष्टच सांगतो, मला बायको पाहिजे!

श्रीकृष्ण :- (मोठ्याने हसून) काय, बायको पाहिजे? असं आहे, विधवेला कुंकवाची उठाठेव, [illegible] आहे हुं. अरे! [illegible] आहेस तू, [illegible] पडतोस बाबा! अरे, मला सोळा हजार एकशे आठ बायका आहेत म्हणतोस, पण आमचं सुख बघतोस ना तू! एक करते रुसवा, तर दुसरी करते रुसवा. परवाच ते पारिजातकाचं भांडण पाहिलंस ना तू?

नारद :- कृष्णा, ज्याचं पोट भरलेलं आहे त्याला सुखानं उपदेश करता येतो.

॥ आधुनिक नारद ॥

नारद:- पण ज्याच्या पोटाची आग थंड होत नाहीं, तर शांती कसला उपदेश करायचा, आधीच भडकते. ते काहीं नाहीं, आता मला स्नान करायचंय, बायको पाहिजे.

कृष्ण:- ठीक आहे. पाहतो प्रयत्न करून एखादी मुलगी मिळाली तर.

नारद:- हेंच बघ, मी तुला आपल्या पोटच्या म्हणतो तें उगीच नाहीं? तें हेंच. ते कांहीं नाहीं, कृष्णा, तुला सोळा हजार एकशें आठ बायका काय करायच्यात? त्यातलीच एखादी मला दे.

कृष्ण:- ठीक आहे (स्वगत) हसत, ठीक आहे जा. ज्याच्या घरांत मी नसेन, तिला घेऊन जा.

नारद:- (आनंदाने) ठीक तर चला. आधी रुक्मिणीकडेच जावं. हें हेंच घर. नारायण, नारायण, नारायण.

कृष्ण:- कोण? नारदमुनी! या, या, असे बसा.

नारद:- अरे! हा काळ्या आहेच की इथं. चला सत्यभामेकडे. आँ इथंही आहेच. तिथं! तिथंही आहेच. सगळीं घरं पालथीं घातली, प्रत्येक ठिकाणीं आहेच. तरी म्हटलं, सहजासहजीं आपली जनाची बायको घ्यायला हा कसा काय तयार झाला? हो, कांहीं खरं नव्हे. या फंदात आपण पडूच नये. आपलं ब्रह्मचर्यच बरं! चला आतां स्नान उरकून आपल्या उद्योगाला लागावं हेंच खरं (निघून जातात) दि. १२।१०।८३ नवापूर

॥ होळी - संवाद ॥ कवि-लेखक :- राष्ट्रकांतीशाहीर ग. द. दीक्षित (सातारा)

(पात्रें :- पाटील, पोऱ्या, दुर्पी कोल्हाटीण, गांवकरी वगैरे)

॥ भाग १ ला ॥

(गाणें) होळचालले ठेक्‍, करदात्याची होळी पेटली, पडा चालला धोक ॥ १ ॥
चला रे चला त्या होळीमध्ये, टाकू परकीय पोळ ॥ २ ॥

पाटील :- पाटील येतो) क्‍यां? जाळ! आरं तुवं परक्‍की पेटलीच कशी! मीव्हळींत पोळी टाकल्याबिगार, इसनं कुनी लावला? कारं बामना?
(गाणें) मानकरी पाटील आम्ही, इथले तालेदार ॥ ध्रु. ॥
मानासाठीं मान देऊ, भाऊबंदांचे पराण घेऊं, हक्क न सोडणार ॥ १ ॥

पोऱ्या :- पाटील आतां कसला मान घेऊन बसलायसा? पाटील, अहो,
पोळी जाऊन ओळी आली तरी मान होळीचा हवाच कां? ।
मानासाठीं मान घालवली भाकरी खायाला तरी हाय कां? ॥
वरती मिशाला तूप लावतां परी पोरांत थबकवी जातुस कां? ।
घरमें नहीं ज्वारी और बाहर जमादारी गाजुनी फुकरची करताय कां? ॥

पाटील :- पर पोरांनो, ही होळी कसली रे?

पोऱ्या :- पाटील! अहो (गाणें) लेचाळीसचा असे लढा हा परकी सत्तेची होळी,
करण्या खेळतो होळी, मिळाया होळींत टाकायापोळी ॥

पाटील :- हां, हां, मी बी ते न ह्मणतोया, आज शिमगा तर नाहीं. व्हळी तर पेटलीया.
पोरं तरी बराड्यातो. ढोल तरी वाजतया. ही दुर्पी कोल्हाटीण बी
आलीया.

पोऱ्या :- पाटील, अहो मुंडाशाच्या तिडा, रे आतां त्याचंच बसली टोपी ।
रीत गांधीनं साधी दावली घाला गांधी टोपी ॥

पाटील :- व्ययबाबा, खरं हाय तुझं! आज हाबाड घालतो. ह दुरपे आटीपबरं, हुंच्या
एकादी छक्कड. कांही बोकून मेकून झाली पायजे बघ. हं आटीप बरं.

दुर्पी :- पाटील, आता छक्कड बिक्कड विसरा. आतां कॉंग्रेसनं तमाशाला बंदी
केलीया. आता छकडी बी बदलल्याती.

पाटील :- कागं पण, ह्मणतरी बघूं कसली हाय ते?

दुर्पी :- (पद) झेंडा तिरंगी हा डुलतो ग, गगनीं ऊंच ऊंच खुलतो ॥ ध्रु. ॥
याच्या कांगीं शुभ्र हरी फार ग, ऊतरी गोऱ्यांचा हा गर्वभार ग, :-

॥ होळी ॥

आनंदे फडफड करीतो गं ॥ गगनीं ऊंच ऊंच डुलतो ॥ १ ॥
आलं आलं स्वातंत्र्याचं वारं गं, चलेजाव झालं आतां गोरं गं।
शेतकरी मनांत हे फुलतो गं, गगनीं ~~~~~ डुलतो ॥ २ ॥
हिंद वीरांची शोपदा उडवीं गं, हिंदू मुसलीमांचे ऐक्य घडवीं गं,
स्वराज्य स्वातंत्र्य बोल बोलतो गं, गगनीं ~~~~~ डुलतो ॥ ३ ॥

पाटील:- शाब्बास दुरये शाब्बास, तुमच्या गाण्यानं माझं कशी नागफणी डोलाय लागली बघा, ही होळी बांधल्यापासनं, ह्युरं आधी हालल्यावाटतंय. आणि मनांत आपल्या देशाचे विचार घोळतांत. बोला महात्मा गांधी कीं जय.

×———————×गाणं २ रं×———————×

पाटील:- अरे, पण हे, कसलं लाकूड जळतं आहे?

पोऱ्या:- पाटील, आतां सगळं ऐकाच तर:-

(चा.क्र.८ दांगटी) तो पृथ्वीराज चौहाण, विश्वासघातानं, धुंद होऊन, हिंदवी स्वातंत्र्याचे लाकडास, फेकूनी दे होळीमधें स्वास, लागूनी संयुक्तेच्या नादास, परी त्याचा मेव्हणा समरसिंह स्वास, घालूनी आडप त्याच लाकडास, अर्धवट जळकं काढी समयास, बोहर याला दादा ॥

पण पुढं महंमद गिझनीनं, शंकराळाच जाण, सोरटी सोमनाथाला होळीत टाकला, पार्वतीनं खूप आकांड केला, रजपूत किती होळीमधें जळला, ब्राम्हणी आंत निरस झाला, पुढं अल्लाउद्दीन येऊन आला, होळीत त्यानं टाकलं पद्मीनीला, स्वातंत्र्य मुकुट होळीत फेकला, लागली आग सार्‍या चितोडाला, पंधरा हजार स्त्रिया जळून मेल्या, आणि चितोडगड उडाला, गा पाटील दादा ॥

त्यामुळे स्वयं शंकर, येऊन अवतार, महाराष्ट्रांत आले जन्मास, शिवाजी छत्रपती येऊन गादीस, अफझूलखान या बड्या लाकडास, होळीत टाकले प्रतापगडास, मुन्हे चंद्रराव मोऱ्याचे स्वास, होळीमधें टाकलं शिवाजीनं स्वास, पाटील दादा ॥

पण पुढं दुष्ट मदजानं, घात करून, शिवाजीच्या शूर वीर पुत्रास, लाऊनी तुळशीच्या नादास, होळीमधें टाकलं शंभूराजास, आणि मराठ्याच्या भगव्या झेंड्यास, परी राणाराये येऊन अवतारास, राजारामाच्या रूपानें स्वास,

॥ होळी ॥

संताजी, बहीर्जीच्या लाकडास, धनाजी, खंडोजीच्या लाकडास, होळामधें टाकून त्या समयास, होळी विझवायच्या वेळं यत्नांस, पाटील दादा ॥

! आतां होळी विझणार

तोंच त्या जीच फिरंग्याजी, आग भडकावुनी, हिंदू धर्माचीच केली होळी, परी विष्णूनं त्याच वेळीं, बाजीरावरूपें कमाल केली। शिंदे होळकरांची लांकडं दिधली। होळीमधें केली भारली होळी, फिरंग्यांची ती त्याचकाळीं, गा पाटील ॥

तेवढ्यांत नादीरशहानं, सर्व हिंदुस्थान, देशाची होळीमधें टाकला, तोंच अहमदशहा अबदाली आला, होळीला अधीक भडकवायला, पण जनकोजी शिंद्यानं त्यावेळीं, स्वतः च्यान दत्ताजीच्या लाकडाला, होळीमधें टाकुनिया बोला, वांचवलं स्वातंत्र्य मुगुटाला, गा पाटील दादा ॥

कमी होणार जाळ होळीचा, म्हणुनिया साचा, पेशवा सदाशिवराव सरसावला, म्हादजी शिंदे कृष्णा पवार बोला, टाकती रोहिल्याच्या लाकडाला, पानपतावरच्या मैदानाला, जऊलाख बांगड्या होळीत टाकल्या, तोंच बापू गोखले वीर आला, दिलं त्यानं स्वतःच्या लाकडाला, होळीला अधिक रंग आणला, गा पाटील दादा ॥

―――――✕―――――

॥ भाग २ रा ॥

चा.क्र.५ करावं २ होळी पाहून क्रुध्द झाली जगदंबा साचार, सांगे लक्ष्मीला विचार, दावी क्षत्रीय आचार, तंवा लक्ष्मी घेई अवतार। तेंच नांव घेउनिया थ्वार, पुन्हां पेटवी होळी जोरदार ॥

तीच लक्ष्मी झांशीवाली राणी लक्ष्मीबाई, नानासाहेब पेशवाही, तात्या टोपे संग घेई, गोऱ्यांची लांकडं होळींत, फेकून दिली जरी त्यांत, शेवटीं स्वतः उडी घे आंत ॥

स्वरक्षणार्थ आजीत, लक्ष्मी असें जळत, पाहून पार्वतीस क्रोध चढला, विझवा म्हणे झटपट होळीला, रक्षाचा देशभक्त भूमीला, तंवा कांहीं तरुण जागा झाला, रक्त रंगपंचमी खेळूं लागला, पुण्यामधें मोठा कहर झाला, चापेकर बंधूजी रॅण्डसाहेबाला, पुण्याच्या होळीत फेकीयला, कान्हेरे कल्यानी नाशकाला, होळीमधें फेकला जॅक्सनला, मदन धिंग्र्यानं इंग्लंडाला, कर्झन :-

## ॥ होळी ॥

वायलीस होळीत टाकला, डिक्कांनी परदेशी वसूला, गांधीजं पटलाच्या मुंडाख्याला, भगतसिंग, राजगुरुजं बोला, सुखदेव दत्त घेऊनसंगतीला, लाहोरात सॉंडर्स साहेबाला, होळीमध्यें ऊचलून फेकीयला, गा ऐकातुम्हीं ॥
पण पुढें नीच ब्रिटीशांनीं, भडका हेऊनी, टाकलं होळीत सर्व जगांला, एकोणिसशें एकूण चाळीसांला, चाळीस कोटी हिंदी जनतेला, होळीचा मार्ग दाखवीला, हिटलरानं पोलंड देशाला, इटलीनं ऍबीसीनियाला, जर्मनीनं फ्रान्स देशाला, जपान्यानं रशिया अमेरिकेला, ओढलं होळीत जाळायाला, सुभाषबाबूनीही याचवेळीं, स्वतःचे लाकूड दिलं होळीला, नेहरुनी ब्रिटीशासनेला, कायदानी जातीयवादाला, नाना पाटलानं फितूरीला, होळीचा रस्ता दाखविला, गा पाटील दादा ॥
आला होळी विझवण्याचा जंग, खरा खुरा रंग, तोंच एकोणिसशें पंचेचाळीस सालां, बॅरिष्टर जिनानं त्यावेळां, होळीला रंग भडक दिधला, एकोणिसशें सेहेचाळीसाला, कलकत्ता नवखालीं जिल्ह्याला, कैकजण त्यांत जळून मेला, भिडल्या पहा आकाशाला ज्वाळा, लागली आंच वेव्हेलच्या विमानाला, सुऱ्हावर्दी बंगालप्रधानाला, कोणीही विझवीना होळीला, पंडीत नेहरुनीं पहा त्यावेळां, एकोणिसशें सत्तेचाळीसाला, करुनिया बंद शांतीस देण्याला, पाकीस्तान देऊन मुस्लीमानला, बोले चलेजाव इंग्रजानला, एकोणिसशे सत्तेचाळीसाला चौदा आगस्ट मध्यरातीला, फडकवलं स्वतंत्र झेंड्याला, गा होळीवरदादा ॥
वा.क्र. १) या अशा होळीतूनींही, वाचविला पाही, भगवा झेंडाही, हिंदी तरुणांनीं जाणा साचार, वाचविला देऊन रक्ताची धार, त्याला प्रणाम वारंवार ॥
पोऱ्या:- पाटील, आतां हे रामदं थ्यार सोडा. आणि एकमतानं म्हणा :—
(गीत) जयहिंद जयहिंद, जयहिंद, जयजय जयहो हिंद ॥ धृ० ॥ शांतीदूत तो गांधी महात्मा तोच विझवी होळी, आम्हां खावया दिली तयानं स्वातंत्र्याची पोळी। एकमुखानें करा गर्जना जय गांधी जयहिंद, जयहो भारत जयजय भवानी जयहो जयजयहिंद ॥ १ ॥ { पाटील:- पण पोरांनो, हे ज्ञान तुम्हाला कुठून मिळालं?
पोऱ्या:- पाटील (एका) गुरुघाटे फारमहाराजांनी, ज्ञान दिले त्यांनीं, त्यांतच आली जुळणी, न्यायरत्नांची कृपा साचार, शर्करा दुग्धामाजीं मिळणार, शाहीर दीक्षित कवन करणार ॥ ३ ॥
(गांधीजी अमृत शिंपून होळी विझविण्याचे ठरले, वस्तुतः पोळी खाऊन, शांतीचे अमृत शिंपले पण होळी नाविझता अधीकच भडकली.)

दि. ११।१०।८३. नवापूर ताईवाडा.

॥ सद्गुरु जयराम स्वामी महाराज की जय ॥

॥ जो गाडीवाले — सौ. मोहनचंद ॥

(संवाद लेखक कवी: क्रांतीशाहीर जी. डी. दीक्षित चिंचणीकर ता. तासगाव जि. सातारा)

॥ पात्रे :- सुभाषचंद्र, रहमतखान, ज्ञानचंद, त्याची पत्नी, सी. आय. डी. इन्स्पेक्टर, फौजदार, पोलीस २ ॥

(स्थळ :- ज्ञानचंदाचे घर. त्याची पत्नी शेगडीजवळ शेकत बसली आहे)

॥ प्रवेश १ ला ॥

पत्नी:- बाईसाब (कुडकुडत) हे बाई, या वादळानंतर थंडीनं अगदी कहर केला आहे. वारापण काय गार सुटला आहे. शेगडीपण विझत चालली. अमरनाथ, अरे अमरनाथ, माझा स्वेटर आण पाहू!

अमरनाथ:- आलो बाईसाब, हा घ्या.

पत्नी:- बाईसाब:- काय करीत होतास रे?

अमर:- बाईसाहेब, हिटलरला मारीत होतो.

बाईसाब:- काय हिटलरला? आणि तो तुला कुठे सापडला?

अमर:- गोधडीत बाईसाहेब.

बाईसाब:- गोधडीत? आणि हिटलर?

अमर:- ढेकूण होय! हात्तीच्या. बरं जरा कोळसे व कागद आण पाहू.

अमर:- आणतो बाईसाहेब. (आणून देतो. कोळसे शेगडीत घालते. व कागद घालायला जाते, तो वर्तमानपत्रावर सुभाषचा फोटो दिसतो. तो पाहून (चपापून) अगबाई! सुभाषबाबू सापडले? (बातमी वाचते) "काल रात्री मद्रास मेल मध्ये सुभाषबाबूसारख्या दिसणाऱ्या एका साधूस पकडले, पण शेवटी पोलीसांचीच फजीती झाली." सुटले बाई, मला वाटले सुभाषबाबूच सापडले वाटते! (हिंदमातेच्या फोटो जवळ जाऊन हात जोडून प्रार्थना करते.)

(पद-चाल:- ओमपूर्णा जगी) हे सुखी ना बंधू सुभाषा, सुखावेल देशा, पुरवील आशा ॥ ध्रु ॥ भारत माता, सुखवी आता, कोणी न जगती त्याविण माता। परवशताही करी ना नाशा ॥ १ ॥ (डोळ्यांत अश्रू)

अमर:- बाईसाहेब, धूर लागला होय? हल्ली हे दुकानदार, मुद्दाम कोळसे भिजवून देतात.

बाई:- विझू दे शेगडी, चल जा. (स्वगत) काय चमत्कार तरी बाई! एवढा ब्रिटिशांचा बंदोबस्त, पण त्याच्याही हातावर तुरी दिल्या अं? काय म्हणे पठाण वेषांत, काय बाई तरी! पण पठाणी वेषांत ते कसे दिसत असतील? चला बाहेर फारच वारा सुटला आहे. (जाते)

## ॥ शेठजींचे सीमोल्लंघन ॥

### ॥ अंक २ रा ॥

॥ स्थळ- शेठजींचे दुकान. शेठजी वर्तमानपत्र वाचीत आहेत. नोकर फडक्याने धूळ झाडीत गुणगुणतो आहे. ॥ पद. (महात्म्या मुलापुरी नगरी गं, नाही जागा तिथं)

शेठजी:- बाकी या सुभाषबाबूंचं पलायन म्हणजे, शिवाजी महाराजांची आग्र्यावरील गरुडभरारीच जणूं!

अमर :- (आंत येऊन) साहेब, बाहेर कुणी पठाण आपणांला भेटायला आला आहे.

शेठजी:- पठाण? आणि मला भेटायला! (विचार करून) बरं, घेऊन ये आंत. (जातो नोकर) (स्वगत) पठाण कोण बरं? याच माझ्याशीं काय काम असणार? (नोकर पुढें व पठाण मागें, आंत येतात)

रहमतखान:- अस्सलाम आलेकुम!

शेठजी:- आलेकुम सलाम! आईये, बैठीये. तशरीफ फर्माइये?

रहमत:- (इकडे तिकडे पहात) आपलं नांव उत्तमचंदच ना?

शेठजी:- (चपापून) होय. पण आपण कोण?

रह. पठाण:- मी एक हिंदी माणूस आहे. माझं नाव भगतराम. सध्या आम्ही फार अडचणींत आहोंत.

शेठजी:- मग सांगा, मी आपल्याला काय मदत करूं शकतो?

पठाण:- (इकडे तिकडे पहात) पण हा नोकर.

शेठजी:- हरकत नाहीं. तो पूर्ण विश्वासू आहे. शिवाय त्याला मराठी भाषाही कळत नाहीं.

पठाण:- पण, शेठजी!

शेठजी:- हरकत नाहीं. अच्छा, अमरनाथ, जा रामभरोसे हॉटेलमधून दोन कप चहा आण पाहू! (नोकर जातो) बोला! अगदी स्पष्ट बोला. भिण्याचे कांहीं कारण नाहीं.

पठाण:- देशाच्या कांहीं महत्वाच्या कामासाठीं आम्ही येथें आलो आहे. पण मध्येच कांहीं भानगड उत्पन्न झाल्यामुळें, आपली मदत मागण्यास आलो आहे.

शेठजी:- देशकार्य असेल तर मी जरूर मदत करीन. सांगा, सांगा काय ते!

पठाण:- मी येथे सुभाषचंद्रांना घेऊन आलो आहे.

शेठजी:- (एकदम उडून) काय सुभाषचंद्र! आणि इथं काबुलांत! बरं मग!

पठाण:- त्यांना या सरहद्दीबाहेर पोचवण्याची जबाबदारी मी पत्करली आहे. रशियाचा पासपोर्ट मिळेपर्यंत आम्हांला सुरक्षित जागा हवी आहे. :-

॥ नेताजींचे सीमोल्लंघन ॥

शेठजी :- मग मी काय करावं म्हणतां ?

पठाण :- सध्यां आम्हीं गांवाबाहेरील एका धर्मशाळेंत राहिलो आहोंत. पण इथल्या सी. आय डीला संशय येऊन, त्यांनी सारखा त्रास द्यायला सुरवात केली आहे.

शेठजी : मग मी काय करावं म्हणतां ! तुम्हांला मी काय मदत करूं शकतो ?

पठाण :- आपल्या इथं त्यांना सुरक्षीत जागा मिळेल या आशेनं त्यांनीं आपणांकडे मला पाठवलं आहे. गेले दोन दिवस मी हेलपाटे घालतो आहे.

शेठजी :- काय, सुभाषबाबूंनी पाठवलं म्हणतांस ? पण त्यांना माझी काय माहिती ?

पठाण :- कस्तूरी कुठेही असली तरी तिचा सुवास दडून रहात नाहीं. असो, मग आश्रेला जागा आहे ना ! (चहा येतो. दोघे घेतात.)

शेठजी :- (स्वगत) काय करावं ? सुभाषबाबूंना मीजर आश्रय दिला, अन्‌ हे उघडकीस आलं, तर साऱ्या घरादाराचा सत्यानाश होईल. प्रसंग मोठा कठीण आला. "राष्ट्रकार्य कीं स्वसंरक्षण !"

पठाण :- कां, विचारांत से पडलांत ?

शेठजी :- तसं कांहीं नाहीं. पण अडचण आशी आहे, माझ्या घरीं त्यांच्या योग्य अशी जागा नाहीं. आहे तीं गोदीच्छ खोली आहे.

पठाण :- अहो, कशीही असो, अंधार कोठडी असली तरी फार उत्तम. (उठून) बरं मग जाऊं मी ?

शेठजी :- बेशक ! (जाऊं लागतो) हां, हां ; पण आपलं यावेषातलं नांव ?

पठाण :- (हसून) हां ; तें राहिलंच कीं ! माझं नांव रहिमतखान आणि त्यांचं झियाउद्दीन पठाण. शिवाय ते आंधळे, बहिरे, आणि मुकेही आहेत बरं कां ! अच्छा, जयहिंद.

शेठजी :- अमरनाथ, ही चिट्ठी घेऊन जा नि नेऊन दे. आणि म्हणावं, मी आज दुकानावरच राहीन. चिट्ठी प्रमाणें सर्व व्यवस्था करा. (नोकर जातो)

॥ पद ॥ (चाल :- नीचा सी चंद तुझा, सतत जागू दे, राधा ॥)

धन्य धन्य खचित मी जगतीं, भाग्य घरां येई आतां ॥.
तीच दिवाळी अन्‌ दसरा, साधूसंत तें घरीं येतां ॥ धृ० ॥
स्वर्गलोक सोडुनिया चंद्र घरासी येई ।
उध्दरावयासी मला खास वाटतें हृदयीं ।
मजसी जरी असह्य तें तेज त्याचें या समयीं ।
श्रीद परी जाईल विलया । दे.न, जरी त्यां, मी हातां ॥ १ ॥

॥ नेताजींचे रोमांचक जीवन ॥

॥ [illegible] ॥

(स्थळ :- धर्मशाळा. सुभाषबाबू व रहिमतखान जेवत आहेत.)

सुभाष :- भगतराम, आपल्याला रशियाचा पासपोर्ट मिळणार केव्हां? त्या दिवशीं रशियन वकिलाला आपणांला ओळख पटवतां आली असती, तर आपण एव्हांना रशियाला पोंचलोही असतो. इथं राहणं आतां धोक्याचं आहे.

पठाण :- होय बाबूजी, मलापण तीच चिंता लागली आहे. मघाशीं मी रोटी आणायला बाजारांत गेलों, तेव्हां एक सफेत पोशाखाचा माणूस आरखा माझ्याकडे निरखून पहात होता.

सुभाष :- बहुधा तो सी. आय. डी. ही असेल. काय करावं? (इतक्यांत पोलीस येतो)

पोलीस :- (दरडाऊन) कौन तुम्हीं?

पठाण :- आम्हीं सरहद्दीवरचे अवाली आहोंत. हा माझा भाऊ, आंधळा, बहिरा, मुका आहे. (सुभाषबाबू भगतरामला हात लाऊन मुक्याचे सोंग घेतो.)

पोलीस :- इथं कशासाठीं आलांत?

पठाण :- आम्हीं सखी भावाच्या यात्रेला जात आहोंत. बर्फ पडल्यानें रस्ता बंद पडला आहे. त्यामुळे इथं राहण भाग पडलं.

पोलीस :- ये सब झूट है। मला तुमचा शक येतो आहे. चलो कोतवाली में. (सुभाषला हलवून) उठ रे, ए आंधळ्या. (सुभाषबाबू मुक्याचे सोंग घेतात.)

पठाण :- (आजीजीनें) नाहीं साहेब, आम्हीं खरंच यात्रेकरू आहोंत. कांउगीच त्रास देतां?

पोलीस :- तें कांहीं नाहीं? चला माझ्याबरोबर. उठा.

पठाण :- चल मी येतो बरोबर. माझा भाऊ आजारी आहे तो येणार नाहीं.

पोलीस :- (नरमाईनें) बरं थंडी फार पडली आहे. तुम्हीं विश्रांती घ्या. आम्हांला कांहीं चहापाणी.

(भगतराम) पठाण :- (दहा रुपयाची नोट देतो, पोलीस निघून जातो)

सुभाष :- भगतराम, हे असं कुठवर चालायचं? पैसाही संपत आला, हिंदमातेचं काय भवितव्य आहे, कांहीं कळत नाहीं.

पठाण :- पण आपला रशियालाच जायचा हट्ट कां? त्या इटालियन वकिलाची बायको आपल्या ओळखीची आहे. तिच्याशीं संधान बांधून, इटलीला गेलो तर?

सुभाष :- नाहीं भगतराम, वेळ जवळ आली आहे. की यावेळीं रशियांत जाऊनच हिंदी स्वातंत्र्याबाबत प्रचार केला पाहिजे. (पोलीस पुन्हां येतो, डोळे मिटून गप्प बसतात)

## ॥ नेताजींचे सीमोल्लंघन ॥

पोलीस :- का ? गेला नाहीं अजून ? आणि येवढ्या आजारीपणांत याचेच तरी काय नडलं आहे !

पठाण :- सरवी बाबाच्या याभेला गेलास, तर तुझे डोळे येतील असं एकानं मला सांगितलं आहे.

पोलीस :- मघाशीं मी तुमची हकीगत फौजदाराना सांगितली त्यानं तुम्हाला कोतवालीवर बोलावलं आहे. चलो जलदी !

पठाण :- असा काय त्रास देतो ? घ्या हे घ्या. (पांच रुपयाची नोट देतो.)

पोलीस :- (जाता जातां) पण लवकर जा हं ! (जातो)

सुभाष :- भगतराम, आतां इथून कुठेतरी जागा बदलायला पाहिजे. नाहीतर हे पेढवाले कुत्रें भाकरीचा तुकडा खाऊनही चावायला कमी करणार नाहीं !

पठाण :- होय. ही एक कुत्र्याची निराळीच जात आहे. (इतक्यांत फौजदार येतो.)

फौजदार :- अरे ! ए, चला, कोतवालीवर चला. मला तुमचा संशय येतो आहे.

पठाण :- पण साहेब, रस्ता मोकळा होऊन मोटारी सुरू झाल्या की आम्ही जाणार आहोतच.

फौजदार :- साऱ्या गांवाला मोटारी मिळतात, पण तुम्हाला मिळत नाहींत होय ! आतांच टपाल मोटार गेली.

पठाण :- पण साहेब, आम्हीं लोक माहीतगार, आम्हाला काय माहीती !

फौजदार :- तें कांहीं नाहीं चला उठा ! तुम्ही टोळीवाल्यांपैकीं लुटारू दिसतां ? चला उठा !

पठाण :- नाहीं साहेब ! आम्हीं खरेंच धर्मनिष्ठ मुसलमान आहोत. तुम्हाला जर आम्हाला त्रासच द्यायचा असेल, तर चला मी एकटा येतो. (उठतो)

फौजदार :- एकटा ? नाहीं, नाहीं, मी तुम्हा दोघांनाही घेऊन जाणार.

पठाण :- तें शक्य नाहीं ! हा माझा भाऊ आजारी आहे, शिवाय आंधळा व मुका आहे. (सुभाषबाबू आंधळेपणाचा अभिनय करतात.)

फौजदार :- आंधळा आहे, तर काय पाय मोडलेत त्याचे ? चला, चला !

पठाण :- नका, साहेब तसं करूं नका. हे घ्या. (पांच रुपयाची नोट देतो)

फौजदार :- बस्स ! पोलीसाची न माझी सारखीच किंमत ? मी फौजदार आहे म्हटलं !

पठाण :- (पुन्हां पांच रुपये देतो) हे घ्या.

फौजदार :- छे ! छे ! मी पैशाला शिवत नाहीं. पण काय रे ? या आंधळ्याला घड्याळाचा काय उपयोग आहे ? (सुभाषबाबू मुकाट्यानं घड्याळ काढून देतात.) (तें घेऊन) माफ करा हं ! तुम्ही खरेंच अल्लाचे भक्त दिसतां, नाहींतर या बहिऱ्याला कसं कळलं असतं ? (दरडावून) पण आतां मात्र लौकर जा हं !
(फौजदार जातो.)

॥ नेताजींचे सीमोल्लंघन ॥

सुभाष :- पण भगतराम, उत्तमचंदांचं काय झालं?

पठाण :- त्यांनी तर कबूल केलं आहे. चला (निघतात) तुम्ही इथंच थांबा. मी त्यांनाच इकडे घेऊन येतो.

॥ प्रवेश ४ था ॥

( स्थळ :- उत्तमचंदांचे दुकान — उत्तमचंद दुकानावर बसले आहेत. दोघे आत येतात. )

पठाण :- जयहिंद शेठजी, मग काय ठरलं? आपण सुभाषबाबूंना आश्रय देणार ना?

शेठजी :- देणार ना म्हणजे? जरूर देणार. सुभाषचंद्रासारखा प्रत्यक्ष परमेश्वर घरी चालून आला असतां, त्याला आश्रय न देणारा, भयंकर गुन्हेगार ठरेल.

पठाण :- पण आपण पूर्ण विचार केलात ना? जर का हे उघडकीस आलं? तर हे तीच इंग्रज, तुमच्या गळ्याला फास लावतील.

शेठजी :- होय, हे सगळं मी जाणून आहे. राष्ट्रासाठी माझी एकट्याची काय? पण माझ्या बायका पोरांची, घरादारासह राखरांगोळी झाली तरीहि. माझ्या बायकोच्या व माझ्या हृदयाच्या गादीच्या वरून प्रथम सुभाषचंद्राला बसवीन. माझ्यासकट, माझ्या सर्व कुटुंबाच्या देहाच्या चिंधड्या झाल्या तरी, त्याच्या पायघड्या घालीन. चला, चला! दाखवा एकदा मला तो सुभाषचंद्र. अहाहा, धन्य मी.

पठाण :- चला तर, ते पहा, पुलाजवळ ते उभे आहेत.

शेठजी :- कुठे? कुठे? ते पठाणासारखे दिसतात ते?

पठाण :- होय! तेच सुभाषबाबू. चला लवकर.

शेठजी :- हे पहा! मी तुमच्याबरोबर आलो, तर लोकांना उगीच संशय येईल. हा माझा नोकर तुम्हाला घेऊन जाईल. अमरनाथ, यांना घरी पोचव.

अमरनाथ :- साहेब, पठाणांची भीती वाटते. मी यांना घरी पोचवतो की, हेच मला देवाघरी पोचवतात कोण जाणे.

शेठजी :- जा रे, घाबरू नको.

अमरनाथ :- हे गलेलठ्ठ आडबंब पठाणी, रस्त्यातच माझा खीमा करायचे. (घेऊन जातो.)

(बाई घरी वाटच पहात आहेत) (इतक्यांत ते तिथे येतात)

बाई :- अगं बाई! आलात रे? थांबा हं. पंचारती आणते!

सुभाष :- बेहेन! पंचारती ओवाळायची वेळ नाही. आधी सुरक्षित जागा बघा.

बाई :- ठीक आहे. या. अगदी काळजी करू नका. इथं कसलाही धोका नाही.

" नेताजींचे संमोहन "

(इतक्यांत नोकर प्रवेश करून-)

नोकर :- बाईसाहेब! आपल्याकडे पाहुणे आले आहेत. हीघ्या चिठ्ठी. (चिठ्ठी पाहून विचारांत पडते) (जा: ) आणि!

सुभाष :- काय झालं ग्रेटा?

बाई :- माझ्या एका मैत्रिणीचे यजमान पाहुणे म्हणून आले आहेत. आपण इथं असतां त्यांचं येणं,

सुभाष :- का? काय हरकत आहे?

बाई :- तसं नाही, पण, ते सी. आय. डी. इन्स्पेक्टर आहेत.

सुभाष :- असू देत! - येऊदे त्यांना आंत!

बाई :- अमरनाथ! आणा रे त्यांना आंत. (अमरनाथ पाहुण्यांना घेऊन येतो.)
या लीलाबाई! बरी आहे ना?

इन्स्पेक्टर :- तिला काय धाड भरली आहे! सी. आय. डी. इन्स्पेक्टरची बायको आहे म्हटलं. सारखी फुगत चालली आहे.

बाई :- फुगत, आणि या रेशनिंगच्या जमान्यात!

इन्स्पेक्टर :- ओं! रेशनिंग, आणि ते कुणाला? आम्हां पोलीस खात्यातील लोकांना? छट! रेशनिंग तुम्हाला. या रेशनिंगमुळे तर आमचा उखळ पांढरं झाले आहे. नाहीतर एवढ्या पगारांत, पण जाऊद्या, मी काही सरकारी कामासाठी आलो आहे. (सुभाषकडे पाहून) पण हे पाहुणे कोण?

बाई :- हे आहेत इकडचे स्नेही. यांचं नांव रहिमतखान, आणि यांचे झियाउद्दीन. हे आंधळे असून आजारी आहेत. चार दिवस राहून रखबीबाबाच्या यात्रेला जाणार आहेत. (पडद्याआड) बरं चला, मी तुम्हाला जागा दाखवते. (त्यांना घेऊन जाते.)

इन्स्पेक्टर :- (सहजच वर्तमानपत्र पाहून, मोठ्याने :-) काय सुभाषचंद्र? काबूलांत आल्याचा पोलीसांना दाट संशय? वा: मुहूर्त तरी चांगलाच लागला म्हणायचा! चला, वेष बदलून तपासाला लागलंच पाहिजे. (जातात.)

॥ नेताजींचे सीमोल्लंघन ॥

॥ प्रवेश २ रा ॥

(स्थळ :- उत्तमचंदाचे घर. पात्रें :- उत्तमचंदाची पत्नी, सुभाषबाबू व रहीमतखान)

बाई :- बाबूजी, तुम्ही एकाकी बेपत्ता झाल्याचे वाचून, मला तरी बाई कसंसच झालं. पण, एवढ्या बंदोबस्तातून तुम्ही निसटला तरी कसे?

सुभाष :- ऊः त्यांत काय आहे! माझी प्रकृती फारच ढासळली आहे. व घराबाहेर कोठेही जायचे नाहीं, अशी डॉक्टरांनी ताकीद दिल्याचे, मी सर्वांना खोटेच भासविले, व घरींच राहिलो. चांगली तीन इंच दाढी वाढल्यावर एके दिवशी, मौलवीच्या वेषांत, संध्याकाळीं घराबाहेर पडून मोटारीनें स्टेशन गांठलं. आणि पेशावरला जाणाऱ्या एका मेलगाडींत बसलो. अशा रीतीनें पसार झालो.

बाई :- बाबूजी, आम्हां बायकांना राजकारणांतलं काय कळतय म्हणा! पण एक प्रश्न विचारूं?

सुभाष :- विचार, विचार, बेशक विचार.

बाई :- आपण रशियालाच जायचं का ठरवलं?

सुभाष :- जर्मनीनें ब्रिटन विरुद्ध पुकारलं आहे. रशियाही ब्रिटनचा शत्रू आहे. तेव्हा रशियांत जाऊन हिंदी स्वातंत्र्याबाबत प्रचार करण्याची हीच खरी वेळ आहे.

बाई :- पण जर्मनीला जाणे सोपे नाहीं का? हिटलर तर सारखे विजय मिळवत आहे.

सुभाष :- तें खरे! पण मैत्रीचा बुरखा पांघरून, दोघेही लढाईची तयारी करीत नसतील कशावरून?

बाई :- पण, रशिया आपल्याला ब्रिटीशांविरुद्ध प्रचार करून देईल काय?

सुभाष :- देईल, माझी खात्री आहे. या दोघांची मैत्री फार काळ टिकायची नाहीं. कारण, गांठ पेड ढकाढका!

बाई :- शिवाय या दोघांची मैत्री होईल, हे तरी कुणाच्या स्वप्नीं होतं!

सुभाष :- म्हणूनच रशिया प्रचार करण्यास कोणती अटकाव करणार नाहीं.

बाई :- धन्य आहे बाई तुमच्या अक्कलेची. पण मी म्हणते नुसत्या प्रचारानं हिंदुस्थानाला स्वराज्य मिळेल का?

सुभाषचंद्र :- सशस्त्र क्रांती करून, ब्रिटिशांना हिंदुस्थानातून हांकलून दिल्याशिवाय, तें कधींच जाणार नाहींत; अशी माझी खात्री आहे. हातचे राखून ठेवण्यांत कोल्ह्यासारखी धूर्त व मुंगळ्यासारखी चिकट, या गोऱ्यांची जात हिंदुस्तान सहजा सहजीं हातचा जाऊं देईल? आणि तशी वेळ आलीच, तर त्यांनी :-

॥ नेताजींचे सोमोलंघन ॥

एक गुप्त हत्यार हेमलेलेच आहे.

बाई :- तें कोणतें आहे?

सुभाष:- पाकिस्तानचे!

बाई :- खरं आहे बाबूजी, पण आपल्याला एक प्रश्न विचारूं कां!

सुभाष:- विचार. विचार.

बाई :- या तुमच्या स्वातंत्र्य युद्धात आम्हां स्त्रियांना कांहीं जागा आहे कां!

बायकांचं स्वराज्य म्हणजे चूल आणि मूल, असं पुरुष नेहमी म्हणतात!

सुभाष:- शाब्बास! शाब्बास! फार चांगला प्रश्न विचारलास! आहे. जरूर आहे.

मी स्त्रियांची स्वतंत्र पलटणच उभारणार आहे.

बाई :- पण मग चूल आणि मूल कोण पाहणार!

सुभाष:- बहेन! ज्यावेळीं देशांत शांतता असते, त्यावेळीं चूल व मूल हेंच स्त्रियांचे कर्तव्य असते. पण जर देशांत शांतता नसेल तर, प्रत्येक स्त्रीनं अन्यायाचा प्रतीकार करण्यासाठीं, हातांत शस्त्र घेऊन, भूमातेच्या उद्धारासाठीं, स्वतः बलिदानास सिद्ध असलेच पाहिजे. (रहिमतखान येतो)

र. पठाण:- बाबूजी, त्या इटालियन वकिलाच्या बायकोमार्फत, रशियाचा पासपोर्ट मिळवायचा प्रयत्न चालवला आहे.

सुभाष:- ठीक आहे. पुढचं पुढें.

---

॥ प्रवेश ५ वा ॥

(स्थळ - रस्ता. सी. आय. डी. इन्स्पेक्टर संशयी मुद्रेनें फिरत असतो. पोलीस वगैरे)

इन्स्पेक्टर:- छे! कांहींच सुगावा लागत नाहीं. हा सुभाषबाबू म्हणजे एक जादूगार तर खराच.

१ पोलीस:- अबे एसुलेमान, ये कोई नया आदमी दिखता है. खुदा जाने, सुभाषबाबू तो नहीं होगा?

दुसरा पो:- अरे चल हरजभाई, अगर ये सुभाषबाबू होगा, तो क्या मजा आयेगी यार!

पहिला पो:- अगर मैं इसे गिरफ्तार करूं तो, मैं जमादार बनूंगा.

दुसरा:- और मैं भी हवलदार बनूंगा.

पहिला:- चल साले तलास तो करेंगे. (जवळ जाऊन) कौन हो तुम!

इन्स्पेक्टर:- मैं? तुम्हे क्या करना है?

॥ नेताजींचे सीमोल्लंघन ॥

दुसरा पो. :- हां, ऐसी बात मत करो? कौन हो तुम?

इन्स्पे. :- मैं तुम्हारा बाप हूं!

पहिला पो. (दुसऱ्या पोलीसास) देखो यार मैं कहता था! यही सुभाष है!

दुसरा पो. :- अबे हट! कोई और दूसरा होगा.

पोलीस १ :- चलो बाबू कोतवालीमें तुम सुभाषही हो.

इन्स्पेक्टर :- सुभाष! (हेटाळणीनें हसून) क्यों, पागल बनगये क्या?

पोलीस २ हां, सीधा जबाब दो.

इन्स्पेक्टर :- हा, हा, मैं तुम्हारा चचाजान हूं!

पोलीस १ :- चलो पकडो. (धरतात व बेड्या घालतात)(तो और कुत्तो, मैं सुभाष नहीं हूं)
(कोतवालीवर आणतात.) सुलेमान, तुम बाहर खडे रहो। मैं कोतवालसाहब को खबर करता हूं. (आंत जाऊन कोतवालास सॅल्यूट करतो.)

कोतवाल :- क्या खबर है

पोलीस १ :- हुजूर खबर तो अच्छी है.

कोतवाल :- अबे क्या खबर है बोल तो!

पोलीस १ :- सुभाषबाबू मिलगये!

कोतवाल :- क्या! सुभाषबाबू मिलगये! या अल्ला! कुदरतकी मेहरबानी कुछ और है. कहां है वह जहरी सांप? बताव, बताव! आजसे तू जमादार, और मैं, डी. ओस, पी. (कोतवालास घेऊन बाहेर येतो.)

पोलीस २ :- आप तो डी. एस. पी. हो जायेंगे. लेकीन साहब, मैं कौन?

कोतवाल :- अबे तू हवालदार बनेगा. (दोघेही पोलीस आनंदानें सलाम, सलाम करतात)
(इन्स्पेक्टरास :-) तुम्हारा नाम क्या है?

इन्स्पे. :- मेरा नाम सुभाष.

कोतवाल :- क्या? सुभाष? बहोत अच्छा! हिंदुस्थान छोडकर भागजाते क्या पहाडके चूहे? चलो जेलखाने. (हे धरतो तेव्हां हाताला बिल्ला लागतो) औं, ये क्या? बताव! (इन्स्पेक्टर बिल्ला दाखवतो. कोतवाल मजकूर वाचतो) कौन! सी. आय. डी. इन्स्पेक्टर बॉम्बे. सुभान अल्ला ये क्या बला? तोबा, तोबा! माफ करो साहब.

पोलीस १ :- कोतवालसाहब, मैं कितने फीत लगाऊं? :-

॥ नेताजींचे सीमोल्लंघन ॥

कोतवाल :- जाव, निकलजाव यहांसे। गधे कहींके! पागल! ये तो बंबईका सी. आय. डी. इन्स्पेक्टर है!

दोन्ही पोलीस :- क्या? माशाल्ला!

कोतवाल :- जाव, जाव जलदी! और कहीं तलाश करो! निकलेसाले जमादार बनने!

दोन्ही पोलीस :- (जातांना स्वगत) और तुम्भी डी. ओस. पी. बनने (जातात.)

* ——— * पुलंरत्न * दि. मा. गाडगीळ नागपूर.

प्रवेश ८ वा

॥ श्री सद्गुरु जयराम स्वामी महाराज की जय ॥

॥ श्रीकृष्ण अवतार - संवाद ॥

॥ कवी - राष्ट्रशाहीर ग. द. दीक्षित चिंचणीकर ता. तासगांव जि. द. सातारा ॥

( पात्रे - श्रीकृष्ण, राधा, पेंद्या, सुदामा आणि इतर )

॥ गोपाल कृष्ण महाराज की जय ॥

श्रीकृष्ण :- पेंद्या! सुदामा! या गोमातेचा हंबरडा ऐकलास? चल मला आतां अवतार घेतला पाहिजे!

पेंद्या :- पण (कृष्णा) किसना तूं खुळा का येडा? अरे आत्ता हे कलीयुग आहे आता मानवासाठी अवतार घेऊन जमायचं न्हाई?

॥ पद ॥

नको घेऊं अवतार । हरी तूं करी प्रथम सुविचार, हरी तूं करी प्रथम सुविचार ॥ध्रु॥
विज्ञान युगीं, जन जिरंगी, मग फजीत होशील पार ॥ १ ॥

ही पहा! राधाच आली.

श्रीकृष्ण :- राधा! कोण राधा?

राधा :- साठ हजार वर्षे तपलेले, फळास आले, म्हणून पाहिले, चरण तुझे कान्हा ।
सांग घेतोस कसला अवतार, आतां आला घोर, कलीयुगीं जाणा ॥ १ ॥

श्रीकृष्ण :- अगं, वसुदेव माझा पिता, देवकी माता, भाऊ बलराम, भाऊ बलराम ।
कलीयुगीं लोपला धर्म, राहिले कर्म, झाले बेशरम ॥ सुंदरी गं ॥
तेव्हां, सुदामा, मला आतां अवतार घेतलाच पाहिजे.

सुदामा :- देवा! या कलीयुगांत तू अवतार घेणार म्हणतोस? पण या कलीयुगातले लोक कसे आहेत ते ऐक. ॥ ओवी ॥

आधीं पूजा पोटोबाची, मग पूजा विठोबाची ॥
नको म्हणती देवस्नान, संध्या म्हणजे मद्यपान ॥
चहा अमृत कलीयुगांत, नको जन्म घेऊं रे हितं ॥
नाहीं यज्ञ न अनुष्ठान, बिडी, सिगारेट हवन ॥

पेंद्या :- तवा किसना तू अवतार घेशील तर फुकट फजीत पावशील.

श्रीकृष्ण :- पण काय रे पेंद्या? गणराया तर दरवर्षी अवतार घेतोच कीं नाहीं! तरी लोक त्याचा उत्सव करतातच कीं नाहीं? मुलामुलींचे मेळे काय? नकला काय पोवाडे, गायनच काय? पण त्याच्यापुढे जलसे, तमाशासुद्धां करतात. आणि धुमधडाका उडतो. :-

॥ श्रीकृष्ण अवतार ॥

सुदामा :- (चा. क्रां. ८ चालीं) कृष्णा ! गणराय जरी दरवर्षी अवतार घेतो, पण असा घेतो ? ऐक.
गणराय घेई अवतार, फॅशनेबल फार, अपटुडेट सारं, सुटाबुटाच्या अशा वेषांत,
कधीं घेई क्रिकेट बॅट हातास, कधीं धाली नेहरू शर्ट अंगास, असे जणूं
देशभक्त समयास, कधीं लागे जलक्रीडा करण्यास, नदीमधें किंवा समुद्रांत खास,
भाग पाडतो एका वर्षास, दहा वाटतो दुसऱ्या वर्षास, बायको मांडीवर
घेऊन सरीस, देश तसा वेष धरून तत्वास, एकोणीसशें छप्पनीच्या सालास,
संत तुकारामाच्या घेतलं वेषांस, विष्णुपंत पागनीसाच्या स्वरूपास, म्हणून
त्याला लोक अजून म्हणतात, तुकाराम देवा ॥

श्रीकृष्ण :- बरं, बरं, म्हणूनच पण मी अवतार घेणारच.

---

॥ भारुड १ ला ॥ (मथुरेच्या बाजार)

गौळणी :- (गाणें) गोरस घेऊनी जाऊंया, मथुरेला, गोरस घेऊन जाऊंया ॥ धृ० ॥
आडवा येईल कृष्ण कन्हैया, वाटेला ॥ गोरस ॥ १ ॥

श्रीकृष्ण :- पेंद्या, या गौळणी कुठं चालल्यात बघ. अन त्यानां म्हणावं हा रस्ता बंद आहे.

पेंद्या :- ए गवळणीनों, हा रस्ता बंद आहे.

गवळण :- कां रे ? काय मुनसीपालटीचं काम चालू हायव्हय ! आरं, मग काम चालू
रस्ता बंद अशी पाटी बी लावली न्हाई ? आन तूं कोण रं ! मुनसीपालटीचा
मुकादम हायस व्हय ?

सुदाम :- आगं ! मुकादम नवं, सुदाम हाय सुदाम.

गवळण :- आ... गं बया ! सुदाम, का हेरगाडरलं गुदाम ! ए सुदामा तुकारामगून देवा,
तूं ह्या किस्नाला सांग !
(गाणें) नागड्यावाणी आंबडील माझ्या अंगाला, तर विजयभंगाचा खटला
भरून घालीन तुला तुरुंगाला, मुला तुरुंगाला, हा हा हा, नको आडवा येऊं
श्रीहरी, जाऊं द्या बाजारी, येऊं दे आला, जीजी सुंदरी ॥

श्रीकृष्ण :- बरं पेंद्या, चल आपण आपली गुरं सोडून हिंडायला नेऊया, सोडबरं.

पेंद्या :- देवा ! आतां तें बी इसरा आतां जंगलखात्याचा हाय ! सरकारच्या
परवान्याशिवाय जंगलात गुरं सोडायची न्हाईती.

श्रीकृष्ण :- अरे ! आमची गुरं आम्हीं जंगलांत हिंडवायला न्हेली तर सरकारचं काय जातंय !

॥ श्रीकृष्ण अवतार ॥

पेंद्या :- आतां जंगल ही राष्ट्राची म्हणजे सरकारची संपत्ती आहे. तवा कायद्यानेच त्याला बंदी आहे.

श्रीकृष्ण :- आणि आम्हीं नेलीच तर सरकार काय करील?

पेंद्या :- नेलीस तर! ऐका!

(गाणे) अरे विनापरवाना गुरं चारली तर जंगल कायदेभंग होतो रे ।
राज्य तुझं नव्हे आता इंग्रजी राज्य पसरले बघ सारे ॥ १ ॥

श्रीकृष्ण :- पण पेंद्या, अरे माझी गुरं इतकी कमी कशी काय झाली?
अरे! सत्तावीस कोटी गाई माझ्या मग आज चारच कोटींवर! ।

पेंद्या :- देवा! चराचरां कापल्यात कसाई खान्यामधीं देवा कळीतरी तुझं हायकां! ॥ २ ॥
अरे गुरं ढोरं सारी लोकांच्या कसाईखान्यांत, चरारा कापल्यांत, आज त्यांच मांस बोटीं भरभरून विलायतेला जातं, सुकं खाण्यास, गोऱ्या लोकांस ॥ ३ ॥

श्रीकृष्ण :- बरं पेंद्या! अरे आतां दही, दूध चोरायला तरी चल!

पेंद्या :- देवा! आतां ते पहिलं सगळं विसरा! आणी तुला काय म्हणा? तुझा जन्मच तुरुंगात झाला.

(गाणे) जन्म तुझा झाला तुरुंगात, देवकी उदरांत, कृष्ण सावळा ।
कांसे, पितांबर कासियेला, पिसारा डोक्याला, मुरली अधराला ॥ १ ॥

श्रीकृष्ण :- पेंद्या, तें राहूच विसरून जाऊ. पण जरा शहरात फिरायला तरी जाऊयां, चला.
आँ! अन हे रे काय? श्रीकृष्ण रेस्टॉरंट? माझं नाव?

पेंद्या :- ते काय आतां विचारूं नका देवा! या लोकांनीं, देवांची, मोठ्या माणसांची, पुढाऱ्यांचीसुद्धा नावं अगदीं खराब करून टाकली आहेत. हे काय, श्रीकृष्ण रेस्टॉरंट, हे काय, तर जवाहरलाल हॉटेल, हे काय, लोकमान्य हेअर कटींग सलून, हे काय? श्रीराम लॉजिंग हाऊस, हे काय? श्रीशिवाजी खानावळ, हे काय? अंबिका लॉज, आणि हे सुभाष उपाहार गृह. यालाच म्हणतात हॉटेल. देवा! इथं कायकाय मिळतं ऐका!
इथं जो तो हॉटेलात शिरीं, लागते बरी, श्रीखंड पुरी, भजी, मिसळ ।
चहा, कॉफी, सोडा, लेमन, डोंब, उसळ ॥ १ ॥

श्रीकृष्ण :- आणि हे रें काय पेंद्या? अरे या माणसाच्या डोक्यावर पिसारे कसला? असानं पांडव आला म्हणून चोरं मागं लागतील कीं?

:-

॥ श्रीकृष्ण अवतार ॥

सुदामा :- ध्यान घातलं, ध्यान घातलं, म्हणून?

श्रीकृष्ण :- पेंद्या! मग आतां इथं फिरायचं तरी कसं!

पेंद्या :- ऐका देवा!

माथ्यावरी भांग तो जीट, तयावरी हॅट, अंगामधीं सूट, बूट पायांत।

तोंडात धरुन सिगारेट, गरम चॉकलेट, धूर सोडीत, फिरावे झाकांत॥ १॥

सुदामा :- म्हणून म्हणतो देवा!

(गाणे) नको घेऊ अवतार, हरी तूं, करी असीम सुविचार॥ धृ०॥

पेंद्या :- आणि देवा, तुला जर अवतार घ्यायचाच असेल तर

(गाणे) असेल घेणे जरी अवतार तरी या वेषांतच घे देवा।

गणेश आहीर पिंज पदांबुजी नित्य करितसे तवसेवा॥ १॥

---

याची यंगइंडिया (जॅराजल ग्रामोफोन कंपनी मेडोज स्ट्रीट फोर्ट मुंबई) कंपनीने रेकार्ड ध्वनिमुद्रिका प्रसिद्ध केली आहे. रुन. १९४७. दि. २८।९।४८ त्यावॉपीवरुन पुनर्लेखन, दि. १४।११।८३. कांती आहीर रघुवीर दीक्षित चिंचणीकर. सध्या मुक्काम नायगाव नवापूर. जि. धुळे

॥ जोतीबाची जत्रा ॥ नाटीकेचलेखक - राष्ट्रशाहीर गोपाळनारायण दीक्षित चिंचणीकर ॥

॥ (ग्रामोफोन रेकॉर्ड कॉपी) भाग १ ला ॥

जोतीबाच्यानावानं ! चांगभलं ! (शिंग वाजते)

शाम :- आरं ए पांडा ! नागा ! आरं चला की लवकर, शिंग वाजाय लागलं न्हवं !

(गाणे) आरं शिंग वाजलं काढी निघाली वाटे जोतीबारायाची ।

गर्दी होईल धक्के मिळतील मजा नाही मग बघायची ॥ १ ॥

नागा :- चला नारायणराव, जरा यात्रेतनं फिरून तरी येऊया.

पांडा :- अहो, काय पहायचं आहे सांगा ? बोलून चालून हे खेडवळ लोक, आणि हे काय ? काहीपुढं तर धनगरी ढोल !

नागा :- आरं ये, तवाडं कशाला बघतूयास ? याबघ खंडोबाच्या मुरळ्या !

मुरळ्या :- (गाणे) याबाई जेजूरी नगरांत, नांदे मल्हारी भगवंत ॥ मल्हारीजी मल्हारी ॥

पांडा :- हो, हो, मग हे रं काय ?

नागा :- आरं जोगतं हैत न्हवकां ? लै मजा असतीया, ऐकूया तरी ?

जोगते :- (गाणे) यल्लमा माझी कारी गं, नराच्या नाल्या नारी जी ॥

यल्लूवर भंडारा टाकीला जी, हावं, हावं, हावं, (अंगात येते)

आरं, आरं, आरं, आई आली, आई आली ! आईला फोडा, आरं आईला जाळा

जोगता :- हे अं, हंअं, काय म्हनतूस रं

नागा :- नाही म्हटलं ! आई आली, आईला नारळ फोडा, कापूर जाळा

पांडा :- आई ! पाऊस पडलं काय गां

जोगता :- हं अं, हअं, आभाळ आलंय काय रं ?

पांडा :- व्हय व्हय.

जोगता :- हे अं, हं अं, आरं मग गळिल तवा चोकलं की रं ?

नागा :- ऐका पांडा ! ऐ बघ, तिकडं डफ वाजायला लागला आहे, आणि पवाडा बी सुरू झालाय बघ. चल ! ऐकूया जरा.

शाहीर :- (पोवाडा) धन्य गांधी महात्मा धन्य, तयासम अन्य, कोणी ना मान्य आला जगतीं, उध्दार शेतकऱ्यांचा करती, त्यासाठीच तुरुंग भोगती, मायभूमीवरती त्यांची प्रीती, म्हणून झाली जगामधें कीर्ती, गा ऐकातुम्हीं दादा ॥

नागा :- आहे खुप ! या यात्रेमधें अशा कार्यक्रमांचा चांगलाच उपयोग होईल.

पांडा :- पण कायरं नागा ! औंदा यात्रेत तमाशा कसा न्हाई ? तमाशाबिगार यात्रेला शोभाही नाय. मजाही नाही. छछछछ :

:-

॥ जोतीबाची जत्रा ॥

जागा :- आरं ! औंदा गावकऱ्यांनी तमाशा बंद करून, तसलेच पवाडवाले आणलेयात.

पांडा :- अरं चल ! तमाशाच्या पाठी काय पैसला घालयातव्हंय? उद्दे अवघड बघ.

जागा :- आरं पैसंच, सार्वजनिक शाहीराचं ढोलकं वाजाय लागलंय. चल.

(गण) गणराया नमितो तुजला, अणी याले सभेला ॥ धृ० ॥
सभेमधें महाराज, येऊनिया राखा लाज, ही विनंती तवचरणांला ॥ १ ॥

॥ भाग २ रा ॥

(स्थळ - मोटार स्टँड)

पांडा :- आरं ए ! चला की रं, यात्रेमधली न्हवं ! परसाद घेतला का? चला चला लवकर. मोटार निघून गेल्यावर मग काय करायचं !

(गाणे) यात्रा संपली सारं चालले दीस मावळाया गेला की रं,
चला रं बिगीबिगी नका येळ गमवू पडू लागला अंधार ॥

मोटारवाला :- ए ! कोल्हापूर, कागल, निपाणी, ए पावण्या, आरं कुठं जानार?

एक :- निपाणी, काय घेणार?

मो :- काय देणार ! बस, बस.

एक :- आरं पर काय घेणार !

मो :- सहा आणे.

एक :- दोन आणे देऊं कां?

मो :- फिरमूर कुठच्या रवात बिनपैशाची गाडी हाय की ?

बाई :- अहो ! गाडी केव्हां सुटणार ?

मो :- हां ! निघाली हे बाई !

बाई :- अहो ! आतां कुठं बसवणार ! आतां आमच्या डोक्यावर बसवा.

मो :- अहो बाई ! जरा कळ सोसा, यात्रा आहे ही. शिवाय लढाई मुळं पेट्रोलच्या भावबी वाढलाय !

एकजण :- अहो ! गाडी तरी सोडा लौकर. (गाणे)

सोडा गाडी आतां, पडूं लागला अंधार ॥ धृ० ॥ सोट अजूनी कमी असती मग कसं होजावं, पेट्रोल काय सांगा आम्ही गाडी विकून आणावं, रात्र्या हुंडेल मार, झालाय वेळ हो उशीर ॥ १ ॥

पा :- आरं ए पावण्या, कुठं चाललास !

:-

## ॥ जोतिबाची जत्रा ॥

पावण्या :- विडी आणतो.

मो. :- अरं चल, बस, रत्या पाणी घातलं का?

पावण्या :- अरे एकाबा, आरं काय नाही सोडलं की? आयला चालत गेलो असतो, तर येडूका पोचलो ही असतो की.

मो. :- मग कुणी नको म्हटलंय तं? रत्या पाणी घातलंस का? अरारारा, उतरा बघू जरा सगळं.

एकजण :- कां हो? काय झालं?

मोटारवाला :- तुम्ही गप्प बसा हो. ए विडी ओढतात? अरं इजीव, इजीव, काय मरायचं हाय व्हंय? ओ पावणं, या पोराला जरा आत जाला लावायला सांगा की? हं चला! म्हणा! 'जोतिबाच्या नावानं चांगभलं'

---

दि. १५।१०।८३ नवापूर

॥ सैंताजी नाच ॥ (पोवाडा व संवाद) कवी-लेखक- क्रांतीशाहीर ग. द. दीक्षित.

कोरस: चाल तमाशाची :- महाराष्ट्रांत जिल्हा सातारा खरा असणी, तासगांव तालुक्यातील परवर्धन चिंचणी, कापूर गंगेच्याकांठीं जनता बहु गुणी, सर्व जाती गुण्या गोविंदानं, नांदती आनंदानं ध्यावं ऐकून ॥ जी जी जी ॥

शास्त्री :- (गांवांतील शोकसभा) बंधूनों आणि भगिनींनों, आज आपल्या राष्ट्रपिता पूज्य बापूजींच्या निधनामुळे, आपण सर्वजण दुःखसागरांत बुडालो आहोंत. पूज्य बापूजींच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून, आपण सर्वजण परमेश्वराचे भजन करूयां. (भजन)

दत्त दिगंबर, भजरे दिगंबर, तारक हा भवसागर ॥ ध्रु० ॥
योगाचा हा पावन पुतळा, तसाच गांधी धीर रें, तोही दिगंबर, हाही दिगंबर, तारक हा भवसागर ॥ १ ॥
सत्य, अहिंसा, शांती, सेवा, हातीं सुदर्शन चक्र रें, याच्याहीपण, चरखा सुदर्शन, फिरतो गरागर, घर घर ॥ २ ॥

गुंड :- बोला महात्मा गांधीकी जय! ब्राम्हणशाही नष्ट करा! त्यांची घरंदारं नष्ट करा. अहो, शास्त्रीबुवा, आधीं बाहेर या. हे मंदीर आम्हीं जाळणार आहोंत

शास्त्री :- पण बाबांनो, तें कां! आम्हीं गांधीजींच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून भजनच करीत आहोंत. तो पहा! दत्ताशेजारीच गांधीजींचा पुतळा बसविला आहे.

एकजण :- मु. पोरगा. वो कुछ हम जानते नहीं, तुम बामन हो ना? तो बस्स. देखो भाईयों! बामनकी जात बडी खराब. हमारे अफझलखानको, बामननेच दगा दियाथा. नहीं तो शिवाजी किस चिडियांका नाम होता!

दुसरा :- हां! शिवाजी महाराजका नाम मत लो, आले! पाटीलच आले.

पाटील :- काय गडबड आहे? कसला सैंताजी नाच चालला आहे?

गुंड :- काय गडबड? अहो! कोल्हापूर पेटलं, सांगलीच्या नंदन वनाचं खांडववन झालं. मिरजेची राख झाली. तो पहा! तासगांवच्या जोग वकिलाचा वाडा अजून जळतो आहे. त्या शेजेंतच आम्हीं इथें आलो आहोंत. व तुम्हीं म्हणतां काय चाललं आहे?

पाटील :- मग, चला ती आग विझवायला.

॥ सोंगाची गाथा ॥

गुंड :- अहो! त्या आगी काय विसावण्यासाठीं लावल्या आहेत?

(पद) वीर तुम्हीं थंड कसें अजुनी बसला ॥ ध्रृ० ॥

पाटील :- अहो! पण त्यांची घरं कां पेटवायची?

गुंड :- कां? अहो! महात्मा गांधीचा खून, एका ब्राम्हणानं केला नां?

पाटील :- केला असेल, म्हणून काय सगळ्या बामनासनीं उठकळा आणायची? माझ्या गांवांत हा तंगाजाचा मी मुळीच चालू देणार न्हाई. चालते व्हा इथून।

गुंड :- चला रे! त्या सावकाराच्या वाड्यावर जाऊंया. नाहींतरी या महांत आपल्याला काय मिळणार हाय? चला! महात्मा गांधी की जय

॥ भाग ६ रा ॥

गुंड :- अहो! गोविंदराव, चला बाहेर निघा. हा वाडा आम्हीं जाळणार आहे.

गोविंदराव :- बाबांनो! तुम्हाला काय पाहिजे तें मागा. आहे तें सर्व घेऊन जा. पण वाडा जाळू नका। वाडा जाळून तुम्हाला काय फायदा?

गुंड :- ते कांहीं नाहीं! महात्मा गांधीचा खून एका बामणानं केला, तेवा सारी बामनाची जातच आम्हीं नष्ट करनार हाय! चला रे पेटवा.

पाटील :- (येऊन) हां खबरदार! मागें सरा!

गुंड :- ऑं! हा पाटील इथंही आडवा आला!

पाटील :- बाबांनो, ब्राम्हणांनी आजवर कितीतरी चांगली कामसुध्दां केली आहेत!

(गाणें) अरें श्रीकृष्णाला पन रुक्मीणीचं कुणी पोचवीलं विचार करा।
भृगु ऋषीची लाथ छातीवर धरली श्रीविष्णूनं स्मरा ॥

गुंड :- अहो पाटील! ती पुराणांतली गोष्ट राहूद्यांत पुराणांतच.

पाटील :- असं, मग अगदीं ताजी अलीकडीलही दाखले सांगतो ऐका। (पोवाडा)

चाल क्र. १) पोचला खंदका नजीक, शिवराया देख, तोंच भयानक, आगीचा लोळ खंदकात लाल, पडला विचारांत शिवबा कांहीं काल, जायचे कसें ओलांडुनी जाळ ॥
तोंच एक वीर स्वामीभक्त, चिमणाजी ख्यात, ब्राम्हण जात, पडला पालथा विस्तवावर, पाय म्हणे ध्यावा माझ्या पाठीवर, करावी मात शत्रूचे वर ॥

चा. क्र. (२ दांगटी) यासिवाय!) शिवबाचे करून रक्षण, नलगतां क्षण, देई शिक्षण, राजकारणांत केला हुशियार। स्वराज्याची मुहूर्तमेढ रचणार, दादोजी कोंडदेव कोण असणार, गुरु शिवबाचा खरा साचार, तो ब्राम्हणच दादा ॥

॥ शेटजी गाणं ॥

पा.क्र. ५) शिवाजीचे गुरु समर्थ रामदास होते हे कोण, संभाजीस मथुरेला ज्यानं आश्रय देऊन, केलं रक्षण राजपुत्राचे यवनांपासून, वाचून पहा इतिहास, ठेवा ध्यानास, ब्राम्हणच दादा ॥

पा.क्र. ८) ढोंगी) स्वराज्याचा खरा मूलमंत्र, क्रांतीचे तंत्र, घेऊन हातीं शस्त्र, गोऱ्यांना सळोकीं पळो करणार, वासुदेव फडके कोण असणार, पुणे शहरांत ऊडवुनी बार, रॅण्ड साहेबाला ठार करणार, चाफेकर बंधू कोण असणार, ब्राम्हणच दादा ॥

"स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध आहे" असें इंग्रजांना बजाऊन सांगणार, लोकमान्य टिळक कोण असणार। गांधींनीं गुरु केले जेथवार, नामदार गोखले कोण असणार, लाहोरला जाऊन क्रांती करणार, सॉंडर्स साहेबाचा बळी घेणार, राजगुरु शिवराम खेडचा राहणार, ब्राम्हणच दादा ॥

अस्पृश्यांना मंदीर प्रवेश, मिळावा खास, म्हणून ऊपवास, पंढरपुरीं, आमरणातीक करणार, पूज्य साने गुरुजी कोण असणार, अगदीं मूर्त गांधींचाच अवतार, विनोबाजी भावे ही ब्राम्हण साधार, खरोखर दादा ॥

तुम्हीं सर्वांनी पूज्य मानून, वंदिले चरण, पंतप्रधान, एकमुखानं, निवडून दिला ज्याला साधार, तो जवाहर नेहरु ब्राम्हण असणार, स्वतंत्र भारताचा व्हॉईसरॉय थवार, राजगोपाल चारियर ब्राम्हण असणार, ध्यानीं घ्या दादा ॥

तुम्हींच शेतकरी, कामकरीयांनी, बहुमतानीं, आदोल निवडूनीं, केला मुख्य मंत्री मुंबईचा, बाळासाहेब खेर ब्राम्हण साचा, तसाच देव शंकरराव धुळ्याचा, मूर्तीमंत पुतळा ब्रम्हचर्याचा, सेवक खरा हिंद भूचा, ब्राम्हणच दादा ॥

हाऊस फुल्ल प्रत्येक खेळास, होता परीखास, जाता तुम्हीं खास, पदरचे पैसे खर्चून फार, बायकापोरांसहीत खुशीत जनीवार, रामजोशी सिनेमा बघाया थवार, तो रामजोशी ब्राम्हणच असणार, पठ्ठे बापूरावची लावणी मेरदार, नित्य ती तुमच्या मुखीं घोळणार, तोही होता ब्राम्हणच साधार॥ ऐका तुम्हीं दादा ॥

गुंड :- खरं हाय पाटील तुमचं। गड्यांनो आपलं चुकत होतं बरं कां?

पाटील :- अरे! मागनं पेटलं वाटतं? अरं! आग भडकली! अगदीं जवळ आली. पेटला! गांधीजींचा पुतळाही पेटला, जळला! राख झाली. काय केलं आपणच आपल्या हातानं? गांधीजींचा पुतळा जाळला काय! अन यांचा खून केला काय? दोन्हीही सारखेच. चला चला! विझवा. मारा पाणी।

॥ रौताजी नाच ॥

असं ! शाब्बास रे बाधांजो ! शाब्बास, तुम्हीं आता जे काम केलं तइबेस केलं. चला तिकडे ! गोविंदरावला भेटून त्यांना धीर देऊया. गोविंदराव, तुम्हीं अगदीं भिऊं नका. झालं ते झालं. चला, आतां त्या गांधी पुतळ्याची राख आपल्या कपूरगंगेत विसर्जन करूंया. जावारे, त्या मठांतल्या शास्त्रीबुवांना बोलाऊन आणा. आणि भजन सुरू करा. ॥ भजन ॥

दत्त दिगंबर भजरे दिगंबर, तारक हा भवसागर ॥ धृ० ॥

॥ बोला महात्मा गाँधी की जय ॥

पा.क्र. दोगटी ८) कवी गणेश शाहीर दीक्षित, ब्राम्हणच त्यात, आणा ध्यानांत, सांगली शहरीं वास करणार, घोटे गुरुजी हे ज्ञान देणार, कृपा त्यावरल विनोदांची रहाणार, तेही दोघे ब्राम्हणच असणार, शाहीर दीक्षित कवन करणार, ब्राम्हणच दादा ॥

(नागपूर दि. १५-१०-८३ ग.द. दीक्षित.)
(विजयादशमी)

X——X——X——X

॥ वग - दारूबंदी ॥ रचना:- राष्ट्रकांतीशाहीर ग. द. दीक्षित पिंपळीकर (सांगली)
(रूपक)

चाल:- तमाशाची) ताऱ्या आणि बापू दोघे मैतर, दोघांनी मिळूनशानी केला एकवीचार, निघाले बघायला मुंबई शहर।

बापू:- ताऱ्या! आरं ऐ बघ मुंबई आली।

ताऱ्या:- आरं, माग सर, मागं सर?

बापू:- आरं पण कां?

ताऱ्या:- आरं दर्या पेटलाय जणं!

बापू:- मर्दाच्येना! दर्या पेटला न्हाई, ती आगीनबोट हाय आगीनबोट.

ताऱ्या:- काय हागीनबोट? म्हणजे हागायाची बोट.

बापू:- आरं हागीन बोट नव्हं! आगीनबोट म्हणजे आगबोट। विस्त्यावर चालयाची. समजलं? चल होरं चल।

(गाणं) निघाले बघायला मुंबई शहर, तिथं एक पाहिली सुंदर त्यांनी नार, ताऱ्यानं प्रश्न काय केला तिला सत्वर, ऐका खरोखर। तू कोण कुणाची इथं, उभी का राहिली, सांग सुंदरी ॥

ताऱ्या:- बापू! विचार, तिला म्हणावं? तू कुठली कोण?

बापू:- अहो बाई! तुम्ही कुठल्या! (संवाद)

बाई:- (गाणं) मी हो इंग्लंड देशाची नार, की सरदार, इंग्लंड देशाची नार, हे जीजी ॥
माझं नांव ब्रँडी हे थोर, की सरदार ॥
अहो! म्हणलं तुम्ही कोण?

बापू:- आम्ही हिंदुस्थानचे सरदार, गं नारी, हिंदुस्थानचे सरदार ॥
तुला पाहून आलो इथवर, गं नारी ॥ सांग तुझा कोण भरतार, गं नारी ॥
ताऱ्या! आरं ही दारू हायदारू!

ताऱ्या:- लई बेस, मग आपुन तर घेणार.

बापू:- ताऱ्या! नकोरे बाबा! हीची संगत बरी नाहीं.

ताऱ्या:- ऐकं काहीं नाहीं आपुन घेणारच

बापू:- ताऱ्या ऐक। (गाणं) हिच्या नादानं वाटोळं झालं, घरदार सगळं बुडून गेलं ॥ धृ० ॥
गोऱ्या देशाची ही नार, दिसे सुंदर जरी फार, विष भरलं हिच्या अंगात, नको ताऱ्या हिची संगत ॥ १ ॥

बाई:- अहो मिस्टर! कोण म्हणतं माझ्या नादानं वाटोळं झालं?

:-

॥ दारूबंदी ॥

बापू :- आमचे परमपूज्य गांधीबाबा म्हणतात.

बाई :- छट ! अहो, तुमच्या गांधीला काय कळतंय यातलं ? त्यानं कधीं घेतली होतीकां ?

बापू :- न्हाई बाई ; कधीं नाही घेतली.

बाई :- आधीं माझा पराक्रम तरी ऐका. आन् मग काय तें ठरवा !

बापू :- सांगा सांगा ! आधीं तुमचा पराक्रम तरी सांगा.

बाई :- ऐका !) दैत्यगुरु शुक्राचार्य भ्रष्ट मी केला, विद्या दिली कचाला, मंत्रनिकामी केला,
दैत्यांचा फडशा पाडिला, धाडिले सर्व स्वर्गाला ॥
अहो एवढा मोठा पराक्रमी, शिवाजी राजाचा मुलगा संभाजी ; पण,
क्षणामधीं त्याला नष्ट केला, लावला त्याला तुळशीच्या नादाला, राजाचा सत्यानाश केला, कैक रावांचा रंक केला, कितीक लोळवले गटाराला,
पराक्रम कायहा थोडा झाला, गा सांगा तुम्हीं दादा ॥.

बापू :- तात्या ! ही बाई लई वाईट हाय ! हिचा जन्म कुठं झाला माहीती हायकां तुला ?

तात्या :- काय न्हाई बाबा, सांग तरी !

बापू :- ऐक तर ! एकदां काय झालं ? स्वर्गांत सर्व देवांची सभा भरली होती आणि
त्या सभेंत (गाणें) अग्नीन् पाणी या दोघांचं भांडण लागलं जोरांत,
अग्नीचं आणि पाण्याचं भांडण सुरू झालं तें देवाला काय म्हणाले ?

(गाणें) आम्हां दोघांची एकी करा आम्हीं राहूं खेळीमेळींत ॥ १ ॥

नव्हं तात्या ! आतां तूंच सांग, अरे विस्तवाचं अन् पाण्याचं कधीं
जमलय कां ?

तात्या :- ते कसं जमणार ?

बापू :- इतक्यामधें काय झालं बघ !

इतक्यामध्यें नरक आला. -

तात्या :- अरारारा ! काय घाण सुटली ?

बापू :- अरं हातं न्हाई आला. स्वर्गातल्या देवाच्या सभेंत आला रं !

तात्या :- स्वर्गांत आला व्हय ? मला वाटलं कीं इथं आला. बरं मग म्होरं काय झालं ?

बापू :- ऐक !) इतक्यामध्यें नरक आला नम्रभावानें बोलत ।

आम्हां तिघांची एकी करा आम्हीं राहूं खेळीमेळींत ॥

नरक आल्यावर मात्र देवांला एक कल्पना सुचली अन् मग त्यानं काय केलं ?

॥ दारू अंडी ॥

बापू :- (बा. तमाशाची) देवांना आली कल्पना, त्यांना तिघांना, मिसळले एकमेकांत ।
तो बनली देवी मदीरा, नावतें सुरा, पूर्वे वृत्तांत ॥ व्हय रररररं ॥
ताल्या! अशा तऱ्हेनं हिचा जन्म झाला. अग्नी, पाणी, नरकापासून. आतां
या तिघांचे वेगळे वेगळे गुण काय आहेत! ते सांगतो ऐका.
(गाणे) प्रत्येकाचा वेगळा गुण सांगतो तुम्हांला, पाण्यासारखी ही पातळ
आहे शरीराला, अग्नी सारखी जाते जाळीत आतनं देहाला, वास घेता
नरकाची घाण येते नाकाला ॥ हां ॥
ऐकलंस ना! मग सोड हिचा नाद, सोड, आणि चल आतां घरला
ताल्या :- तें कांहीं नाहीं, आपण हिला घरला न्यायचीच. हो म्होरं! आणि बिचारतील
आमच्या गांवाला येतीय का!
बापू :- आहो बाई! तुमचं नांव काय?
बाई :- माय नेम ईज ब्रँडी!
बापू :- (माय नेम ईज ब्रँडी) मग तुम्हीं आमच्या गांवाला यालकां?
बाई :- हो, येईन कीं, पण,
बापू :- आहो, पन काय?
बाई :- सांगू! पण तुमच्याकडं बघून मला बाई वकारी येतीया.
बापू :- मग आम्हीं काय करावं म्हणतां?
बाई :- सांगते ऐका! (पद)
पहिल्यानं हौस तुम्हीं माझी पुरवा, बसारा साफ मिशावरी फिरवा,
दिसेल गुलजारी ॥ चल जीजी ॥
ताल्या :- काय मिशा काढा म्हनतीया, पर मिशाची काय अडचन व्हतीया!
आमाला ह्या गाळून लागत न्हाई!
बाई :- ऐ कांहीं न्हाई जमायचं! मिशा काढून चांगलं अपटुडेट व्हायला पाहिजे.
ताल्या :- बरं, बरं, तुमच्या मनासारखं करतो मग तर यालन्हवं?
(गाणे) मदिरेच्या आधीन झाला, दारू ढोसायला, दारूनं ताल्या गुंग
झाला, लागलाय झुकांड्या खायाला, बापूच्या पाया पडू लागला,
बापू! मला आणि जरा देतोस कां!
बापू :- थांब लेका, आतां पोटाला भोकं पाडून ओततो आंत!

## ॥ दारूबंदी ॥

तात्या:- नगं नगं! असं बोलूं नकोस रे. बापू मी तुझा बापराय बाप, वाईसी दे.

बापू:- आता बाम्हणुयास! थोड्या वेळानं आई म्हणचील, आणि घटकानं बायकू बी म्हणचील. काय सांगावं!

तात्या:- छे! छे! बापू मला कसंसंच हुतंय बघ! ध ध धर माझ्या हाताला, प प पोचीव माझ्या घराला, आरे आरे आरं, खाली वाक खाली वाक, आरं या दाराची कमान धडकल की डोक्शाला॰ बापू:- (गाणे)

ध ध धर माझ्या हाताला, पप पोचीव माझ्या घराला, अशी स्थिती होते दारूनं आपा ध्यानाला ॥

बापू:- तात्या! तुला मी पहिल्यापासनं सांगत होतो, की बाबा! हिची संगत नको. या बयाच्या नादानं आजपातूर कुनाचं चांगलं झालं नाही म्हनून.

तात्या:- बापू! पटलं गड्या मला तुझं म्हणणं. म्हणून इथं जमलेल्या या सगळ्यां लोकांच्या देखत, महात्मा गांधींच्या पायाची शपथ घेऊन तुला सांगतो, की आजपासून मी कधीही दारू पिणार न्हाई. आपल्या काँग्रेस सरकारनं, दारूबंदीचा कायदा करून आम्ही गोरगरिबांवर लै उपकार केल्यात. ते आम्हीं कधीबी इसरणार नाही. ॥ बोला महात्मा गांधींकी जय ॥

॥ दारूबंदी- झालीच पाहिजे ॥

बापू:- तात्या! नीट लक्षांत ठेव.

(गाणे) अरं या मदिरेनं देश मातीमोल झाला ॥ ध्रु० ॥

मोठे मोठे धुळीस मिळाले अन्न न खायाला,

दीक्षित शाहीर विनवी सकलां सोडा दारूला ॥ १ ॥

(पुणे दि. १८।१०।८३. क्रांतीशाहीर र. द. दीक्षित चिंचणीकर.)

॥ श्रीसद्गुरु जयराम स्वामी महाराज की जय ॥

॥ नवरत्नांचा हार ॥ कवी-लेखक:- राष्ट्रशाहीर ग. द. दीक्षित चिंचणीकर ॥

॥ भाग १ ला ॥

चाल क्रमांक १ ) एके दिवशीं भरला दरबार, स्वर्गलोकांवर, हिंदमाता धीर, आणि स्वातंत्र्यदेवी पुढें खास, कसा तो ऐका त्याचा इतिहास, शाहीर दीक्षित करितो कथनास ॥ धृ० ॥

एकीकडे शिवाजी छत्रपती, शंभू भूपती, राजाराम नृपती, दुसरीकडे पृथ्वीराज चौहाण, जयमल ठाकूर वीर महाज, राजा पंजाबचा पौरस जाण ॥

चा. क्र. २ ) विजयनगरचा राजा रामराय, देवगिरीचा रामदेवराव ॥
इतक्यांत विष्णुदूतानीं, आणिले टिळक लोकमान्य ॥
टिळकांनी खाली वांकून, सर्वांचे वंदिले पाय ॥

चा. क्र. ३ ) देवी म्हणे लोकमान्यास होती मम हाल ॥
मांतले देश हे कोण? आले बेताल ॥
शिवशाहीत मुसलमान आज कोण रे बोल! ॥
लोकमान्य सांगती आई, माजलेत गोरे लाल ॥

देवी:- अरे! मला हे लोक त्रास देतात. त्याची काय व्यवस्था करून तूं आला आहेस?

लोकमान्य:- माते! मी काय व्यवस्था केली आहे? ते सांगतो ऐक.

चा. क्र. (८ दांडी) तुजसाठीं सोसणारा व्याधी, अतुल ज्याची बुद्धी, साध्य रिध्दी सिध्दी, असा मम गांधी महात्मा जोडीदार, अणता केलाय देशाचा विचार, त्यांकडे सोंपविलाय अधिकार, साह्याला युवराज जवाहरलाल, ऐक तूं आई ॥

देवी:- अरे! तो एकटा जवाहीर तरी काय करणार? शिवाजी राजाला तानाजी, बाजी, येसाजी वगैरे वीरांचे सहाय्य होतें म्हणून माझी मुक्तता आली. तसें कोणी आहेत कां?

लोकमान्य:- हां पहा, मी एक नवरत्नांचा हार गुंफून ठेवला आहे. ऐक!

चाल दांडी ) जवाहरा साह्य करण्यास, ठीक ठिकाणांस, अनुयायी त्यांस, शंकरराव देव महाराष्ट्रास, वल्लभभाई पटेल गुजराथेंत खास, राजगोपालाचारीयर मद्रास, वीर भाई परमानंद पंजाबास, डॉक्टर शामाप्रसाद मुखर्जी बंगाल्यास, माधवरावजी अणे नागपूरविदर्भास, गंगाधर देशपांडे कर्नाटकास, नेमलेत बघ आई ॥

देवी:- ठीक आहे. आणखी कोण कोण आहेत! ॥ १ ॥

लोकमान्य :- माते ! आतां आणखी कोण कोण आहेत तें ऐक.

(चा. प्रा. करावे $\frac{४}{२}$) हिंदूराष्ट्राधिपती तात्याराव सावरकर, तसेंच मुंजे डॉक्टर, आणि सप्रू - जयकर, मौलाना आझाद थोर, जोशी नारायण मल्हार, सरहद्द गांधी अब्दुल गफार खान, कन्हैयालाल मुनशी तें जाण, डॉक्टर आंबेडकर विद्वान ॥

देवी :- ठीक आहे ! तुझ्याबरोबरची मंडळी येथें आलेली पाहून मला मोठी काळजी लागली होती, पण आतां ती निवारण झाली.

लोक :- माते ! माझ्याबरोबरचे कोण कोण आले आहेत ? तें मला तूं दाखवशील कां ?

देवी :- इकडे ये, आणि हा हार पहा. हीं रत्नें माझ्या हारांतून गळून पडली आहेत.
पहिला हार तो म्हणीं, लोकमान्यांनीं, हातीं घेऊनी, एक होतें बिपिनचंद्र पाल, दुसरें लाला लजपतराय लाल, त्यांत मेरुमणी नेहरू मोतीलाल, ओजारी बॅनर्जी सुरेंद्रनाथ, नामदार गोखले फार विख्यात, फिरोजशहा मेथाही होते त्यांत, दादाभाई नवरोजी प्रख्यात, विठ्ठलभाई पटेल भूषण ज्यांत, स्वामी श्रद्धानंद पूज्य जगतांत, जाहले दादा ॥

देवी :- पण काय रे ? हिंदुस्थानांत खूप पराक्रमी राजे होते, तबडोद्याचे सयाजीराव, सातारा, कोल्हापुरचे छत्रपती आदि, यांची मुलें काय पद्यातले राजेच आहेत काय ?

लो. :- नाहीं माते ! ते सुद्धां तुझ्यासाठीं रक्त सांडायला तयार आहेत. ज्यावेळीं दैत्य हिटलर वगैरेंनीं तुझ्याविरुद्ध आक्रमण केलें, त्यावेळीं छत्रपती राजाराम महाराजांचे भाचे विक्रमसिंह देवास सिनियर यांनीं लिबियांत जाऊन जर्मन सेनापती रोमेल याच्या एका तुकडीवर विजय मिळविला आहे.

देवी :- काय, तो विक्रम इतका पराक्रमी आहे ? शाब्बास, माझ्या बाळांनो, शाब्बास ! बरं, आणखी कोण कोण होते ?

लोकमान्य :- ऐक माते ! (गाणें) यशवंतराव पवार, ज्युनियर देवास, तुकोजी होळकरांनीं राजसंन्यास, घेतला परी पुत्र यशवंतराव खास, तुझ्या सेवेचा लागला ध्यास, जिवाजीराव शिंदे करती साह्यास, :-

लोकमान्य :- माते! आतां आणखी कोण कोण आहेत तें ऐक.

चाल-प्रा० करावस ५/२) हिंदूराष्ट्राधिपती तात्याराव सावरकर, तसेंच मुंजे डॉक्टर, आणि सप्रू-जयकर, मौलाना आझाद थोर, जोशी नारायण मल्हार, सरहद्द गांधी अब्दुल गफारखान, कन्हैयालाल मुनशी तें जाण, डॉक्टर आंबेडकर विद्वान ॥

देवी :- ठीक आहे! तुझ्याबरोबरची मंडळी येथें आलेली पाहुन मलासुद्धा काळजी लागली होती, पण आतां ती निवारण झाली.

लोक:- माते! माझ्याबरोबरचे कोण कोण आले आहेत? तें मला तूं दाखवशील कां?

देवी :- इकडे ये, आणि हा हार पहा. हीं रत्नें माझ्या हारांतून गळून पडली आहेत.

पाहिला हार तो शणीं, लोकमान्यांनीं, हातीं घेऊनी, एक होते बिपिनचंद्र पाल, दुसरे लाला लजपतराय लाल, त्यांत मेरुमणी नेहरू मोतीलाल, अजारी बॅनर्जी सुरेंद्रनाथ, नामदार गोखले फार विख्यात, फिरोजशहा मेथाही होते त्यांत, दादाभाई नवरोजी प्रख्यात, विठ्ठलभाई पटेल भूषण त्यांत, स्वामी श्रद्धानंद पूज्य जगतांत, जाहले दादा ॥

देवी:- पण कायरें? हिंदुस्थानांत खूप पराक्रमी राजे होते, तेबडोद्याचे सयाजीराव, सातारा, कोल्हापुरचे छत्रपती शाहू, यांची मुलं काय पद्यातले राजेच आहेत काय?

लो. :- नाहीं माते! ते सुद्धां तुझ्यासाठीं रक्त सांडायला तयार आहेत. ज्यावेळीं देव हिटलर वगैरेंनी तुझ्याविरुद्ध आक्रमण केले, त्यावेळीं छत्रपती राजाराम महाराजांचे भाचे विक्रमसिंह देवास सिनियर यानीं लिबियांत जाऊन जर्मन सेनापती रोमेल याच्या एका तुकडीवर विजय मिळविला आहे.

देवी:- काय, तो विक्रम इतका पराक्रमी आहे? शाब्बास, माझ्या बाळानों! शाब्बास! बरें, आणखी कोणकोण होते?

लोकमान्य :- ऐक माते! (गाणें) यशवंतराव पवार ज्युनियर देवास, तुकोजी होळकरानीं राजसंन्यास, घेतला पदरीं पुत्र यशवंतराव खास, तुझ्या सेवेचा लागला ध्यास, जिवाजीराव शिंदे करती साध्यास, :-

## ॥ पायाची दासी म्हणजे ताई तेलीण पोवाडा ॥

॥ कवी :- राष्ट्रशाहीर गणेश दत्तात्रय दीक्षित चिंचणीकर जि. सातारा, मु. सांगली ॥
(कै. दत्तोपंत कोल्हटकर वाडा जोशी गल्ली जुना सांगली दि. १५।५।८२)

॥ चौक १ ला ॥

लढवी जो किल्ला वासोटा, म्हणे बापू गोखल्या सांभाळ आपला कासोटा ॥ धृ ॥

चा. क्र. १ ) पाण्यांत जशी मासळी, आकाशीं बिजली, तशी चमकली, कोंकणांतील एक
हो नार, कर्नाटकांत जशी चन्नम्मा नार, तशी महाराष्ट्रांत हो गाजली फार ॥
तिचे नांव ताई तेलीण, पराक्रमी महान, खरोखर असून, लढवीला किल्ला
अजिंक्य वासोटा, पेशवे सैन्यास दावी सोटा, पळवी बापू गोखल्यांस उरफाटा ॥
चा. क्र. ५ ) कुठे धीरवीर पेशवा पहिला बाजीराव, कुठे चिमाजी आप्पा कुठे सदाशिवराव,
विश्वासराव, माधवराव कुठे तो नारायणराव, एकापेक्षा एक पराक्रमी, स्वराज्या-
च्या कामीं, देती रणीं देह ॥
कुठे राघोभरारी ऐसा वीरवर गुंडा, अटकेस फडकाविला ज्यानं मराठी झेंडा,
त्याच्याच पोटीं निपजला कसा हा धोंडा, पेशवा दुसरा बाजीराव,
होता पळपुटा, विलासी फारडा ॥
छत्रपतींचे प्रतिनिधी होते वासोटा किल्ल्यावर, परी राजधानी त्यांची
कराड नगरी सुंदर, त्याच्याच पायाची दासी ताई गुलझार, होती
सौंदर्याची पुतळी, अस्मानची बिजली, रणांगणावर ॥
चा. क्र. १ ) कराडातली तेल्याची कन्या, रूपवर धन्या, खरोखर मान्या, परी
ज्योतिषी भविष्य वदणार, लग्न होतांच विधवा होणार, कोण मग
तिला संगा वरणार ॥

चा. क्र. २ ) वाढली लगीनावेरीज, वय वर्षे जाहली सोळा ॥
तारुण्य मुसमुसे अंगीं, कैकांचा तिच्यावर डोळा ॥
परि डाळ शिजे न कोणाची, अशी होती धीर वीर सबळा ॥

चा. क्र. ३ ) एके दिनीं मैत्रिणींनीं मनीं करून विचार ॥
स्नानास गेली कृष्णा-कोयना संगमावर ॥
कांहीं मुसलीम गुंडांनी होती ठेवीली नजर ॥
पळवून ताईला वाटवूं पाहती चोर ॥
ओरडून ताई म्हणे धांव प्रभो शंकर ॥

:-

॥ ताई तेलीण ॥

चा. क्र. (प्रकार 8) हा आरडा ओरडा ऐकून, धांवले कांहीं सज्जन, आईबाप आले धांऊन, सोडवायचा करती प्रयत्न, तंवा बोलती गुंड यवन, आहे वराआम्ही ही फार दिवसांपासून ॥ आतांच बाटली गाईचे मांस भरवून ॥
ताईनं केला इनकार, मी पवित्र कुमारी नार, इतक्यांत प्रतिनिधीयार, घोड्यावरती होऊनी स्वार, सहजींच आले तिथवर, पाहिला सर्व प्रकार, त्यानीं करून शानी विचार, लढविली युक्ती बरोबर, मीठाचें पाजले पाणी तिला सत्वर ॥ भडभडा ताई ओकली, अरचेंच अन्न त्या स्थळीं, मांसाचा लवलेश दिसला नाहीं त्यावेळीं ॥ प्रतिनिधीनं गुंडांना शिक्षा योग्य ती दिली ॥ आणि "आतां निघून जाणार" तोंच ताईनं पुढें होऊन, प्रतिनिधीचे पाय धरून, विनविलें हात जोडून, काय बोलली गहिंवरून, माझें होणारें भविष्य ऐकून, वरण्यास मला हो तयार नाहीं कोण ॥ त्यांत आजचा प्रसंग पाहून, कोण करील लग्न माझ्यासी सांगा मी दीन ॥ ही गाय कसायाहातून, सोडविलीत खरी आपण, घ्या पदरीं मला ठेऊन, होऊन पायाची दासी तुमच्या राहीन ॥

चा. क्र. १) प्रतिनिधींनीं करून विचारांस, नेली वाड्यांस, ताईला खास, राणीसाहेबानींही दिला होकार, आली पायाची दासी ही नार, पराक्रम तिचा पुढें कथणार ॥ १ ॥

---

॥ चौक २ रा ॥

चा. क्र. १) राजधानी पुणें शहर, पेशव्यांचा थोर, भरला दरबार, दसऱ्याचा म्हणून प्रतिनिधी त्यांस, गेले होते ताईसह समयांस, पाहिले पेशव्यांनीं ताईला खास ॥

चा. क्र. ७ भेदीक-3) चंचल नेत्रीं चारूगामिनी मुखीं चंद्रतेज, ताईच्या मुखीं चंद्रतेज, प्रगटे तिच्या तेव्हां साज ॥ हो ॥
भुवयां धनुष्याकार गुलाबी रंग गालांवर, गुलाबी रंग गालांवर, होती मृगनयना सुंदर ॥ हो ॥
रूपसुंदरा नवयौवना शरीर भरदार, ताईचें शरीर भरदार, रणांवरी जणूं बिजली धार ॥ हो ॥

:-

॥ ताई तेलीण ॥

(चा. क्र. २) दृष्टीला पडतां पेशव्याच्या , सौंदर्याचा लागला ध्यास ॥
म्हणे असे हे सुंदर रत्न । पाहिजे आपुल्या पदरीं खास ॥
मग मनीं धरोनियां हेत , केला बेत दुसऱ्या दिवसांस ॥
भोजनाचें आमंत्रण सकलां । दिले फडणीसह येण्यास ॥

(चा. क्र. ३) बहुतेक फडणीसह आले सर्व सरदार ॥
सेनापती बापू गोखले खरा नरवीर ॥
फडणीच्या जागीं काढून ठेवली समशेर ॥
भोजना प्रतिनिधीं नाहीं राहिले हजर ॥
पेशव्यांना दिला धाडून खलिता सादर ॥

(चा. क्र. लाट ४) धाडीला खलिता पेशव्यांनी , कोकणांत इंग्रजी माजला , आपणांवरी शिरजोर झाला , तो इंग्रज टोपीवाला , आ वासून टपून बसला , सारी पेशवाई गिळण्याला , तरी तुम्ही छोडा मेजवानीला , थु: तुमच्या जिनगानीला , शिवाय नोकर नव्हे आपला , कांहीं हुकूम करणें जर मला , तर छत्रपती वांचून कोणाला , अधिकार नाहीं तो मला , मी येणे शक्य नाहीं तिथें भोजन करण्याला ॥ वांचूनी खलित्यातील सार , बाजीराव झाले संतप्त क्रोधें अनिवार ॥

(चा. क्र. कराव - ५/२) श्रीमंतानीं केली आज्ञा बापू गोखले यांस , घेऊन आपुल्या सैन्यास , करा कूच या समयास , घेऊन वासोटा किल्ल्यास , प्रतिनिधीस कैद करून , सर्वांस आणावे धरून , कारण, प्रतिनिधीनं फितूर होऊन , इंग्रजाशीं बांधले संधान ॥

(चाल क्र. १२ गिलच्याची) होता नाईलाज घेऊन तलवार बापू गांठी वासोटा ॥
परी ताई तेलीणीनं त्याला कसा लगावला सोटा ॥
प्रसंग तो सांगेल शाहीर आपणां विकटसा मोठा ॥

(चा. क्र. १) पेशव्याच्या विषय लोभाचा , गंज तो त्याचा , तलवारीस , चढला म्हणून बापू अपेश घेणार , सत्याचा वाली प्रभू होणार , शाहीर दीक्षित कवन गाणार ॥ २ ॥

X——X

॥ ताई तेलीण ॥

॥ चौक ३ रा ॥

चा. क्र. ७/१ भेदीक
कोंकणप्रांती सह्याद्रीवरी सिंहासन शिवशाहीचे ।
एका सुळक्यावरी किल्ला वासोटा शेखरापरी विलसे साचे ॥
ऊंच गडावरी बळकट अवघड आडी तरी कितो घनदाट ।
गगनचुंबी ते वृक्ष भिडती अस्मानीं नंदनवना परी थाट ॥
स्वातंत्र्याचा ध्वज फडफडुनी वैभव दावी मराठ्यांचे ।
प्रतिनिधींची दहशत हवशांना पूर्ण अंतरी वसे त्यांचे ॥

चा. क्र. १
पर्वा न त्याची बापूस, जसा कापूस, घोर आनीस, प्रतिनिधी तयापरी
गोखल्यास, अडकरी आला गडाखाली खास, वेढीयले वासोटा किल्ल्यास ॥
गांठून निशाण बुरुज, मराठ्यांनीं सहज, कराया काज, मांडिले आपल्या
सैन्याचे ठाण, झडूं लागली नौबत दणाणदणाण, आला प्रतिनिधीं अर्धमेला जाण ॥

चा. क्र. २
किल्ल्याच्या सभोंवतीं जाणा, धनगर बारगीर लोकांची वस्ती ॥
आला बापू ऐकुनी वार्ता । सकलांनीं खाल्ली धास्ती ॥
बापू करील चटणी सर्वांची । इंग्रज तदेकाय स्वस्ती ॥
आली प्रेतकळा किल्ल्यास । जरी होती पूर्ण दरोबस्ती ॥

चा. क्र. ३
आली स्मशानकळा जरी वासोटा किल्ल्यांत ॥
परी त्यांत होती एक रणदेवता राहात ॥
तिचे नांव ताई तेलीण ठेवा ध्यानांत ॥
युध्दाचे शिंग ऐकतां आली जागृत ॥
वीरतेज चमकले पहा तिच्या नेत्रांत ॥
इकडे बापू म्हणे किल्ला येईल सहज हातांत ॥
त्याच वेळीं ताईचा चालला किल्ल्यावर बेत ॥

चा. क्र. ८ डांगटी
आमुचा घडला तरी काय, असा अन्याय, म्हणुनिया हाय, बापूनें
घेतली हातीं तलवार, न्यायाचा सोडून सारा विचार, पेशवे तरी
कसें बेदरकार, धाडकाय वाटले प्रतिनिधीं ठार, म्हणून धाडिला
गोखले साचार, गांठ पर ताई तेलीणीशीं पडणार, हाय पेशवेदादा ॥

चा. क्र. १४ पाळण्याची
त्या द्रौपदीच्या नादें कीचक मेला । कौरवही गेले स्वर्गाला ॥
त्या सीतेच्या नादें रावण मेला । लंकेसह धुळीस मिळाला ॥
:-

॥ ताई तेलीण ॥

कोमल कुमारीच्या नादें सिंहगडाला, उदेभान गेला नरकाला ॥
चाल :- ) ॥ गती तीच होईल पेशव्यांची ॥
॥ आली जरी स्वारी बापूंची ॥
॥ मी तरी एक अबलाची ॥
तूं अंत तुझ्या देशिल स्वातंत्र्याला, पेजाणून मम वचनाला ॥ १ ॥
चा. प्रा. लाट ४ ) असं म्हणून उभी राहिली, मकवर भरानियाभाळीं, प्रतिनिधीच्या सामोरीं गेली, थरथरां कापूं लागली, सिंहिणीपरी खवळली, वाघीण जपूं चिडलेली, चंडिका तशी भासली, जणूं कडक लक्ष्मी आली, पाहून प्रतिनिधी यांची बोबडी वळली ॥
ताई तेलीण बोलूं लागली, चला उठा, चिता सजविली, तुमचीन माझी याबेळीं, माझ्या सती जाण्याची करा तयारी या स्थळीं ॥
पुरुषासारखे पुरुष असून, कां बसला दीन वदन, मातीत तोंड खुपसून, तुम्ही मेला आज मशीं जाण, आले रंडकी आजपासून, होऊंयां पापावेगळीं सती जाऊन ॥ ० ॥
चा. प्रा. १२ गिलच्याची ) स्पष्ट शब्द ताईचे ऐकून प्रतिनिधी थंडगार झाला ॥
आधींच अर्धा मेलेला त्यांत असा मर्मी घाव बैसला ॥
जातीचा नेभळट मग यावीकशी सांगा विरश्री याला ॥
परी ताई तेलीण गर्जुनी सांगे काय सैन्याला ॥
चा. प्रा. ५/५ कराव-५ ) नादान धन्याचे अन्न, खाऊन तुम्ही जाण, झाला नादान, कसें रे बोला, अरे बोला, खरोखरीं व्यर्थ पुरुषांच्या जन्माला आला ॥
बांगड्या तरी हाती भरा, लुगडी पांघरा, लावुनी पदरा, हिजडे तरी व्हारे, अरे व्हारे, काय स्वातंत्र्याचे नष्ट जाहले बारे ॥
ऐकून शब्द खवळले वीर, धीट धनगार, सोरेबारगीर, उपसूनी तलवार काय गर्जले, नाहीं भागोज आमुचे नष्ट जाहले ॥
चा. प्रा. १ ) पाहूं कसा किल्ला हा घेतो, बापू गोखले तो, इथून कसा जातो, सैन्यासह जिता पुणें आतात, समाधी त्याची इथेच कोकणांत, रचूं या सह्याद्रीच्या घाटांत ॥ ३ ॥

॥ चौका ४ था ॥ (ताई तेलीण)

चा. क्र. ५ कराव- १/२) निरोप धाडी किल्ल्यावर बापू गोखला, करून खाली किल्ल्याला,
आवा अटकाव मला, व्यर्थ होणारी प्राणहानी वाचवा, वाचवा हो,
आपदा दूर घालवा ॥
वकिलानं बोलणं केलं विनय दाऊन, साम दाम आचरून, परी ताई
तेलीण, वकीलांस दाद देईना, देईना हो, बापूला काही उमगेना ॥
अखेरीचा निरोप धाडला किल्ल्यावर, प्रतिनिधीस सत्वर, म्हणे
भेट घ्या लौकर, प्रतिनिधी पुढे नाही आला, नाही आला हो,
ताई तेलीण आली सामोरा ॥

चाल :- ७ बोलसारीयारी जेरीक) बापू म्हणे मग ताई तेलणीला कोण कुणाची तू नार ।
प्रतिनिधी का समोर येईना कशास आलीस तू पोर ॥
म्हणे ताई मी किल्लेदारीण रखेली या प्रतिनिधी यांची ।
ताई तेलीण नावची माझे मीच प्रतिनिधी हो साची ॥
लाल जाहला वीर बापू तो म्हणे तू का आलीस बोलभांड ।
राजकारण काय कळणार तुजला तू तरी ठेवलेली रांड ॥

चा. क्रं. ४ छगट) ताई म्हणे तू आलास का इथे, ताई तेलीण आहे किल्ल्यात, हे काय
तुला नव्हते माहीत, काय अन्याय आमचा सांग यात, म्हणे बापू
अगोदर किल्ला द्यावा ताब्यात ॥

चा. क्र. १ सहज ना किल्ला देणार, युद्ध करणार, एकखेरीखर, उत्तर याचे
देईल माझी तलवार, आलास तू मोठ्या तोऱ्याने फार,
विषय अभिलाषे नाश होणार ॥

चा. क्र. २) म्हणे बापू अगे मुर्दाडे । बापूशी या आहे गाठ ॥
आजवरी कितीक वीरांनी । दाविली जयाला पाठ ॥
ताई म्हणे तुझी जात माझी । सारखीच आहे जात ॥
मी रखेली या प्रतिनिधीची । तू पेशव्यांची हे सत्य ॥

चा. क्र. ३) नेमळ्या धन्याचे रक्षण करण्यासाठी ॥
तू आलास इथे तलवार घेऊनी हाती ॥
घी देखे, मगर नही देखा, बडगा पाठी ॥
मीही माझ्या नेमळ्या यजमानाचे साठी ॥
घेतली हाती तलवार पहा उठाउठी ॥

॥ ताई तेलीण ॥

देतोस कुणाला रे मल्या अशी दमदाटी ॥
नाठाळाचे पाठीं काठी हिंमत आहे इथ मोठी ॥

चा.क्र. ४ लावर ) जरी असले एकमी नार, तरी करीन संग्रामघोर, तव गर्व उतरवीन थोर, मनामध्ये करी विचार, कायम्हणून आलास इथवर, अपराध काय आम्ही केला सांग साचार, बापूनं केलं उत्तर, मी बोलून चालून नोकर, हुकुमाचा ताबेदार, आली किल्ल्याची हाकार, चला पुण्यास माझ्यासंगं तुम्ही आचे नोकर ॥ ऐकून ताई हासली, अन बापूला काय बोलली, तें शक्य नाहीं या वेळी, जर किल्ला पडला कधीकाळी तर पुण्यास येईल ताईचे प्रेत त्यावेळी ॥

चा.क्र. १ ) फिसकटला बेत समेटाचा, उठला मगराचा, पुतळा क्रोधाचा, आतां हा जाळील कोट सकळांस, चालला उठून बापू डेऱ्यास, गुराखी पोरे चिडविती त्यास ॥

चा.क्र. ७/२ भेदीक ) "संभाळ पळूनी बापू गोरवळ्या संभाळ पेशवाईच्या कुळा,
पळ रे बापू हातीं नाहींतर नायबाय मारील चिरून तुला" ॥४॥

॥ चौफ: पु वा ॥

चा.क्र. ७/४ भेदीक )
मस्तकीं गेली तळपायाची आग, तेवा बापू गरगरला ।
काही सुचेना जळे अंतरी संतापानं भिरभिरला ॥
काय करावा एका रांडेनं या वीराचा अपमान ।
हाय! गुलामी, वीर असून मी धीक्, धीक् माझं व्यर्थ जिणं ॥
महा बलाढ्य मोंगल जरी या वीरापुढे जे थरथरले ।
कावेबाज इंग्रज परि लचकूनी ज्यापुढती ते कुरकुरले ॥

चा.क्र. १ ) अशा वीर बापू गोरवळ्याचा, भडकला त्याचा, क्रोध तो साचा, एकदम हुकूम देई सैन्यास, करा म्हणी कूच आतां या समयास, उडवा सकळांच्या धुव्वा तुम्ही खास ॥
धुम धुम धडाड धडाड धुम धडा, आवाज कडकडकडा, गोळे धडधडधडा, तोफेतून दणाण दणाण उडती, हणाण हण बंदुक गोळ्या सोडती, अधिही खिंडाळून हासती ॥

:-

॥ ताई तेलीण ॥

चा.क्र. २ ) मारीली पेशवे सैन्यानें, दरवाजा वरती धडक ॥
परी सात हत्यारा संगें, आली ताई दारामधें तडक ॥
बापू लागला मुंडकीं वीरांची, एकसारखी ती बेधडक ॥
रणागनें न्हाली त्या ठायीं, जाहली पहा लाल भडक ॥

चा.क्र. ३ ) जरी शुर मराठा धडक्या मारी दाराला ॥
तरी ताई पुढें तो जाती मुळींच कुरकुरला ॥
पाहूनी शौर्य ताईचे बापू चरकला ॥
मुडद्यांचा ढीग पाहून पुरता टरकला ॥

चा.क्र. ४ ) बापू करी मनीं विचार, ताईचा पराभव जर, आपण केला खरोखर, जग म्हणेल वाहवारे बापू गोखलावीर ॥ आला चालून एका स्त्रीवर, थुः याच्या जिनगानीवर, आणि माझा पराभव थोर, ताईनं केला रणींघोर, तर मात्र जग हंसणार, आणि मला म्हणून दावणार, वाहवारे! मर्द बहाद्दर, आतां बांगड्या हातामधीं भर, काय करावे सुचेनाकांहीं त्याला प्रसंग आला घोर ॥

चा.क्र. ३ ) जाईना समोर तिच्या बापू दूर दूर राही ॥
एकदम केली ताईनें त्यांवरी चढाई ॥
दिली हांक बापू आतां संभाळ कासोटा पाहीं ॥
आली पहा नार प्रतिनिधींची तेलीण ताई ॥
वाघ आणि सिंहिणीची जुंपली एक रणघाई ॥

चा.क्र. १ ) माजला संग्राम घोर, अती भयंकर, धन्य ती नार, रणांगणीं तळपे वीज सुकुमार, चपल बहू ताई तेलीण नार, भूमीला झाला प्रेतांचा भार ॥ ५ ॥

॥ ताई तेलीण ॥

॥ चौक ५ वा ॥

चा.क्र. १ ) ताईचे पाहून अवसान, बापूही जाण, लढे जोराने, भिडली पहा तलवारीस तलवार, ढालीवर झेली सहज तो वार, धन्य म्हणे धन्य ताई तू थोर ॥
शौर्याची पारख शूरांस, हिऱ्याची जवाहिऱ्यांस, घोड्याची अरबांस, कुस्तीची जशी पहिलवानास, पवाड्याची खऱ्या शूर मर्दास, तशी ती होती बापू वीरांस ॥

चा.क्र. २ ) म्हणून शत्रुभाव विसरून, ताईचे करी कौतुक ॥
थांबला हात तो त्याचा, मनी होता पूर्ण निःशंक ॥
तोच एक वार सफाईने, ताईने केला तो चोख ॥
तलवारीने तये आडविला, परी गेला तयाचा झोक ॥

चा.क्र. ३ ) ताईचा वार वज्रापरी पडला जाणा ॥
बापूच्या तलवारीचे दोन तुकडे झालेना ॥
अभिमान उतरला जरी शौर्याचा बाणा ॥
हासला तरिही कौतुके बापूवीर राणा ॥
तो आणि कराया वार ताई आली पहातां ॥

चा.क्र. ४ ) (लावणी) त्याच्या अंगावरती धावली, तलवार वरती उचलली, "आणि आतां वार करणार". तव एकदम भानावर आली, अन तलवार म्यान ती केली, क्षणी वीज लुप्त जाहली; विनयाने पदर सावरून काय बोलली ॥ निःशस्त्र तुम्ही जाहला, आतां कसे करू तुम्हाला, तुम्ही जावे परत पुण्याला, परि एक विनंती, विषयाचा रंग चढलेला, तलवारीवर तुमच्या पाहिला, जाऊन आजी सांगा या पेशव्याला, अपयश यामुळेच आले आपल्या बाजीरावाला ॥

चा.क्र. १२ ) (गिलच्याची) फार उपयोग पेशवाईला बापू तुमचा या क्षणी ॥
देशद्रोही मी कदापि न होऊ, तुम्हां स्वर्गी धाडूनी ॥
तुम्हीच एक आधार तंतू या पेशवाईत जरमणी ॥
कदर तुमच्या शौर्याची नाही तयां जाण जरी असली धनी ॥

चा.क्र. ४ ) (लावणी) साखरेची किंमत गाढवाला, अप्सरेची नपुंसकाला, तशी तुमची तुमच्या पेशव्यांना, नाही कळली याचे वाईट वाटते आम्हाला ॥ :

## ॥ ताई तेलीण ॥

(लगाव) यःकश्चित खर्वेली मी जाण, नांवाची ताई तेलीण, मारवले पुरी पापानं, परी तुम्हां देऊन जीवदान, राष्ट्राचे फेडते रीण, आता सती जाऊन मी पायावेगळीं होईन ॥ तंव बापू फार लाजला, म्हणे सत्य सत्य या बोला। चला जाऊं परत पुण्याला, आसं म्हणून सैन्यांसह बापू जाऊं लागला ॥ तेजगारं, गुरंराखी पोरं हिणवती त्याला ॥

"तेलीण मारी सोटा, बापू गोखल्या संभाळ काचोटा"

यापरी ताईबाईनं, लढूनिया रणीं शौर्यानं, वासोट्याचे स्वातंत्र्य टिकवून, प्रतिनिधीचे केले रक्षण, पातिव्रत्याचे केले पालन, इतिहास देतसे साक्ष तयाची अजून ॥ आजही कोंकणांतात, आसपासच्या साऱ्या मुलखांत, गुरंराखी पोरं गातात, ताईचे चरित्र आणि देवीपरी भजतात ॥ त्याच गाणं सांगून तुम्हाला, संपवितो शाहीर दीक्षित वीर कवनाला ॥

(चा. क्र. ७ भेदीक - ५/२) "संभाळ पळूनी बापू गोखल्या संभाळ पेशवाईच्या कुळा,
पळशं बापू हातनं जाईतर तायबाय मारील धिरडून तुला" ॥

(चा. क्र. १) सोंडूर राज्य आंधीत, कर्नाटकांत, शाहीर दीक्षित, शाहीर खास देवास दरबार, मानकरी जरीपट्टा कट्यार, वीरांचे कवन नित्य गाणार ॥ ५ ॥

॥ गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णो गुरुर्देवो महेश्वरः ॥
॥ गुरुः साक्षात परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥

बुधवार दि. १८।१०।८३ पुणे. र. द. दीक्षित.

॥ श्री सद्गुरु जयराम स्वामी महाराज की जय ॥

## ॥ भयंकर अग्निदिव्य अर्थात सती पद्मिनी ॥

## ॥ पोवाडा ॥

कवी : सोंडूर राज्य व देवास दरबार शाहीर गणेश दत्तात्रय दीक्षित चिंचणीकर. c/o प. ज. घाटे गुरुजी जगदीश आश्रम, मु. मुरबाड, ठाणे

॥ भाग १ ला ॥

चा. क्र. १ ) सिंहलद्वीप राजरत्नजी, शूरवीर गुणी, सती पद्मिनी, अजरामर झाली जगामध्यें जाण, शोभली स्वरी ज्याचे स्मी श्वार, पातिव्रत्यासाठीं करी जोहार ॥ धृ० ॥

चा. क्र. ५ ) दुर्दैव भरतखंडाचे आले उदयाला, म्हणुनीच पृथ्वीराज चव्हाण रंगारात रमला, दिल्लीचें साम्राज्य पार गमाऊनी बसला, पारतंत्र्य आले जीवाला, आजही या काळा, असें ते बोला ॥

स्वातंत्र्य रक्षिले फक्त चितोड घराण्यानें, करोनिया फडकत ठेवला झेंडा विमलानें, परि तेंही दुष्ट [मोंगलास] मुळींच पाहवें न, हरतऱ्हा यत्न योजिती, परी न च होती, यशस्वी जाण ॥ [पठाणांना]

चा. क्र. १ ) आधींच गुलाम घराण्यानें, राजपुतांना महान, घेतला जाण, आंत दिल्लीपती अल्लाउद्दीन, करण्या चितोड राज्याला दीन, गर्जना करीत आला दीनदीन ॥

घातला भयंकर वेढा, तयानें बडा, तेव्हां चितोडा, परि तिथें लक्ष्मणसिंह (भिमसिंह) राणा, रजपुती होता दीन बाणा, तयांसी मुळींच दाद देईना ॥

चा. क्र. ५/१ करावे ) भीमापरी पराक्रमी लक्ष्मणसिंह, म्हणून म्हणती भीमसिंह, पुत्र त्याचा अरीसिंह, वीर खरा अरी सिंह, पत्नी त्याची सती पद्मिनी, पद्मिनी हो, जी होती सौंदर्यखनी ॥

चा. क्र. ६/५ करावे ) जसा भरत एखादा पोक, माजवी कल्लोळ, तसा जाळपोळ, करीत जल्लादि नीरो, अल्लाउद्दीन ॥

वेढा चितोडगड चौफेर, समर अंधार, सेना अपार, कडवे पठाण हो, अमित फौज ॥

चा. क्र. ३ ) जरी शूर भीमसिंह नाहीं तयांसी डरला ॥ :-

॥ सती पद्मिनी ॥

१३ री. परी शत्रुसेना पाहतां विचारांत पडला ॥
जयभगवान एकलिंगजी मना मधीं स्मरला ॥
शत्रू हा भयंकर कसा देऊं सामना आला ॥
कसा कोरेल पाड माझ्या सैनिकांचा पाळो ॥
तूंच देवा स्वातंत्र्य निशाणाचे करी रक्षणाला ॥

चा.क्र. २ ) ऐकोनी आर्ये या वेळीं , कैवारीं शंभू जागा हो ॥
लढली हा इच्छा नेटानं , स्वातंत्र्य गीत गा, गा, हो ॥
हा प्रसंग बहुतची बिकट , आहे एक चोंत जागा हो ॥
स्वातंत्र्य रक्षणासाठीं , तुम्हीं मात्र फक्त जागा हो ॥

चा.क्र. ३ बारा तेरा बळी राजवंशातील पुत्रांचा ॥
जर मिळास तरच रक्षिन चितोडध्वज साचा ॥
ऐकूनी वाणी वाटला घोर अंतरीचा ॥
पद्मीनी तेव्हां बोलली बोल धैर्याचा ॥

चा.क्र. १० ) सात पुत्र असती हे बारा , म्हणुनी तुम्हीं स्वतः तें तेरा ॥
बळी देऊं रणदेवीला , कां करितां व्यर्थ चिंतेला ॥
पर्वा न मला प्राणाची , वा भीय पुत्रपौत्रांची ॥
॥ देवीची आस ती पुरवूं ॥
॥ स्वातंत्र्य परी नच गमवूं ॥
॥ या जगीं अमर ते होऊं ॥
मरणांतून वाचला कोण , पाण्यावरी जैसा फेण ॥ १ ॥

चा.क्र. १ ) पोबारव अंगीं सिद्धोनी , तेव्हां चढवुनी , सतीपद्मिनी ,
चतीसह गेली बोर समरांत , पाडिले अमित शत्रूचीरास ,
लाजी पळवून आल्या डळिंतास ॥ १ ॥

॥ राणी पद्मिनी ॥

॥ भाग २ रा ॥

चा.क्र. ५/१ कराव – १) पराभव सहन नाहीं झाला त्या शहास, म्हणे घेईन सूडास, पुन्हां जमवूनी सैन्यास, त्याने चितोडगडास, पाडविला हल्ला भयंकर, हो, धरियला उग्र अवतार ॥

रजपूत वीर तयार झाले सांधुनियां जंग, करण्या वैऱ्याचा त्या भंग, गर्जती जय एकलिंग, पद्मिनी ही पतीसंग, चालली रणीं घेऊनि, हो, लढत से अमित शौर्यानें ॥

चा.क्र. १ सत्यभामा कृष्णासंगें, कैकयी दशरथासंगें, लढाईत वेगें, तशीच पद्मीनी शत्रूसैन्यांत, उडवी हाहाकार एका पळांत, पाडीते शत्रूसैन्य समरांत ॥

परी पडला दैवाचा फासा, पाय कचकला, घोड्याचा भिला, घाबरून पडली धरणीवर नार, परी पुत्र बादलसिंह तलवार, धांवला माता साह्या जोरदार ॥

चा.क्र. २) तीरासम घोडा त्यानें, फोडीली शत्रूची कोंडी ॥
पाडूनी शत्रू भूमीला, शत्रूची उडली हबेलंडी ॥
पाहूनी आधार पुत्राचा, पद्मीनी उठली रणचंडी ॥
पाहतां आवाजें तिजला, म्हणे कोण असे ही रंडी ॥

चा.क्र. ३) जाहली घोड्यावर स्वार पुन्हां ती नार ॥
सोडूनी बाण मुंडक्यांची लावली धार ॥
परी पुत्र बादलसिंह आला एकाएकीं ठार ॥
इतक्यांत आला महाराणा भीमसिंह वीर ॥
मरतांनी अकलती ज्याच्या हृदय चाकर ॥
ओढवून ठाकत शत्रूनें वेढले चौफेर ॥
पाहूनी पुत्र दोन धांवले साह्या सत्वर ॥
जसा गेला चक्रव्यूह फोडण्या पार्थकुमार ॥

चा.क्र. लगार ४) तसे धांवले दोघे जोरानें, बापास हाक देऊन, शत्रूची नजर चुकवून, बापाला दूर नेऊन, आपण लढती दोघे हिंमतीनं, देहाची ढाल करून, वांचवला पिता महान, फेडिले पित्याचे रिण, परी तेही रणांगणीं ठार जाहले धन्य ॥ शत्रूचा जोर अमीत, डरले ना परी रजपूत, जे खरे क्षत्रीय सुत, धन्य ते मायेचे पूत, शिरें घेऊनी तळहातांत, नाचती या रणदेशांत, पठाणांचा फडशा पाडीत, उधळून सैन्या लावीत, पळविला अल्लाउद्दीन रात्रीमाळीत ॥

:-

॥ सती पद्मिनी ॥

चा. क्र. १ ) परी पाहिली त्यानं पद्मिनी, सौंदर्यखनी, त्याच त्याक्षणीं, जिंकिले काम शत्रूनें त्यास। सुटला कोण सांगा यातनं समर्थांस, साधले एक भीष्म आणिक हिवलास ॥ २ ॥

---

॥ भाग ३ रा ॥

चा. क्र. १ ) तो शहा बडा अकलमंद, जाहला अंध, विषयानें धुंद, धाडी निरोप भीमसिंहास, भक्त एक देशीलमला सिंहास, करीन मगबद या संहारास ॥ तव पत्नी रूपसुंदर, मदन तलवार, बिजलीचीधार, होईल जर माझी पट्टराणी, जाईन मी वेढा उठवोनी, भडकली सती निरोप ऐकुनी ॥

चा. क्र. २ ) धाडिला उलट या खलीता। पतीव्रता मी राणा कुलांगना ॥
सिंहलद्वीप राजकुमारी, राजपूत क्षात्र वीरांगना ॥
भीमसिंहराणा वीरपत्नी। नव्हे जाण ही वारांगना ॥
नच पडेल जरवरी दृष्टी। बा! नीचा! अल्लाउद्दीना ॥

चा. क्र. 3 ) करुं एक सार्‍यांनी सारी रजपुत शक्ती ॥
लढवूं हा किल्ला लढवून युक्ती प्रयुक्ती ॥
भडकला शहा परी दुजी योजिली युक्ती ॥
धाडिला निरोप गडावरी त्यानं त्यावक्तीं ॥

चा. क्र. ६ करान-५ ) दाऊनी तिचे मज मुख, याचे नेत्र सुख, आलो उत्सुक, पुरवाही आस, अहो आस। लागला तियेच्या स्वरूपाचा मज ध्यास ॥
पाण्यासाठीं मासा तळमळे, गडबडा लोळे, तसा या वेळे, अधीर दर्शना, दर्शना। निववावे नेत्र दाऊनी पद्मिनी जाणा ॥
भीमसिंह म्हणे सार्‍यांना, नेत्र तव जाणा, मुळीं न निवतील, निवतील, परीमात्र पुरेपूर ते खुळे होतील ॥

चा. क्र. ४ लगट ) भरवुनीं तेव्हां दरबार, सर्वांनी केला विचार, हा शत्रू फार जबर, परी करुं मात त्यांवर, कपटासी कपट दाऊन होऊया पार ॥
धाडिला निरोप शहाला, आरशातनं पद्मिनी तुला, दाखवूं, तूं यावें किल्ल्याला, जर वेढा करशील ढिला, अल्लाउद्दीन ठीक बोलला, त्यानं लोच वेढा ढिला केला, आणि उडून गेलला किल्ल्याला, त्यावेळीं गडावर कसा शृंगार केला ॥ :—

॥ सौंदर्यभोगी ॥

चा.क्रं. ६ कहाव - ३) महाली केला कोला शृंगार, आरास तेथें नयन मनोहर, बागबगीच्या भंवती सुंदर, कारंजांचे उडती तुषार, इंद्रधनुष्यें तो दिसणार, मध्यभागीं बहु झुंबर, चकचक चक चक दीप झळकती, दिपवाळी जणूं आली वाटती, मुलामा सोन्याचा भिंतीवरती, मऊ मऊ गालीचे जमिनीवरती, पडदे मखमली बहु शोभती, त्यावरी जडले सुंदर मोती, मंदमंद वाऱ्याजें झुलती, तक्के लोड तें भरजरी असती, कालवून तरी खळखळ खुलती, भव्य आरसा मध्यभागाची, वाढली शोभा त्या महालाची, अशा महालांत, ये शाहा धुंद तालांत ॥

चा.क्रं. १२ गिरच्याची) लंकेसारख्या सुंदर नगरीं जिचा जन्म झालेला ॥
पांत राजकन्या ती नांवही तिचे पाकिजी बोला ॥
तिच्या स्वरूपाचे वर्णन करणें कठीण जाते आम्हाला ॥
सीतादेवी जणूं पुन्हां जन्मुनी आली काय लंकेला ॥

चा.क्रं. ८ दांगटी) जी पूर्वयुगीं लंकेला, होती ती बोला, होती परी कैदी रावणाची खास, बसुनिया नुसती अशोकवनास, रामाज वधुनी दुष्ट रावणास, मुक्त जरी केले सीतेला खास, तरी मारुतीनें त्याच्या आधीं खास, जाळली होती लंका हेवाईयानास, तुम्ही तरी दादा ॥

चा.क्रं. ४ लगट) त्यामुळें लंका पाहण्याची, राहिली आशा ती तिची, म्हणून पूर्ण कराया साची, पुन्हां आली साधीत कन्या ती लंकाधीशाची ॥

चा.क्रं. ७/३ भेदीक) सिंहकटी गजगती नार ती जशी चंद्रकोर, तोंडल्यापरी ओंठ थोर ॥
भुंग्याचाही नयना हरवील असा केशभार, मधुर बहु कंठ कोकीळस्वर ॥
दंतपंक्ती ती कुंदकळ्यापरी नेत्र चमकदार, अंगाचा वर्ण पूर्ण गौर ॥

चा.क्रं. १) आरशांत अशी पाकिनी, पाहिली शाहानीं, विकल परमनीं, बोले अब क्या करूं मैं हाय! हाय!, मछीपरी मैं तो पिघल अब जाय! कैसी सुंदरी मुझे मिलजाय ॥ ३ ॥

॥ सती पद्मिनी ॥

॥ भाग ४-था ॥

(चा. क्र. ८/१ भेदीक) धरुन अंतरी कपट म्हणे मग शहा राणाभीमासिंगाला ।
व्यर्थ आपणा त्रास आजवरी माझ्या सैन्यानें दिधला ॥
चला गडाच्याखालीं जाऊं डेऱ्यामधें करूं खलबत ।
नाहीं वळखिले कपट राण्यानें गेला पोंचवाया खालतें ॥
जवळ येतां डेरा आपला कपटीं शहानें केला ईशारा ।
तोंच दहा पाँचानीं घेरिला भीमासिंह तो करुनी वरा ॥
खदखद हंसुनी नीच बोलला शिकार गवसली जाळ्यांत ।
पाहतो कशी पद्मिनी पडत नाहीं आतां माझ्या बाहू पाशांत ॥

(चा. क्र. १) टाकुनी शहानें फासा, गळामधीं फासा, पकडिला खासा, अन् धाडला
जिरोप किल्ल्यावर समयांस, करा स्वाधीन पद्मिनी खास,
तरीच सोडीन तुमच्या राण्यास ॥

(चा. क्र. १०) खवळले सारें रजपूत, आला कैद भीमासिंह राणा ॥
पद्मिनी आली दुःखीत, कुणी राणा सोडवून आणा ॥
मुत्सद्दी जार डोलयाची, म्हणे आणीन मी मम प्राणा ॥

चाल) ॥ जमविले सर्व सरदार ॥ भरवून मोठा दरबार ॥ म्हणे ऐका माझे विचार ।

(चा. क्र. १०) कपटासी कपट आजीं दावा, परी सोडवा आपुला राणा ॥१॥
ऐकून शब्द पद्मिनीचे, खवळले रजपूत राणा ॥१॥

(चा. क्र. ३) तिचा चुलता शूर लढवय्या जांव तें गोरा ॥
त्याचा पुतण्या बादल वय पाक्का बारा ॥
म्हणे सांग सांग या क्षणीं मार्ग जो बरा ॥
पद्मिनी म्हणे आधीं धाडा उलट उत्तरा ॥
काय धाडायचा निरोप तो ऐकान जल्दीं करा ॥

(चा. क्र. १) होईल खास पट्टराणी, तुझी पद्मिनी, आत्तांच याक्षणीं, तिची ही फार
दिसांची आस, व्हावे बेगम दिल्लीची खास, जुळून आला योग
आज या समयांस ॥

(चा. क्र. १२ गीत) वेढा उठवुनी मुक्त कराल जर भीमासिंह खरोखरीं ॥
सातशें दासींसह पूर्ण गोषांत येईल पद्मिनी तरी ॥

॥ सती पद्मिनी ॥

(चालचाली) दिल्लीस तुमच्यासंगें पालखींतून जाणा निर्धारी ॥
ऐकून शब्दां, पुत्र क्रुध्दले(खवळले) गर्जतो सिंहापरी ॥
(चा.क्र. १७) जर जाशील आम्हांकडे माते, जग पुसेल गे आम्हांते ॥
जी माय वीर धाआगी, सती म्हणून गाजली भुवनीं ॥
असवली पुत्र जी बारा, एका पेक्षां एक नरमणीं ॥
॥ ती खरी सती नव्हती कां? ॥
॥ ती व्यभिचारी होती कां? ॥
॥ असावली काय नपुंसका? ॥
कां बीज ते आम्हास नव्हतें, दे उत्तर याचे मातें ॥ १ ॥
(चा.क्र. ८ ल्लार) देऊनी आण ही रणीं, सोडवूं पित्यालागुनी, स्वातंत्र्य चितोड रक्षणीं, होऊं अमर जाण याक्षणीं, तंव बोले वीर पद्मिनी, मी वीरपुत्र असवुनी, आले धन्य आज भुवनीं, तुम्ही सारे शूरवीर गुणीं, परी आजबाळा याक्षणीं, ठका महाठक होऊनी, सोडवूं तव पिता व्यर्थ कशाला आणहानी ॥
कानमंत्र त्यांसी मग दिला, हा शह आहे शाहाला, पायपोसच पाहिजे चिंचवाला, रणजीतीचा हा न्याय सगुण वेल्हाळा ॥
(चाल.क्र. १) खलनीती बाळ ही असो, पुन्हा ही खाशो, सोडवील त्यासी, मार्ग नच अन्य पती रक्षणास, कथानक गोड असे पुढे खास, ऐका शाहीर गातो इतिहास ॥ ४ ॥

---

॥ भाग-८ वा ॥

(चा.क्र. १) सातशे पालख्या सजवून, चालल्या जाण, गडाखाली महान, चतुर शाहाणी पद्मिनी जाण, पालखी मध्यें दोन दोन सरदार, स्त्रीच्या वेषांत होते भरदार ॥
जे भोई होते पालखीचे, आयकी वेषाचे, पुरुष तेही साचे, काढ्या ज्या पालखी टेकविण्याला, तयामध्यें गुप्त तीक्ष्ण भाला, बुरख्यानें देह आच्छादिला ॥
(चा.क्र. ६/३ कराव) सातशे पालख्या तयार करोनी, शस्त्रास्त्रानें सज्ज भरोनी, दोन दोन रजपूत नरमणी, वेष आयकी सारा घेऊनी, तयार झाले सतीवाण घेऊनी, आले स्त्रियांचे कुंकू पुसोनी, नंगी समशेर कमरेस लावुनी, :-

॥ सती पद्मिनी ॥

कटाव ३ ) बसले पालखींत तेव्हां जाऊनी, पालख्या चालल्या मंद गतीनी, भास
होईल आंत नाजुक कोणी, भास होतसे तेव्हां सकल मनीं, दोन पालख्या
त्यांत सुशोभित, पूर्ण मोकळ्या कोणी न आंत, अलंकारानीं पूर्ण वेष्टीत,
भंवती होता पूर्ण बंदोबस्त, झडूं लागली डंका नौबत, एकलिंगजी जय
गर्जत, चालल्या पालख्या खाली पर आंत, बसले राजपूत मिशापर्जत,
चितोड ध्वजही चाले फडकत, पाडून शाहा आला खूष मनांत, कैसा अल्ला
म्हणे डाव मी केला, मासा गळाला कसा आडकला, मांडे मनांमधीं खाऊं
लागला, कावा त्यांतला परी नाहीं उमगला, फांस तयाच्याच गळीं तो
बसला, सांगतो सार, धन्य ती पद्मिनी नार ॥

चा. क्र. १ ) सुरक्षीत होती गडावर, पद्मिनी धीर, सैन्य चौफेर, ठेवले पुढें तोंड
देण्या सामन्यास, पालखी आली पहा शाहाच्या डेऱ्यांस, हांसला गालीं
शाहा समयांस ॥

चा. क्र. २ ) मग दाऊनी उदार मन, बोलला भीमसिंगास ॥
पत्नीची अखेरची भेट, घे जाऊन आंतील अंगास ॥
बंधुनो लक्ष धा कवना, पोवाडा आतां रंगास ॥
येईल ठेवा विश्वास, लागेल अंग अंगास ॥

चा. क्र. ३ ) बेड्या काढून सिंह केला मोकळा पालखींत बसला ॥
मोकळा सिंह कधीं पुन्हां कुणा गवसला ॥
गेला गेला भीमसिंह राणा खास आतां गेला ॥
परी मूर्ख शाहा हा डाव नाहीं त्या कळला ॥

चा. क्र. रंगारी ८ ) पालखीत बसतांच राणा, भोयानीं जाणा, मागच्या मागें पालखीच
लोंबिवली, गरुडानं संधी खरी साधली, पिंजऱ्यातुनी भरारी मारली,
मासा निसटला तोडून जाळी, वाघानं गांठली आपली जाळीं, आतां
कधींतरी कोणत्या काळीं, यो घावल काय दादा ॥

चा. क्र. लगट ४ ) अर्धा तास मुदत भेटीची, संपली तरी सिंहाची, हालचाल दिसेना
पालखीतनं बाहेर पडण्याची ॥ तंवा संशय आला शहाला, करो जल्दीं
करो बोलला। आणि अर्धा तास असा गेला, तरी राणा भाईर नाहीं
आला। तिकडे राणा आर्धा गडावरती जाऊन पोंचला ॥ पालखीतनं
येईल कोठून, मग भान शाहा खवळून, करकरा दांत खाऊन, :—

॥ सती पद्मिनी ॥

जोरानं मुठी वळवून, खोलो खोलो पालखीम्हणं, तोंच आला अवार कसा सांगतो द्यावं ऐकून ॥ ५ ॥

॥ भाग ६ वा ॥

(चा. क्र. १) पालख्यांचे पडदे सुटले, बुरखे दूर झाले, शस्त्र चमकले। बायकांचे सारे पुरुष झाले, काळ्यांचे झाले तीक्ष्ण भाले। यवनांवर एकदम तुटून पडले ॥

(चा. क्र. ४ छारा) अवचीत असा हा घाला, पडतांच यवन हा वकला, कल्पना नाहीं कोणाला। पण, सवड कुठाय विचार करण्याला, फुरसत नाहीं तलवार घेण्याला, नाहीं अल्ला अल्ला म्हणण्याला, तोंच पडती खालीं धरणीला, हाणा मारा शब्द जाहला, कांटो कांटो शहा बोलला, पण तोही घाबरून गेला, या अल्ला! कैसी आई बला, काफरानें दगा असा दिला, तोबा तोबा दगा या अल्ला!, असा तिथें हाहाःकार आला, रगताचा पूर वाहीला, किती रजपूत आणि यवन तो रणांवर मेला ॥ इतक्यांत गडावरी जातानां पाहिली पालखी शहानं, ओरडला मोठ्या घाईनं, "अरे वो देखो हरामी भाग गया! चलो! दौडो! पकडो! यही बदमाष को गिरफदार करो।"

(चाल क्र. १) आतां कोण त्यांस धरणार, तूंच मरणार, विचार याचा कार, राजकारणी ती मुत्सद्दीनार, हातावर तुरी देऊन साचार, सोडविला आण पती साधार ॥

(चा. क्र. ८ दांगटी) तंवा यवन होऊन बेभान, गडावर जाण, चालले जलदीनं, आला परी मध्यंच मोठा अतिवार, दडून बसलेले वीर सरदार, पडले झणीं तुटून शत्रूवरी फार। गोऱ्यानें केला पराक्रम फार, लढतां लढतां आला रणांवरी ठार, तरी बाळ बादल शौर्य करणार, कुरुक्षेत्रीं अभिमन्यू लढणार, तसा इथं बादल शौर्य गाजणार, बाळपणी कोंवळा पकला आनिवार, त्यांतच आली जखम लागलागार, अंगातून चालली रक्ताची धार, पालखी तंवर पोंचली किल्ल्यावर खार, जाहला एकलिंगाचा जयजयकार ॥ ऐका ॥

(चा. क्र. १२ गिलच्याची) बादलास आजीच्या वीरांनीं उचलून गडावर नेला ॥
पाहून प्रकार हा सारा अल्लाऊद्दीन मनीं समजला ॥
पळून जाण्याखेरीज मार्ग आतां नाहीं आपणां उरला ॥
काय करील त्या वीरसिंहापुढें भ्याड यवन तो कोल्हा ॥ :—

॥ अशी पद्मिनी ॥

बायकांचा पोषाख पाघरून, निसटला गुप्त मार्गानं नीच तो जाण ॥

चा. क्रं. १) पद्मिनिच्या चातुर्याची, कमाल धैर्याची, अतुल शौर्याची, अशी नाहीं नार पुढतीं होणार। पुरुषावरी खास मात करणार, शाहीर दीक्षित चरीत्र गाणार ॥ ५ ॥

॥ भाग ७ वा ॥

चा. क्रं. ५ कटाव - २ दुखविला काळसर्प जहरी तो भुजंग, शहा अल्लाउद्दीन जंग, म्हणे करीन दुभंग, गड चितोडच्या संग, विश्वासघातकी भिमसींग, जोरानं टाकी फुत्कार, फुत्कार हो, केली सेना पुन्हां गोळाकार ॥
चितोडगड लढवीन झुंजून झुंजून, म्हणे राणाही गर्जून, क्षात्रधर्म आचरून, रणीं आहुती देऊन, स्वातंत्र्य मुगुट रक्षिन, रक्षिन हो, वंशाची कीर्ती वाढवीन ॥
हिंमतीनं लढविला किल्ला त्यानं थोर, करून शत्रूचा संहार, सहा महिने जोरदार, झाले किती वीर ठार, एकामागुन पुत्र ते आकरा, झाले ठार विचार हा करा ॥

चा. क्रं. १) परी नाहीं वीर तो डरला, शोके विरघळला, गलित धैर्य झाला, परी पद्मिनी बोले नाथा रा, राहिला आतां एक पुत्र वंशास, करावें रक्षण त्याचे समयास ॥

चा. क्रं. २) इतक्यांत आठ वर्षांचा, वीर पुत्र अरीसिंहाचा ॥
तोच आधार स्वातंत्र्याचा, राणा हमीर बाळ तो साचा ॥ (सिंहाचा नातू)
माथ्यावरी मुगुट घालोनी, आला खरा मेरू धैर्याचा ॥
अजयसिंह पुत्र राण्याचा, बारावा अंश वंशाचा ॥ (पुत्र)

चा. क्रं. ३) म्हणे बाबा निरोप द्या मला जावया रणीं ॥
पाडुं शत्रुचा फडशा जाऊनी अणीं ॥
गहिंवरून बोलली तदां माय पद्मिनीं ॥
तूं आणि हमीर बाळ उरला वंशाला धनी ॥
जंगलांत बाळांसह जाई आतां याक्षणीं ॥
साम्राज्य रक्षण्यां तुम्हांविणें नच कोणीं ॥ :–

॥ सतीपद्मीनी ॥

भिल्ल कोळ्यांसह तुम्ही जाणे गुप्त मार्गानीं ॥
बोलला काय अजयसिंह बोल द्या ध्यानीं ॥

चा. क्र. १४ पाळण्याची)
काशी बोलसी गे शब्द भ्याड हे माते । जाऊंदे समरीं आम्हांते ॥
तें देवीचे शब्द विसरलीस काय? । रणीं तेरा बळीं घ्यायाचे ॥
मज्जीय बंधू अकरा रणीं गे मेले! । कमी दोन, तें आम्हां दोघांचे ॥

॥ देऊनी बळी देवीला ॥
॥ सुरक्षितें निघता पित्याला ॥
॥ प्राणाची क्षिती न आम्हांला ॥

तुम्हीं रक्षावें ब्रीद राजपूतांचे, त्यापरीं चितोड ध्वजाचें ॥ १ ॥

चा. क्र. ४ लगट) ऐकून वीर वचनाला, हमीर हो उभा राहीला, तलवार घेऊन हाताला, बाळ आठ वर्षाचा आला, बोबडे बोल बोलू लागला, "आदेश द्या उदे मला, थाल कलीज दाडीवाल्याला, दाखवतो बाळ सोडा मला, बाबाकडे धाडतो त्याला, द्या निरोप मला जायाला, गडावरून भीमसिंह तेव्हां काय बोलला" ॥ बाळ! तूच योग्य असे रे जगण्याला, स्वातंत्र्यध्वज राखण्याला, हा देह वृद्ध आतां झाला, हाच बळी योग्य देविला, जा! काकासंगें तूं निघून घोर जंगलाला ॥ अहा! धन्य धन्य तो बाळ, जणुं काय श्रीमें घननीळ, देवकीचा कृष्ण सोज्वळ, दाशरथी श्रीराम केवळ, वनीं गेला घोर अज्ञात कडव्या काळ ॥ शत्रूंचा जोर खूप झाला, रजपूत हार बहु झाला, भीमसिंह म्हणे त्यावेळां, आतां घेऊं दे शत्रू किल्याला, पण, बायकांची व्यवस्था काय सांग सख्ये मजला ॥

चा. क्र. ३)
पद्मिनी म्हणे आतां करूं आम्हीं जोहार ॥
किती सती गेल्या आधींच स्त्रियां खरोखर ॥
तशा होऊं आम्हीही खास याजगीं अमर ॥

चा. क्र. १) जोहार म्हणजे नरी जाण, आगीतो मोहरा!, मरणातो, होण, जणूं अग्नीच्या झळया भासफार, धन्य त्या पतिव्रता साचार, भगिनीनों पहा यांचा आचार ॥ ७ ॥

|| सती पद्मिनी ||

|| भाग ८ वा ||

चा. क्र. ५) थकुनिया उपाय होतांच शत्रूचा जोर, भाग पडतें शरण जाणें जो शत्रूचा हार, चीजवस्त सारी आगींत करुन जोहार, पातीव्रत्य करणें रक्षण, स्त्रियांनीं जाण, करुनी जोहार ॥

होतांच आज्ञा पेटवले आगीचे कुंड, गगनांत धडकल्या ज्वाळा अती प्रचंड, स्वर्गांत पाहती वीरांगना किती चंडमुंड, आपुल्या स्त्रियांचे धैर्य, पातीव्रत्य शौर्य, कीर्ती अखंड ॥

चा. क्र. १) जडजवाहीर आगींत, ज्वाळा आगीत, सारी चीजवस्त, रडारड गोंधळ एकच हाहाःकार, आक्रोश कानठळ्या बसणार, प्रभूची इच्छा कुणा कळणार ॥

करुनिया स्त्रियांनीं पराक्रम, अथवा लहान, केली बलीदान, झाली शांत त्यांची राख, जडजवाहीर जाहले खाक, स्वर्गामध्यें पडला धमाला धाक ॥

चा. क्र. २)
जय एकलिंगजी हरी, स्वर्गांत आरोळी गेली ॥
उठला डोळे चोळीत, भगवान विष्णू तवेळीं ॥
पाहून मृत्यू लोकींची, स्वातंत्र्यासाठींची होळी ॥
लक्ष्मीस हाक मारोनी, जोराने वाजवी टाळी ॥

चा. क्र. ३)
म्हणे खालीं पहा करा अग्नी प्रलय चालला ॥
पाहतां, लक्ष्मीच्या पाणी आलें नेत्राला ॥
काय हसतां देवा कसें स्वस्थ बैसला ॥
त्या स्त्रियांना जळून मरणार वाटतें मजला ॥
वांचवा त्यांना संहार थांबवा असला ॥
ऐकतां शब्द जगदंबा हांसली त्यावेळीं ॥
जाऊ बाई, नका रडूं घाबऱ्या यज्ञ सुरु झाला ॥

चा. क्र. ४) स्वातंत्र्याचा पाया घालण्याला, अन् राष्ट्रध्वजा रक्षणाला, देशाची समय लावली, रक्ताचे तेल समयीला, मांसाच्या कापूस वातीला, आत्म्याची राख वातीला, ज्ञानाची ज्योत हवी त्याला, पातिव्रत्य प्रकाश ज्योतीला, धैर्याची काडी हवी त्याला, :-

नातरी व्यर्थ बोलबाला, इतिहास आजपर्यंतचा आगा ध्याजाला ॥
भगिनींनो विचार तुम्हीं करा, पावित्र्य भ्रष्ट ना करा, सतीधर्म पूर्ण आचरा, इतिहास पूर्वींचा स्मरा, पातीव्रत्यें आपुल्या राष्ट्राचा उध्दार करा ॥

(चा. क्र. १) त्या अर्भकांच्या मारून, स्त्रियांनीही जाण, पदर खोचून, जमल्या त्या कुंडाभोंवतीं सत्वर, एक कीं दोन एका पंधरा हजार, घ्याया उडी अग्नींत करण्या जोहार ॥

(चा. क्र. ४ कटाव ४) पोषाख केशरीं चढवून, रजपूत शस्त्रें परजून, यज्ञाचे करती रक्षण, पाहती सर्व नेमाजं, देवही पाहती स्वर्गांतून, आले दिव्य विमान घेऊन, पुष्पवृष्टीं करती यांतून, सर्व स्त्रिया तयार होऊन, जय एकलिंग गर्जून, "उड्या टाकणार तोंच! थांबा थांबा!" असा आवाज आला कोठून, पत्नी अरीसिंहाची जाण, आली हमीरमाता धांवून, घोड्यावरतीं स्वार होऊन, तलवार नंगी उपसून, उभी राहून बोलली वीराजं तेव्हां गर्जून ॥
"काय इतक्या पंधरा हजार स्त्रिया तुम्हीं जळून मरणार? सांगा! बोला?

(चाल नजरहिंदराष्ट्र-) रजपूत म्हणवितांना, स्पष्ट बोला ॥ धृ० ॥
पतिव्रता तुम्ही वीरमाता, अशापरी कां जळून मरतां, तलवार हातीं कांनच घेतां, शूर म्हणवितांना, स्पष्ट बोला ॥ १ ॥
रणीं मरा ना लढतां लढतां, दाढीवाल्यांना कां डरतां, जोहारांतून काय साधतां, शोभितें का राजपूतांना, स्पष्ट बोला ॥ २ ॥

(चा. क्र. ५ कटाव- ५) ऐकून आली गडबड, सर्वेही उघड, म्हणती बिनतोड, काय अवघड, युध्द आम्हां करणें, अहो करणें, पतीसंगें लढतां लढतां प्राणही देणें ॥
यापरतें भाग्य तें काय, सौख्य अधिक, व्यर्थ असें हाय, जळुनीया मरणें, अहो मरणें, सासूबाईची आज्ञा मान्य आम्हांसी जाणें ॥

(चा. क्र. ४ कटाव) रजपूत धर्म आचरूं, पावित्र्य भ्रष्ट ना करूं, समरांत मृत्यूसी वरूं, हे माय चरणीं हाय शपथ करूं ॥ परी शांत सती पद्मिनी, धैर्याची मेरूमणी, शांततेचा सागर मुनी, बोलली काय यावेळीं :-

॥ सती पद्मिनी ॥

तुमचे शौर्य जाणते मजीं, आहे विश्वास, चाल प्राण रणीं, अंतांचीही
विटंबना करील शत्रू द्या ध्यानीं ॥ पावित्र्य कसें राहील, श्रेष्ठता
तरी होईल, करा जोहार, देव विमानांतुन स्वर्गीं नेईल ॥
मग बोलली आपल्या सुनेला, तू धन्य धन्य सती धन्य होसी भारताला ॥

चा. श्रा. १४ लढण्याची) तूं ऐक सखे माझे शूर सूनबाई, लढण्यास उरत आम्ही नाहीं ॥
एकामागून तें अनेक पुत्र मम गेले, परी अश्रू ढाळला नाहीं ॥
जिनं देऊनिया बळी आमित रोयीर, केला मुक्त मायपती पाहीं ॥

चाल) ॥ लढण्यास काय ती रयाची ॥ शत्रूनें काय स्पर्शावी ॥
॥ ही काया श्रेष्ठ कां व्हावी ॥ श्रीदास डाग नच लावी ॥

चा. श्रा. १४) अशीं घेऊनिया तूं ही शस्त्र संन्यास, या चितेमधें सती जाई ॥

चा. श्रा. ४ छट) सासूचे बोल तें असले, शूर स्त्रीस मुकीं न रुचले, तलवार
फिरवीत गेली निघून तें वेळे ॥ पद्मिनीजें आज्ञा ती दिली, एकलिंग
गर्जना झाली, धडधडा चिता भडकली, सर्वांनीं उडी घेतली,
देवांनीं पुष्पवृष्टी केली, विमानांत बसवून त्यावेळीं, साऱ्या
सतीसह पद्मीनी स्वर्गाला गेली ॥

चा. श्रा. १) भीमसिंह म्हणे आतां चला, समरांगणाला, घेऊं दे शत्रूला,
दगड मातीचा चितोड किल्ला, करूंया अखेरचा हल्ला,
उडवूंया पठाणांचा धुव्वा ॥ ८ ॥

---

॥ भाग ९ वा ॥

चाल क्रा. ३/१) केशरी पोषाख चढवून आले रजपूत तय्यार, करून स्त्रियांचा जोहार,
घेऊन नंगी तलवार, राणा भीमसिंह स्वार, संगें सून तयाची प्यार,
किल्ल्याचे दार उघडून, उघडून हो, तुटून पडला शत्रूवरी जाण ॥
कापाकापी छाटाछाटी झाली आनिवार, करती अंबेचा जयकार,
करती शत्रूचा संहार, जय एकलिंग गर्जून, गर्जून हो, परी
सारे ठार आले जाण ॥
लक्ष्मणसिंह सुद्धां आला रणीं ठार, तरी सून ती लढणार, परी
तुटल्यावर औजार, आली अमो आनिवार, आधींच नाजूक सुकुमार,
त्यादिवशींच घोडा उडवून, उडवून हो, केला विचार तिनं झटकन ॥

॥ सती पद्मिनी ॥

(चा. क्रं. १) एक भला मोठा खंदक, पाडून बिनधोक, टाकली फेंक, घेउयासह गुप्त जाहली नार, धरणी मातेचा घेई आधार, एका नवारचा हा हीं जोहार ॥

(चा. क्रं. २)
घेतला किल्ला उमूजं । घुसविली आंत ती सेना ॥
अल्लाउद्दीन पाहे महालांत, पद्मिनी कुठें दिसेना ॥
सुंदरीचा नाहीं तोडा । सारे राख, दगड माती, चुना ॥
म्हणे हाय, कैसी गई वो, असमान परी ती जाणा ॥
तिच्यासाठीं किती सेनेचा केला संहार ॥
परी कुठें जाहली गुप्त ती नार सुंदर ॥
काय करूं हा ढीग राखेचा घेऊनी थोर ॥

(चा. क्रं. ४ छाट) सौभाग्यावांचुनी सती, जशीं चंद्राविण रात्र ती, प्राणावांचून कुडी व्यर्थ ती, तशी झाली गत भावती, झाला वेडा म्हणे पद्मिनी पाहिजे एक ती ॥ त्या वेडाच्या झटक्यांत, त्या संतापाच्या लहरींत, महालाच्या भिंती पाडीत, मोडतोड करी किल्ल्यांत, काढी तो वड्याचे तेल वांग्यावर रवाचीत ॥

(चा. क्रं. ३)
भागवी दुधाची तहान ताकावरतं ॥
दिल्लीस करी प्रयाण मोठ्या वेगांत ॥

(चा. क्रं. ३४ प्रियपुत्राचे) पुत्र माणखी प्राणपतीसह स्वर्गी सती पद्मिनी, अमर हो इंद्र लोकीं पाहुणी ॥
सर्व स्त्रियां या पतीसह आनंदाने सिंहासनी, भोगिती सौख्य अढळ राहुनी ॥
अजयसिंह आज बाळ हमीरा आशीर्वच देऊनी, कौतुकें पाहीं तया पद्मिनी ॥

(चाल) ॥ तोच जाणा प्रख्यात राणा वीर हमीर ॥ हमीर ॥ ज्यानें चितोडगड केला पुन्हा शौर्यानें सर ॥ तो सर ॥ जाहला जीभुवनीं खराची अजरामर ॥ तो वीर ॥
(चाल ३४ प्रियपुत्राचे) धन्य भीमसिंह धन्य पद्मिनी स्वातंत्र्यास्तव हे रणीं, अर्पुनी प्राण अमर हो जनीं ॥
(चा. क्रं. १) पतिव्रता चरणीं हो गुंग, सदोदित दंग, बाजवी शिंग, स्वातंत्र्याचे शाहीर दीक्षित खास, वंदुनी पूज्य सती चरणांस, शिरीं म्हणे ठेवा वरदहस्तास ॥
सौंदूर राज्यशाहीर, देवास सिनीयर, दरबार शाहीर, दीक्षित मी सांगली शहरीं रहिवास, कृष्णातीरीं लिहिले काव्य अनुप्रास, वीर कवनाचा एक तो ध्यास ॥ २ ॥ पुनर्लेखन दि. ३/१०/८३

१२।१२।४१ सदाशिवपेठ पुणें २. क्रांतीशाहीर रघुवीर दीक्षित
सिंचतीकर

॥ सद्गुरु जयरामस्वामी महाराज की जय ॥ मु. सांगली
दि. १।१०।८२

॥पोवाडा:- राजकुमार प्रतापसिंहराजे पटवर्धन सं. सांगली ॥

(कवी :- देवासदरबार व सौंदूर राज्य शाहीर ग. द. दीक्षित चिंचणीकर.)

॥ भाग १ ला ॥

ति. प्र. १) जसा कृष्ण सोडून द्वारका, गोप गोपिका, त्यापरीच लोका, शस्त्रधारी ब्राह्मण प्रतापी वीर, राजकुमार प्रतापसिंह धीर, अमर झाला रणी आपुली शीर ॥ धृ० ॥

आला बालरवी माध्यान्हीं, पूर्ण यौवनीं, प्रखर तेजानीं, दिपवीले अखिल भरत खंडा, तोच काळाचा बसला दंडा, स्वर्गी गेला वीरपुत्र गुंडा ॥

पा. प्र. २) परशुराम भाऊसारखा पटवर्धन वीर, गोविंदराव, गोपाळराव हे बंधू पराक्रमी धीर, चिंतामणराव आप्पासाहेब सांगलीकर, त्याच वंशी जन्मला प्रताप, रवी प्रताप, होई तो अमर ॥

महिन्यांत मार्गशीर्ष मोहिना उत्तम खास, शुध्द प्रतिपदेस सांगलीस अवतरत जाण, शके अठराशे अडतीस शालीवाहन, श्रीमंत राजे चिंतामण, आज विद्यमान, यांचे पोटीं जाण ॥

चौ. प्र. १) महाराणी देवी सरस्वती, खरी सरस्वती, प्रसन्न लक्ष्मी ती, संयोग हा भूपती पटवर्धनास, केले उज्वल जोडी धराण्यास, लाभली अशी राणी भजेला खास ॥

तिच्या पोटीं जन्मला बाळ, जसा धनजीक, कृष्ण सोज्वळ, सव्वीस नोव्हेंबर तारीख सोळा, नऊ वाजून चोवीस मिनिटांला, (प्रात:कालीं) सकाळीं प्रताप जन्मा आला ॥

चौ. प्र. २)
बारशाचा करुनी थाट, नांव ठेविले पांडुरंग ॥
परी बाळासाहेब म्हणती, बाळ प्रतापीं होता दंग ॥
पाळण्यांतच दिसले पाय, म्हणुनी वदती प्रतापसिंह ॥
तेंच नांव आजही प्रसिद्ध, जाहले विदित सकळांस ॥

चौ. प्र. ३)
शुक्लपक्षीं चंद्रापरी वाढे बाळ दीसदीस ॥
वडील बंधू युवराजांच्यासंगें माळ बंगल्यास ॥
तोषवी बाल लीलांनीं माता- पितयांस ॥
रामलक्ष्मणापरी जोडी भासे सर्वांस ॥
जन म्हणती प्रताप राखील आपल्या नांवास ॥

॥ राजकुमार प्रतापसिंह ॥

चा.क्र. दांडी ८) नऊ तारीख चोवीस सालाची, एप्रील महिन्याची, मुंज बाळाची,
होऊन आला ब्राम्हण शस्त्रधारी, शास्त्राची थोर रीत न्यारी, मुंजीविना
ब्राम्हण नसे जिवधारी, शस्त्र गेले रीत उरलीया खरी, कांप जाऊन सोवें
राहिली जरी, प्रताप मात्र शस्त्र धारण करीं, गा ऐका तुम्ही दादा ॥
चा.क्र. कटाव-४) सुरुं झाला विद्याभ्यास, लई हुशार प्रताप हरवास, प्रल्हादापरी
समयास, परिक्षेत पास हरवार, मर्दानी खेळांची आवड होती
वीरास ॥ लाठीं, काठीं, कुस्ती दांडपट्टा, फिरवितो सांगलीचा पठ्ठा,
जमवुनी मित्र एकठ्ठा, भाला, बंदूक, निशाणबाजी अचूक प्रसिद्ध मोठा ॥
संपवून येथील शिक्षणास, एकोणीसशें अठ्ठावीस सालांस, गेला
पुढील उच्च शिक्षणास, डेहराडून मिलिटरी कॉलेजास, दाखवी
प्रताप तिथं नांवापरी सर्वांस ॥
चा.क्र. ९) त्यांतही संपादून यश, अधीक शिक्षणास, होण्या आय, सी, एस, ।
धरियला मार्ग विलायतेचा, आक्सफर्डला गेला बाळ साचा,
प्रसंग पुढें येईल युद्धाचा ॥ १ ॥

---

॥ भाग २ रा ॥

चा.क्र. ६ कटाव-१) किती जरी घेतले असें बौध्दीक तें ज्ञान, परी नाहीं समाधान, चित्तीं
खळबळ महान, बाळ प्रतापाला जाण, खरा ब्राम्हण कसा मी होऊं,
मी होऊं, हो आणि प्रताप जगाला दाऊं ॥
विचार करुन बोले बाळ मातापितयांस, जातो यांत्रीक शिक्षणास,
नव्या युगांत या काळास, लाठी काठीचा काळ संपला, संपला हो,
यंत्राचा सुकाळ जाहला ॥
जन्मा आलो आई मी गं वीर घराण्यांत, श्रेष्ठ पटवर्धन वंशात,
किती वीर आले यांत, त्यांचे नांव कोण राखील, राखील ग,
तें कसें जुना होतील ॥
चा.क्र. २) तीही खरी वीराचीच माता, विचार केला चिंता, धाडी तत्वता,
बाळ वैमानीक शिक्षण घेण्यास, गेला सँढर्स्टला एकतीस सालांस,
संपवून कोर्स आला चौतीस सालांस ॥ :-

॥ राजकुमार प्रतापसिंह ॥

जाहला पूर्ण निष्णात, विमानशास्त्रांत, निर्भय अंतरात, संधीचीवाट पहात बसला। गेला मग पुन्हां विलायतेला, एकोणीसशें एकूणचाळीसालों ॥

चा. क्रा. २)
एकूणचाळीससालीं मोठा । पेटला युध्दाचा वणवा ॥
हिटलरनें लाविली आग । इंग्रजांचा साधुनी दावा ॥
मुसोलिनीस घेऊनी साथ । दाविला जर्मनी कावा ॥
हळूहळू सर्व युरोपखंड । त्यानें घशांत घातला पहावा ॥

चा. क्रा. ३)
परी एक शत्रू बलवान धूर्त इंग्रज ॥
कोल्ह्यासारखी इंग्रजांची जात मोठी कावेबाज ॥
मुंगळ्यासारखी चिकट जात त्या साज ॥
लढतात लढा तें युक्तीनें अजूनीजें आज ॥
ऊभा राही दंड ठोकून ब्रिटिश सामन्यास ॥
परी हिंदी वीरावर भिस्त तयांची खास ॥
याचे कारण सन एकोणीसशें चौदा सालास ॥
हिंदी वीरांनीच दिलें मिळवूनिया यश त्यास ॥
बोलावणें आलें त्यावेळीं प्रतापसिंहास ॥

चा. क्रा. ४ कटाव)
प्रतापसिंह तुम्हीं म्हणवितां, दावापराक्रम तुम्हीं आतां, नांवाची करा सार्थता, संकटीं साह्य घ्या जाणून राजनिष्ठता ॥ आधींच प्रतापसिंह धीट, संधीची पहात होता वाट। तोंच संदेश येतां झट, झाला तयार बिनबोभाट, आनंद दाटे हृदयांत, झाला तयार उडी घेण्यास घोर संग्रामास ॥ घेऊन किंग्ज कमीशन, एकोणचाळीस सालीं तो जाण, झाला सिध्द कराया घोर युध्द दारुण ॥ पितयाचे घेऊन दर्शन, मातेस करण्या वंदन, गेला तो माय धांऊन, धरी पोटीं कवटाळून, आला तिचा कंठ दाटून, परी सारें दुःख आवरुन, बोलली प्रतापसिंहाला काय गहिंवरुन ॥

( चाल :- बाळ जातो दूरदेशीं )

बघ जाशी बाळा घ्याया उडी रणकुंडामाजी, पण माया वेडी माझी ॥१॥
चित्तीं होई खळबळ बाळा कधीं पुन्हां येशी। सुखविशील या जनांसी ॥

॥ राजकुमार प्रतापसिंह ॥

डोळां ऊजवा लवे बाळा अवरावून हेमजसी, सांग निरोप देऊं कशी ॥ ३ ॥
बोले बाळ आई वीरमाता म्हणवुनी घेशी। मग वृत्ती होई कां अशी ॥ ४ ॥
पंख गरुड फडफडवुनी मारीन जर्मन काव्यासी, घेऊन येईन विजयासी ॥ ५ ॥
नको चिंता करूं माया तुझी सदैव आम्हांसी, पांघरूण ही स्वर्गासी ॥ ६ ॥
माय बोले बाळा पदराश्रूं पुसून टाकिले, जाई जाई निघून यावेळे ॥ ७ ॥
देई खबर वेळोवेळीं नको भमवूं कायेसी, ये घेऊन विजयासी ॥ ८ ॥
मारी भरारी ती बाळ उंच रेंघार आकाशीं। परी तिचे चित्त पिलापाशीं ॥ ९ ॥
तरी मार्गी दृष्टी रातंदीन तुरुयावरी लावून। विरह काळासी कंठीन ॥ १० ॥
चा.क्र. १ ) मातेचे थांबता स्फुंदन, करुनी वंदन, हिंदनंदन, मद्रासला
गेला क्षात्र कार्यास, दावीन म्हणे जानव्याच्या शौर्यास,
हिंद वीराच्या अतुल धैर्यास ॥ २ ॥

॥ भाग ३ रा ॥

चा.क्र. ५ कटाव - ७ ) आकाशांत घारीवाणी फिरवी तो विमान, बॉम्ब टाकी दणादाण,
नाहीं भूक आणी तहान, एक युध्दाचेच ध्यान, निर्भयपणें मद्रासला,
मद्रासला हो, पायलट ऑफिसर झाला ॥
राजनिष्ठा ध्येयनिष्ठा वीराची पाहून, मनी खूष ते होऊन, ब्रिटिश
सरकार जाणून, विश्वास पूर्ण टाकिती, टाकिती हो, वीराचे कौतुक
करीती ॥
नित्य क्रम त्याचा जावें घेऊन विमान, चालीत जोराने थैमान, टेहळणी
करण्याचा मान, अल्पावधीत त्याने मिळविला, मिळविला हो,
नांवापरी प्रताप दाऊं लागला ॥
चा.क्र. १ ) एकोणीसशें बेचाळीसास, ऑगस्ट महिन्यास, बावीस तारखेस,
१९४२ 22
हिंदी महासागरीं टेहळणीं करण्यास, शत्रूचा अंदाज काढून घेण्यास,
गेला धैर्यानं प्रताप समयास ॥
योग्य ती टेहळणी करून, गनिमी काव्यानं, माहिती मिळवून,
परतला विमान तळीं येण्यास, होणार जाणार काळ लेकाच्या त्यास,
साधलापरी दावा देवानं खास ॥ :—

॥ राजकुमार प्रतापसिंह ॥

चा. प्र. २ ) फिरवीत विमान गरगरा । पोचला मद्रासला परत ॥
विमानाचे नांव ॲटलांटा । सारे बॉम्ब भरले होते आंत ॥
से थॉमस मॉउंट विमानतळ । दिसता उतरूं लागला खालते ॥
परी पडला दैवाचा घाला । अचानकच जाहला स्फोट ॥

चा. प्र. ३ ) धुम धडाड धाड आला आवाज विमान पेटले ॥
विमानांतील सारे बॉम्ब धडाधड फुटले ॥
मृत्यूचे स्पष्ट आव्हान त्यानं पाहिलें ॥
परी वीर बाळाचे धैर्य नाहीं कमी जाहले ॥
हातातले यंत्र वीरानें नाहीं सोडीलें ॥
आले खाल विमान तें धरणीवर कोसळलें ॥
छिन्नविछिन्न होऊनी बाळ मृत्युमुखीं पडलें ॥
स्वर्गावरी स्वारी करून अमर तें झाले ॥

चा. प्र. ५ ) मावळला रवी सांगलीचा किरण लोपला, माध्यान्हीं येतां केतूनं ग्रासलं त्याला। कशी दया आली नाहीं श्रीगणराया तुला। अपघात झाला विमानाचा प्रतापसिंहाला, परिणाम तयाचा सर्व प्रजेवर आला ॥

चा. प्र. ४ (उगट) ) तो आत्मा निघाला तेथून, थोडा वेळ तिथंच घुटमळून, एकदम निघाला वेगानं, निश्चय मनाचा ठरवून, वडीलबंधूचे प्रेम जाणून, राज्यभोग मिळावा म्हणून, बंधूंच्या उदरीं घेणं जन्म एकच साधन ॥ केला प्रवेश युवराज्ञी पद्मिनी पोटीं जाण ॥
दोन दिवसांनीच प्रगटला, सवाई प्रताप जन्मा आला, बावीस तारीख प्रतापसिंह गेला, चोवीस तारखेस पुनर्जन्म झाला, ही सारी प्रभूची लीला, "राजेसाहेब" कां करता व्यर्थ शोकाला, गणराय प्रसन्न आपणाला, म्हणूनीच योग हा असा घडूनिया आला ॥

चा. प्र. १ ) युवराज्ञी अखंड सौभाग्यवती, पद्मिनी सती, होता प्रसुती, सवाई प्रतापसिंह जन्मा आला, आनंदी आनंद साऱ्या प्रजेला, जन्मोत्सव शहरांत सुरु जाहला ॥

चा. प्र. ६ कराव — ३ ) तोफांची ती सलामी जाहली, साखर हत्तीवरून वाटली, गुढ्या तोरणें पडूं लागली, डंका नौबत झडूं लागली । :—

॥ राजकुमार प्रतापसिंह ॥

थुई थुई कर्णे शिंगे वाजली, वार्ता ही सर्वत्र पसरली, दिपवाळीजणूं काय ही आली, श्रीमंत स्वारी खुषीत आली, दान धर्माची आज्ञा केली, बंदीवानांची मुक्तता झाली, शिक्षा कुणाची कमी जाहली, गणरायाची प्रार्थना केली, अभिषेकाची गर्दी झाली, प्रसंग आनंदाचा, लोटला पूर सौख्याचा ॥

(चा. क्र. १) लोटला सौख्याचा पूर, परी आला मोरं, दु:ख डोंगर, सौख्यामागें दु:ख उभेंच असणार, प्रकाशामागेंच असतो अंधार, सृष्टीचें रहाटगाडगें फिरणार ॥ ३ ॥

---

॥ भाग ४ था ॥

(चा. क्र. ७ ओवीका — १)
पुत्र जन्मोत्सव सुरुं जाहला भरवुनी तेव्हां दरबार ।
मानकरी, अधिकारीही जमले थाटामध्यें खरोखर ॥
तोंच खलीता आला महाराज प्रतापसिंह जाहले ठार ।
अशी ही दुष्ट बातमी त्यांच्या कुणी घालावी कानांवर ॥
काय करावें कसें सांगावें आम्हीं महाराज सरकार ।
काळाची ही करणी सारीं व्यर्थची आपण पामर ॥
प्रतापसिंह ते स्वर्गीं गेले अपघाताची दिली खबर ।
ऐकून वार्ता मूर्च्छित पडले भरला दु:खानें दरबार ॥

(चा. क्र. १ अ) एका क्षणांत उलटलें सारें, आनंदाचे वारे, न. दु:ख फवारे, पसरली वार्ता साऱ्या जगांत, प्रजाजन करिती हायहाय, रडती धाय धाय, कसा गणराय, म्हणती घात केला ॥

(चा. क्र. २)
जंवा कळली खबर माईला, चित्ताला धक्का बसला ॥
फोडिला तिनें हंबरडा, अन् बेशुध्द पडली धरणीला ॥
जणूं वीज अंगावर पडली, आगीचा वणवा पेटला ॥
उसळला दु:खसागर, हाहा:कार उडाला सारा ॥

(चा. क्र. ३)
म्हणे देवा मला गाईला कां रें गांजीलें ॥
माझें तान्हें वासरुं कां तुवा हिरावून नेलें ॥
करायाचें कृत्य हें देवा कसें गा केलें ॥ :—

॥ राजकुमार प्रतापसिंह ॥

चा. क्र. ४ लावणी) पूजेसी जावे देऊळांत, तोंच देऊळ पडावे अकस्मात, छायेसाठीं वृक्षाखालतें,
तो वृक्ष पडावा डोक्यांत, तरी देवा केली ही मात, हाय हाय, जाहला आज
सुखाचा अंत ॥

चा. क्र. ७ भेदीक-२) ती माय करी रुदन, धाय मोकलून, साहवेना मी जाहले दीन ॥ राजा ॥
सारीं दुःखें सहन होतात, परी जगतांत, पुत्रशोक कठीण अत्यंत ॥ राजा ॥

चा. क्र. ४ लावणी) गेला कृष्ण सोडून देवकीला, अभिमन्यू जरा सुभद्रेला, रोहिदास तारामतीला,
बाळ चिलया जरा चांगुणेला, पेशवे विश्वास, माधव, नारायण गोपिकाबाईला ॥
चा. क्र. १२ गौळणीची) तसा पुत्रशोक माझ्या नशिबीं श्रीगणरायें दिला ॥
कवी दीक्षित शाहीर म्हणे सांगलीचा हिरा हरपला ॥

चा. क्र. १४ पाळण्याची) ती माय तदा विकल पुत्रशोकानें, रगताचे अश्रू गाळी ॥
जाहले पहा नष्ट तेज नेत्रांचे, सुकुमार तनू ती सुकली ॥
मम प्रिय बाळा प्रताप माझ्या प्राणा, कां गेलासी या काळीं ॥
चाल) ॥ आम्हांसी ठेऊनी खालीं ॥ त्वा स्वर्गी स्वारी केली ॥
॥ ही रीत उलटी वा आली ॥

चाल १४) या वृद्धांची काठी तू आमुची बाळा, लाडक्या सगुण वेल्हाळा ॥ १ ॥
मांसाहेब आम्हीं कसें तुम्हां सांगावे, परी सांगतो प्रजेचे बोल ॥
जाणुनी घ्या ही माया गणरायाची, घ्या दृष्टीं अंतरी खोल ॥
आणि आवरोनी पुत्रशोक हा वन्ही, ऐकावा प्रतापी बोल ॥
चाल) ॥ तव प्रताप अमर हो जाहला ॥ नातवाच्या रूपें जन्मला ॥
॥ सुखवाया आम्हां रयतेला ॥
चाल १४) मधुबोल आतां त्याचे ऐकण्यासाठीं, चित्तांत धरावी शांती ॥ २ ॥
चा. क्र. १) धन्य हो धन्य ती माय, पिता ही होय, पुत्र भीमकाय, प्रसवली, प्रतापसिंह
कीं जय, राणी सरस्वती देवी कीं जय, बोला चिंतामणराव महाराज कीं जय ॥
जिला पहातां अक्कल गुंगली, वस्ती चांगली, राज्य सांगली, वाहते जिथें
कृष्णाबाई, परवर्धन सुयश नित्य गाई, आखिल जीवांसी मुक्ती देई ॥
शाहीर देवास दरबार, राज्य सोडून, मानकरी थोर, सांगली शहरीं सतत
करी वास, तलवार पगडीचा मान देवास, जरीपट्टा कट्यार भूषवी त्यांस ॥ ३ ॥

॥ क्रांतीशाहीर रघुवीर दीक्षित दि. ३१।१०।८३ पुणें ॥

॥ श्री दत्त प्रसन्न ॥

॥ पोवाडा - शिव रहस्य ॥ स. ज. स्वा. म. की जय (॥ रेकॉर्ड कॉपी ) ॥

॥ कवी :- देवास दरबार व खोंडूर राज्य शाहीर जी. डी. दीक्षित चिंचणीकर ॥

॥ भाग १ ला ॥

तो धन्य धन्य शिवराय, जया पाठीं उभी राही सदा भवानी माय ॥ धृ० ॥

चा. क्र. ८ ) महाराष्ट्रांत मुसलमान आले उत्तरेकडून, केला धर्म विच्छेद देव देवळे पाडून, अळकं लागल्यासारख्या, हिंदूंची शेंडी जाऊन, जिकडे तिकडे हाहाःकार झाला, यवन मातला, दैत्य तो जाण ॥

चा. क्र. १ ) परी अपराधे पुरे शीर, पाप पुरेपूर, होण्या खरोखर, ब्रम्हदेवे दैत्य मृत्युलोकांस, धाडिले एकापरिस एक खास, ऐकावा याचा सत्य इतिहास ॥

चा. क्र. २ ) कृष्ण दर्शनें पुनीत झालेला, तो दैत्य कालयवन ॥
म्हणे देवा पराभव माझा, जरी केलास मोठ्या युक्तीनं ॥
राहिली एक परी आस, करण्यासी तुजशीं हात दोन ॥
विष्णू म्हणतो पुढील अवतारीं, तव आस करीन तो पूर्ण ॥

चा. क्र. ३ ) इंद्रजीत जहांगीर, कालयवन शहाजहान ॥ रावण औरंगजेब, कुंभकर्ण अफजुलखान ॥ वाली वाजर मीर जुमल्याच्या आले रूपानं ॥

चा. क्र. ४ ) धर्माचा धुळ सुरू झाला, दैत्यांचा नाच चालला, गाईंचा संहार झाला, गोमाता म्हणे धावेको, भगवंता धांव साह्याला, हंबरडा ऐकून देव आले वारसे जन्माला ॥

चा. क्र. ३ ) ब्रम्हदेव मालोजी, विष्णू झाले शहाजी ॥ लक्ष्मी जिजाबाई, शंकर झाले शिवाजी ॥ जगदंबा होई पार्वती, नारद बहिरजी ॥

चा. क्र. १ ) परशुराम झाले रुद्रनाथ, धर्मरक्षणार्थे, जाणा निश्चित, हरीचे वचन न्याय संतास, दंडणें पूर्ण पतीत जीवास, शाहीर दीक्षित गाय कवनास ॥ १ ॥

भाग × २ रा

चा. क्र. १ ) जहांगीरचा पुत्र शहाजहान, हुशार महान, परी नूरजहान, गुप्तपणें देई तयांसी त्रास, म्हणुनिया चालला तो इराणास, गेला वैतागून समयांस ॥
राजे शहाजी महाराष्ट्रांत, पराक्रमी अद्भुत, पाहून आश्रयार्थ, शहाजहान त्यांच्याकडे येई, शहाजी त्यां आश्रय देई, पण घडली काय लोका नवलाई ॥

चा. क्र. २ ) असवली शिवनेरी वरती, जिजाबाई पुत्र न्यास ॥
अपशकून बादशाहीस, निजाम तसाच आदिलशाहीस ॥
कसा घडला सांगतो सत्य, पया दाखलाच प्रत्यक्ष ॥ :-

॥ शिवरहस्य ॥

(का. प्र. ३) शिवराय जन्मे सोळाशें सत्तावीस साली ॥ जहांगीर बादशहा मेला त्याच
हो साली ॥ इब्राहीम आदिलशहा मेला त्याच हो काली ॥ शहाजादा पर्वीजही
वारला पहा त्याच साली ॥

(का. प्र. लगार ४) शिवनेरी किल्यावर मेला, बारशाचा थाट लै झाला, कि तो आफगाणगोत
आला, शहाजहान बादशहाही जाणून पूर्व मैत्रीला ॥ समारंभास दाखल
आला, मौल्यवान नजराणा दिला, शिवबाळास पोशाख चढविला,
आनंदी आनंद झाला, रुद्रनाथ बाळाचे भविष्य सांगू लागला ॥

(का. क्र. १) हा खरा शत्रूंचा काळ, तेजस्वी बाळ, वीर तेजाळ, स्थापील हिंदूपद
पातशाही, यवनांना करील नाही नाही, सोडवील दास्यांतूनी भू ही ॥

(का. प्र. झांगडी ८) बाळाचे भविष्य ऐकून, चरकले मन, शहाजहान, परी हसुनिया रुद्रनाथांस,
स्वतःचे भविष्य पुसे सभयांस, रुद्रनाथ सांगे त्याला खास, दिल्लीपती सम्राट
होशील हमखास, ख्याली खुशालीत राहशील सर्रास, एका तुम्ही दादा ॥

(का. प्र. १२ गोलच्याची) पुत्र तुझा पण घाऱ्या डोळ्याचा पराक्रमी होईल ॥ तूं असतानांच राज्य तुझें हे
हिसकाऊन घेईल ॥ सख्या भावांना युक्ती प्रयुक्तीनें पैगंबर दावील ॥
रावणापरी भरतभूमीही सारीं खास जिंकील ॥

(का. प्र. लगार ४) शहाजहाननें दुर्लक्ष केले, औरंगजेबावर प्रेम त्याचे भले, परी औरंगजेबानें
जाणीले ("मी बादशहा होण्यात हे कोण आडवे येणार काय? ठीक आहे")

(का. प्र. १) होता फक्त बारा वर्षांचा, औरंगजेब साचा, परी ज्योतीषाचा, बोल ध्यानीं
धरून लागला कार्यास, नष्ट केले पाहिजे म्हणे त्या कार्टयास, एकाचा
पुढील सारा इतिहास ॥ २ ॥

॥ भाग X रा ॥

(का. प्र. भेदीक ७-१)

नाश कराया शिवबाळाचा तयार आला शहाजहान ।
सुभेदार त्र्यंबकेश्वराचा धाडिला तो महादेवखान ॥
जसा कंसाला दिसूं लागला गोकुळींचा तो श्रीकृष्ण ।
म्हणून धाडीला दैत्य तयानें महाबळीष्ट रुपें धरून ॥
चिंता पडली रामभक्ता रामदासा दिला दृष्टांत ।
सावध करावे जिजामाईला कळवा खानाचे तें वृत्त ॥

(का. प्र. १) रामदास नारायण जाण, गेला धांऊन, शिवनेरीस जाण, कळविले वृत्त
जिजामाई, होऊ धाड बाळांवरती येई, करी त्या उपाय लवलाही ॥

॥ शिवरहस्य ॥

चा. क्र. २ ) जाहली फार दुःखीत, जिजामाई संदेश ऐकून ॥ छत्रपती शहाजीराजे, युध्दांत गुंतले जाण ॥ यासमयीं मम बालाचे, करणार कोण रक्षण ॥
चा. क्र. ४ लगट ) भवानीनं प्रेरणा केली, केदार नांवाचा कोळी, त्याचा पुत्र शिवाजी एवढाच होत्या वेळीं ॥ त्याला आज्ञा भवानीनं केली, दे पुत्र तुझा आज बळी, पन्नादाई जसा पोटचा गोळा बळी देई ॥ मग सारा विचार होऊन, कोळ्याचा पोर लहान, होता फक्त वर्षांचा तीन, शिवाजीचा पोशाख घालून, सजविला तयाला छान, शिवबाळ गुप्त मार्गानं, नेई रुद्रनाथ ब्राम्हण, जगांत झोपडींत जाण, भिल्ल कोळी बंदोबस्तास शूर ठेऊन ॥
चा. क्र. ३ ) कोळ्याचा मुलगा नांव रमाजी त्याचे जाणा ॥ तटावरनं लोटुनी दिला ध्यानीं तें आणा ॥ प्रत्यक्ष त्याच्या मातेनं शिवरक्षणा ॥ रुद्रनाथानं त्यासही वांचविलें न लागतां क्षणा ॥
चा. क्र. ४ लगट ) एका मुलाचे प्रेत आणून, शिवबाचा पोशाख चढवून, ठेऊन दिले तटाखालीं मोठ्या युक्तीनं ॥ मग दोन्ही बाळे त्या क्षणीं, ब्राम्हणाचा वेष घालूनी, चिंचवडचे देव चिंतामणी, नेले शिवापुरी दोघांना त्यांच्या साक्षीनीं ॥
चा. क्र. १ ) इकडे खान आला किल्यावर, आकांत थोर, मांडला घोर, जिजामातेनं व्याकुळ होऊन, पुत्रशोक खरा, खोटा दाऊन, खानही गार झाला पाहून ॥ ३ ॥

॥ भाग ४ था ॥

चा. क्र. ६ कराव-२ ) जिजामाई स्फुंदूनिया बोलली खानास, बाळ माझा शिवबा खास, काळ गेला जो फिरण्यास, नाहीं अजून परतता आला, एकुलता पुत्र एकला, काय दैवें कावा साधला ॥
तोंच कांहीं भिल्ल आले घेऊनी प्रेतास, पोशाख शिवाजीचा त्यांस, ठेवले खानाच्या सामन्यास, जिजामाय रडे धायीं धायीं, तशीच रमाजीचीही आई, पाहा तें एका जवळाई ॥
चा. क्र. १४ फाकड्याची ) मम प्रिय प्राणा, गेलासी कसा बाळा, लाडक्या सगुण वेल्हाळा ॥
ही दुर्दैवी माता म्हणून कां रुसला, आधार तूंच रे मजला ॥
तव शूर पिता नसतां निघोनी गेला, आज्ञेविण त्यांच्या बाळा ॥
चाल ) ॥ जाहली खात्री खानाची, शिवबाळ ठार झाल्याची ॥ कामगिरी अर्धी झाल्याची ॥

॥ शिवरहस्य ॥

चा. क्र. १४ पाळण्याची चा. क्र. ४ लगट) मग घेऊनीया जिजामाईलासंगें, वेगानें चालला खान ॥
तों सार्‍या भिल्ल कोळयांनीं, बाणांचा मारा करुनी, पाडिले वीर यावनीं, खानही दचकला मनीं, जिजामातेस म्हणे करी शांत लोकां यादीणी ॥

चा. क्र. १) घेऊनी धनुष्यबाण हातीं, जिजामायती, आली गर्जती, "आवरा आवरा! हात आवरा" कराया माझें रक्षण पाहीं, समर्थ मी आहे पहा आजही, नका करुं व्यर्थची रणघाई ॥

चा. क्र. ३) ही वार्ता दिल्लीला कळली मिर्झा राजास ॥ समजाविलें त्यानें भेटून बादशहास ॥ माहेरवाशीण जिजाबाई धाडी आमच्या ताब्यास ॥ नातरी तुम्हांविरुध्द लढणें आप्त आम्हांस ॥

चा. क्र. ४ लगट) ऐकता असा शब्दाला, बादशहा मनीं दचकला, जर रजपूत सारा उलटला, तर बादशाही टाकतील उलथून वेळ नाहीं त्याला ॥
आता शिवाजी ठार तर आला, काय करायचं त्याच्या आईला, तिचा चुलता जगदेवरावाच्या स्वाधीन केलें तिजला ॥

चा. क्र. १) आलेले असे हे संकट, जिवारीलें स्पष्ट, बिनबोभाट, धन्य अहू धन्य तुझी लीला, देह हा तव चरणीं वाहीला, पदरी घ्या शाहीर दीक्षिताला ॥

शाहीर देवास दरबार, राज्यासिंजीयर, आणिक सोंडूर, मानतो स्वतःस छत्रपतीदास, सांगली शहरीं जयाचा वास, कृष्णातीरीं जुळवी काव्य मन आस ॥ ४ ॥

o———X———o

॥ समाप्त ॥

मंगळवार दि. ११११८३ ह. आर. जी. देशपांडे १२११२४१
(क्रांतीशाहीर रघुवीर दीक्षित) जयगांधी भवन सदाशिव पेठ पुणे ३०